



# जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शुक्रवार १६ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०






## दिवाळीत सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांवर फटाके बंदी

**मुंबई :** दिवाळीत सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यांवरील फटाक्यांचा कडकडाट यंदा शमण्याची शक्यता आहे. उच्च न्यायालयाने राज्यभर सार्वजनिक ठिकाणी आणि रस्त्यांवर आतषबाजी करण्यास बंदी घातली आहे. सणांच्या दिवसात मुंबई-पुण्यासारखी शहरे उत्सवकाळात जगण्या आणि राहण्यायोग्य राखण्यासाठी यंदाच्या दिवाळीत सार्वजनिक ठिकाणे आणि रस्त्यांवर फटाके वाजवण्यास बंदी आवश्यक असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने गुरूवारी सांगितले. त्याबाबतची नियमावली आठवड्याभरात नियमावली प्रसिद्ध करून त्याची कठोर अंमलबजावणी सुरू करण्याचे आणि ही नियमावली कायमस्वरूपी असल्याचेही आदेशही न्यायालयाने दिले. याबाबत व्यापक जनजागृतीसाठी सेलिब्रिटींची मदत घेण्याची सूचनाही न्यायालयाने दिली.

## १ नोव्हेंबरपासून फोनच्या स्क्रीनवर कॉलरचे नाव दाखवणे गरजेचे

**मुंबई :** तुमच्या फोनवर जेव्हा कोणाचाही कॉल येईल, तेव्हा स्क्रीनवर त्या व्यक्तीचा नंबर आणि नाव दोन्ही दिसतील.



दूरसंचार विभागाने टेलिकॉम ऑपरेटर्सना १ नोव्हेंबर २०२६ पासून ही सेवा सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. वापरकर्त्याला ही सेवा स्वतंत्रपणे सक्रिय करण्याची गरज भासणार नाही. सरकारने कंपन्यांना निर्देश दिले आहेत की १ नोव्हेंबर २०२६ पासून सर्व 4G आणि 5G मोबाइल नेटवर्कवर 'कॉलिंग नेम प्रेझेंटेशन' (CNAP) अनिवार्य करण्यात यावे. यामुळे कोणत्याही अनोळखी नंबरवरून कॉल आल्यास कॉल करणाऱ्या व्यक्तीचा नंबर आणि नाव फोनच्या स्क्रीनवर दिसेल. स्क्रीनवरील पहिल्या फील्डमध्ये कॉल करणाऱ्याचा नंबर दिसेल. दुसऱ्या फील्डमध्ये तो नंबर कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये सेव्ह केलेला असल्यास तेच नाव दिसेल. मात्र नंबर सेव्ह केलेला नसेल, तर सिम घेताना वापरकर्त्याने टेलिकॉम कंपनीच्या रेकॉर्डमध्ये नोंदवलेले नाव दिसेल.

## तर आपल्या देशात पाकसारखे कट्टर अतिरेकी तयार होतील-खा.शिंदे

**मुंबई/ प्रतिनिधी-** खासदार प्रणिती शिंदे यांनी भाजप, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर टीका केली. देशाच्या संविधानिक मूल्यांवर आणि मतदान प्रक्रियेवर विचारसरणीचा प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला.देशाचा डीएनए हा संविधन मानणारा आहे, हाच डीएनए या सरकारला बदलायचा आहे. केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार आणि त्यांच्या सहकाऱ्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची कट्टर विचारसरणी मतदान प्रक्रियेत आणून हा डीएनए बदलायचा आहे. या देशात केवळ भाजपच्या विचारसरणीमुळे इंजिनियर, वकील होणार नाहीत, तर पाकिस्तानसारखे कट्टर अतिरेकी तयार होतील, असे खळबळजनक विधान खासदार प्रणिती शिंदे यांनी केले. दरम्यान, तडीपार आणि व्होटचोर या दोघांच्या प्रेशरमुळे फॉर्म ६ बदल केले आहेत. तुमचं नाव यादीतून कट झालं तर देशात नागरिकत्व सिद्ध करण्याची वेळ



तुमच्यावर येईल. आता नाही तर कधी लढणार? रस्त्यावर उतरून लढाई लढण्याची वेळ आहे, असे आवाहन शिंदे यांनी केले. महाविकास आघाडीचे पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील उमेदवारांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत खासदार शिंदे बोलत होत्या. त्यात म्हणाल्या, देशात कधी नव्हे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ब्रिटिशांविरोधात आपल्याला लढ्याला संधी मिळाली नाही. पण, लोकशाही जिवंत ठेवण्याची संधी आपल्याकडे आहे. क्रांतीसाठी मतदानाची संधी ही आपल्याला मिळाली आहे, लोकशाही खंबीर ठेवण्यासाठी हे शिक्षक व पदवीधर मतदारसंघाचे मतदान आहे. देशात जी स्थिती आहे, ती पाहता आज प्रचाराची गरज आहे काय? अहंकारी सत्ताधाऱ्याला धडा शिकवायचं असेल तर ही संधी आहे. बॅलेट पेपरवर ही निवडणूक होत आहे, त्यामुळे आपण दाखवून दिलं नाही तर मग आंदोलनाचा काय फायदा ➪(पान २ वर)

## ३ महिन्यांच्या बाळासह एकाच कुटुंबातील ६ जणांचा अंत

जळगाव/प्रतिनिधी- जिल्ह्यातील जामनेर-बोदवड मार्गावर गुरुवारी एक अत्यंत भीषण अपघाताची घटना घडली. मालदाभाटी गावाजवळ भरधाव मालवाहू ट्रकने एका दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरुन जाणा-या एकाच कुटुंबातील सहा जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये तीन महिन्यांच्या चिमुकल्या बाळासह तीन लहान मुले, दोन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे. या दुर्घटनेमुळे जळगाव जिल्ह्यात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



मध्य प्रदेशमधील ब-हाणपूर येथील एक कुटुंब दुचाकीवरून जात होते. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास जामनेर तालुक्यातील मालदाभाटी शिवारातील मुख्य रस्त्यावर वेगात येणा-या मालवाहू ट्रकने दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक दिली. धडक इतकी भयानक होती की, दुचाकीवरील सर्वजण हवेत उडून रस्त्यावर दूर फेकले गेले. अपघाताचा मोठा आवाज ऐकून शेतकरी आणि आजूबाजूचे ग्रामस्थही तात्काळ मदतीसाठी धावून आले. मात्र, तोपर्यंत सहाही जणांचा जीव गेला होता. अपघाताचे दृश्य पाहून घटनास्थळी असलेल्या लोकांनाही जबर धक्का बसला. अपघाताची माहिती मिळताच जामनेर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून सर्व मृतदेह जामनेर ग्रामीण रुग्णालयात पाठवले आहेत.

## धर्मांतरानंतर पूर्वीच्या जातीच्या आरक्षणाचा लाभ नाही

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**नागपूर/प्रतिनिधी-** हिंदू धर्मातून इस्लाम धर्म स्वीकारलेल्या व्यक्तीला धर्मांतरापूर्वीच्या जातीच्या सामाजिक मागासलेपणाच्या आधारे मागासवर्गीय आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत न्यायालयाने तमिळनाडू सरकारची विशेष अनुमती याचिका फेटाळली. न्या. प्रशांत कुमार मिश्रा आणि न्या. श्री चंद्रशेखर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

धर्मांतर केल्याने संबंधित व्यक्तीचा तमिळनाडूमध्ये अधिसूचित असलेल्या सात मुस्लिम मागासवर्गीय समुदायांपैकी एखाद्या समुदायात आपोआप समावेश होत नाही. धर्मांतरापूर्वीचा जातीय दर्जा नव्या



धार्मिक-सामाजिक व्यवस्थेत हस्तांतरित करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, एखाद्या खासगी धार्मिक संस्थेने दिलेला निर्णय संबंधित व्यक्तीच्या आरक्षणाच्या पात्रतेबाबत अंतिम मानता येणार नाही, असेही खंडपीठाने नमूद केले.

संविधानातील तरतुदींचा आधार

संविधानाच्या अनुच्छेद १६(४) अंतर्गत मिळणाऱ्या आरक्षणाचा दावा केवळ धर्मांतरापूर्वीच्या सामाजिक मागासलेपणाच्या आधारे करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. पूर्वीच्या सामाजिक व्यवस्थेमुळे आलेले मागासलेपण हे धर्मांतरानंतर दुसऱ्या अधिसूचित मागासवर्गीय समुदायाचे सदस्यत्व मिळविण्यासाठी पुरेसे कायदेशीर कारण ठरत नाही.

संविधानातील अनुसूचित जाती आदेशानुसार हिंदू, ➪(पान २ वर)

## अदानीच्या संस्थेकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा डी.लीटने सन्मान होणार

**वर्धा / प्रतिनिधी-** सावंगी (मेघे) येथील अदानी उच्च शिक्षण व संशोधन संस्थेत १७ ऑक्टोबरला दुपारी २ वाजता अभिमत विद्यापीठाचा १७ वा दीक्षांत समारंभ होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय मेडिकल कमिशनचे चेअरमन डॉ. अभिजीत सेठ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, हिंगणाचे आमदार समीर मेघे यांचीही कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती राहणार आहेत.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अदानी उच्च शिक्षण व संशोधन संस्थेच्या चान्सलर डॉ. प्रीती अदानी राहणार आहेत. यावेळी ट्रस्टी डॉ. मलय महार्देविआ आणि सागर मेघेसुद्धा उपस्थित राहणार आहेत. दीक्षांत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डी.लीट., तर डॉ. अभिजित सेठ यांना डी.एस्सी. पदवी प्रदान केली जाणार आहे. यावेळी विद्यापीठाचे ➪(पान २ वर)

### पतीचे इतर महिलांसोबत संबंध, विरोध केला तर मारहाण

## उत्तराखंडच्या कॅबिनेट मंत्र्यांनी रडत मांडली व्यथा

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** उत्तराखंडच्या पुष्कर सिंह धामी सरकारमधील कॅबिनेट मंत्री रेखा आर्य यांनी वैवाहिक आयुष्याबाबत आणि पतीविरोधात केलेल्या गंभीर आरोपांमुळे मोठी खळबळ उडली आहे. पतीकडून होणाऱ्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून त्यांनी पती गिरधारी लाल साहू यांच्याविरोधात पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी १५ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला असून मंत्री रेखा आर्य यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मंत्री रेखा आर्य यांनी फेसबुक पेजवर एक व्हिडिओ, दोन ऑडिओ क्लिप आणि पतीचा फोटो शेअर केला. या व्हिडिओमध्ये त्या रडत असताना दिसत आहेत. 'आज मी एक असा ऑडिओ ऐकवतेय, ज्याने मला पूर्णपणे हादरवून सोडले आणि माझ्या वैवाहिक जीवनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले,'





असे म्हणत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रामाणिकपणे संसार केल्यानंतर त्याचे असे फळ मिळते का, असा सवाल त्यांनी केला. हृदयाला तीव्र वेदना होत असताना, आपल्या आणि लहान मुलांच्या सुरक्षेसाठी मी पोलिसांकडे दाद मागण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

**पतीवर गंभीर आरोप आणि पोलिसांत एफआयआर-** रेखा आर्य यांनी दाखल केलेल्या तक्रारीत पती गिरधारी लाल साहू यांच्यावर अनेक गंभीर आरोप लावण्यात आले आहेत. पतीचे आधीच लग्न झाले होते आणि त्यांना मुलेही होती, ही माहिती लग्नाआधी लपवून ठेवण्यात आली होती. जेव्हा सत्य समोर आले तोपर्यंत खूप उशीर झाला होता आणि आम्हाला मुले झाली होती, त्यामुळे मी गप्प राहिले, असं आर्य यांनी म्हटलं.पतीचे इतर महिलांसोबत अनैतिक संबंध असल्याचा ➪(पान २ वर)

## तामिळनाडूतील २५ मच्छीमारांना मालदीवकडून अटक, बोटीही जप्त

**चेन्नई / वृत्तसंस्था-** मालदीवच्या तटरक्षक दलाने तमिळनाडूतील २५ मच्छीमारांना त्यांच्या तीन बोटींसह ताब्यात घेतल्याची माहिती मुख्यमंत्री विजय यांनी गुरुवारी केंद्र सरकारला दिली. तसेच, या मच्छीमारांची सुटका करण्यासाठी तातडीने कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांना पत्र लिहून विजय यांनी सांगितले की, तुतिकोरिन जिल्ह्यातील या मच्छीमारांना मंगळवारी पहाटे मालदीवच्या तटरक्षक दलाने ताब्यात घेतले. यावेळी त्यांच्या तीन यांत्रिक बोटीही जप्त करण्यात आल्या. विजय यांनी जयशंकर यांना सांगितले की



मालदीव सरकारकडे हा मुद्दा उपस्थित करावा आणि मच्छीमारांची तसेच त्यांच्या बोटींची लवकरात लवकर सुटका करून त्यांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्याची व्यवस्था करावी, अशी माझी आपणास विनंती आहे. परराष्ट्रमंत्र्यांनी या प्रकरणात वैयक्तिक लक्ष घालावे, अशी मागणी करताना विजय यांनी सांगितले की त्यामुळे प्रभावित मच्छीमारांच्या कुटुंबीयांना आणि संपूर्ण मच्छीमार समुदायाला मोठा दिलासा मिळेल.

## १ लाख २० हजाराची लाच घेताना भाजपचा नगरसेवक 'एसीबी'च्या जाळ्यात

**गडचिरोली / प्रतिनिधी-** अहेरी नगरपंचायतीच्या विद्युत कामांच्या कंत्राटापोटी एक लाख २० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याच्या आरोपावरून अहेरी नगरपंचायतीतील भाजपचे स्वीकृत नगरसेवक अमोल गुडेल्लीवार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुरुवारी, १५ ऑक्टोबर रोजी रंगेहात पकडले. अहेरीच्या मुख्य बाजारपेठेत दुपारी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.अमोल गुडेल्लीवार हे माजी राज्यमंत्री अम्ब्रीशराव आत्राम यांचे खंदेसमर्थक म्हणून ओळखले जातात. नगरपंचायतीच्या माध्यमातून शहरात विविध विद्युत कामे प्रस्तावित होती.




एका कंत्राटदाराने नगरपंचायतीअंतर्गत विद्युत कामांचे कंत्राट घेतले होते. या कामांच्या मोबदल्यात गुडेल्लीवार यांनी कंत्राटदाराकडे एक लाख २० हजार रुपयांची कमिशनच्या स्वरूपात मागणी केल्याचा आरोप आहे.लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसलेल्या कंत्राटदाराने यासंदर्भात गोंदिया येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. तक्रारीची दखल घेत एसीबीच्या पथकाने १५ ऑक्टोबर रोजी पंचांसमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली. त्यात मागणीची पुष्टी झाल्यानंतर गुडेल्लीवार यांना पकडण्यासाठी सापळा रचण्यात आला.ठरल्याप्रमाणे गुरुवारी दुपारी एकच्या सुमारास अहेरीच्या मुख्य बाजारपेठेत कंत्राटदाराकडून एक लाख २० हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना गुडेल्लीवार यांना एसीबीच्या पथकाने ताब्यात घेतले.

## चिमुकल्याला ६ व्या मजल्यावरून खाली फेकले

**मुंबई / प्रतिनिधी-** मुंबईतील गोरेगाव पूर्व भागातून थरारक घटना समोर आली आहे. लहान मुलांच्या मनातील चिडचिड आणि राग किती टोकाला जाऊ शकते, याचे उदाहरण गोरेगावच्या शिवशाही इमारतीत पाहायला मिळाला. एका १० वर्षांच्या अल्पवयीन मुलीने रागातून १८ महिन्यांच्या एका निष्पाप बालकाला इमारतीच्या सहाव्या मजल्यावरून खाली फेकून दिले. या भयानक घटनेत चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

## दसरा मेळाव्यासाठी शिवाजी पार्कवर ठाकरेंचीच 'गर्जना'

**मुंबई / प्रतिनिधी-** यंदाच्या दसरा मेळाव्यासाठी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर सभा घेण्याचा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा मार्ग मोकळा झाला आहे. दसरा मेळाव्यासाठी उद्धवसेनेकडून खासदार अनिल देसाई यांचा एकमेव अर्ज आल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी उत्तर विभागाने त्यांना परवानगी दिली आहे. त्यामुळे आता शिवसेना उबाठा पक्षाचा दसरा मेळावा येथे होईल. येत्या २० ऑक्टोबरला होणा-या या मेळाव्याला पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे मार्गदर्शन करणार आहेत.शिवसेनेत फूट पडल्यानंतर शिवसेना उबाठा आणि शिवसेनेचे दोन वेगवेगळे मेळावे होतात. दसरा मेळावा हा राजकीय वर्तुळामध्ये महत्त्वाचा मानला जातो. यंदाही शिवाजी पार्कवर दसरा मेळाव्यासाठी फक्त शिवसेना ठाकरे पक्षाने अर्ज केला होता. त्यांच्या अर्जाव्यतिरिक्त एकाही राजकीय पक्षाचा अर्ज महापालिकेकडे सादर झाला नाही. २०२२मध्ये शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अर्ज केला होता.



तर शिवसेना उबाठा पक्षानेही अर्ज केल्यानंतर हा वाद न्यायालयात गेला होता. त्यानंतर शिवाजी पार्कवर मेळावा घेण्याची परवानगी उबाठा पक्षाला मिळाली होती. त्यानंतर वांद्रे-कुर्ला संकुल येथे शिवसेनेचा मेळावा होऊ लागला. शिंदेंच्या शिवसेनेने गेल्या वर्षी दसरा मेळावा बीकेसी मैदानावर घेतला, तर शिवसेना उबाठा पक्षाचा दसरा मेळावा शिवाजी पार्कमध्येच झाला. यंदाही उबाठा पक्षाला काही अटींसह परवानगी देण्यात आली आहे.

**काही अटींसह परवानगी-** रात्री १० वाजेपर्यंत सभा घेण्यात यावी. मैदानाचे नुकसान किंवा अटींचे उल्लंघन झाल्यास २० हजार रुपयांची अनामत रक्कम जमा करणे. ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र सादर करणे. मैदानाबाहेर आवाज जाणार नाही याची दक्षता घेण्याचे तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडाळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार माती मैदानात टाकता येणार नाही, अशा अटी घातल्या आहेत. दरम्यान, मागील काही महिन्यांपासून ठाकरे बंधूंनी एकत्रितपणे अनेक ठिकाणी हजेरी लावलेली असताना आता दसरा मेळाव्याच्या निमित्ताने शिवाजी पार्कमध्ये उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याची शक्यता आहे.

## १२ कोटी लोकांना रोजगार मिळणार-नितीन गडकरी

**नागपूर/ प्रतिनिधी-** केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे आपल्या भन्नाट कल्पनांसाठी प्रसिद्ध आहेत. विदेशात गेल्यावर गडकरी तेथील काही कल्पना घेऊन येतात आणि त्या देशातही लागू करतात. सध्या देशात रॅपिडो, ओला आणि उबर या टॅक्सी सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांनी देशात सर्वत्र आपला प्रसार केला आहे. आता गडकरी यांनी या कंपन्यांसाठी नवीन योजना आखली आहे. यातून देशात १२ कोटी लोकांना रोजगार मिळेल असे सांगितले.मंथनच्या वतीने महाल येथली गडकरींच्या निवासी आयोजित नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या शिक्षक, प्राध्यापक आणि पदवीधर मेळाव्यात बोलताना गडकरींनी ही कल्पना सांगितली.



कॅनडातील एका प्रवासादरम्यान निवृत्त संशोधक खासगी वाहन टॅक्सी म्हणून चालवून अतिरिक्त उत्पन्न मिळवत असल्याचा अनुभव गडकरी यांनी सांगितला. त्यातून खासगी वाहनांना टॅक्सी म्हणून मान्यता देण्याची कल्पना सुचल्याचे त्यांनी नमूद केले. २०१८ मध्ये परिवहनमंत्री असताना यासंदर्भात निर्णय घेतल्याचा उल्लेखही त्यांनी केला. रॅपिडो, ओला आणि उबरसारख्या व्यासपीठांमुळे रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. १२ कोटी रोजगार मिळणार असल्याचे सांगून, अशा धोरणांचा विस्तार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पदवीधर म्हणजे सुशिक्षित आणि विद्वान व्यक्ती. अनेकांनी आचार्य पदवीही मिळवलेली असते. असे असतानाही पदवीधर मतदारसंघात तब्बल १२ हजार मते अवैध ठरतात, ही दुर्दैवी बाब आहे.










जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# अमरावतीत डॉक्टरांचा महाकुंभ २५ नोव्हेंबरपासून

## -इंडियन मेडिकल असोसिएशनचे आयोजन , -देशभरातील हजारो डॉक्टर होणार सहभागी

**अमरावती/प्रतिनिधीः-** इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अमरावती शाखेच्यावतीने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा 'महाकुंभ २०२६' चे भव्य आयोजन २५ ते २९ नोव्हेंबर दरम्यान करण्यात येत आहे. हा राष्ट्रीय महाकुंभ अमरावतीच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरेल, अशी माहिती आयएमएचे ज्येष्ठ सदस्य व राष्ट्रीय सह सचिव डॉ. वसंत लुंगे यांनी आज गुरुवार १५ ऑक्टोंबर रोजी पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी सांगितले की,या स्पर्धेमुळे संपूर्ण देशातील डॉक्टरांमध्ये एकजूट, बंधुभाव आणि सद्भावना वाढण्यास मदत होईल. राष्ट्रीय क्रीडा महोत्सवात सहभागी होण्यासाठी देशाच्या विविध राज्यांमधून आयएमएचे खेळाडू सदस्य मोठ्या संख्येने अमरावतीत येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने कर्नाटक, तामिळनाडू, केरळ, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, सिक्कीम, पंजाब, हरियाणा, पश्चिम बंगाल, तेलंगणा, आंध्र प्रदेश, छत्तीसगड, बिहार, महाराष्ट्र, झारखंड, मणिपूर आदी राज्यांचा समावेश आहे. आयोजनासाठी विविध मैदाने, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, स्विमिंग पूल, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ आणि स्टेडियममध्ये तयारी जोरात सुरू आहे. राष्ट्रीय स्तरावरील या आयोजनामुळे सर्व खेळाडूंसोबतच अमरावतीकरांसाठी देखील हा एक विशेष पर्व ठरेल, असा विश्वास समितीने व्यक्त केला आहे.

महाकुंभ २०२६ या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी आयोजन समितीची स्थापना करण्यात आली आहे, ज्यात



-मुख्य आयोजन समिती: संयोजक - डॉ. वसंत लुंगे, सह- संयोजक - डॉ. दिनेश वाघाडे, आयोजन अध्यक्ष - डॉ. जयप्रकाश बनकर, आयोजन सचिव - डॉ. सिकंदर अडवाणी, खजिनदार - डॉ. रोहन बोबडे व डॉ. परीक्षित ठाकरे, आयोजन सह-अध्यक्ष - डॉ. संदीप दानखेडे, डॉ. भूपेश भोंड, डॉ. सोनाली शिरभाते आहे. विस्तारित समिती मध्ये आयोजन संयुक्त सचिव - डॉ. आनंद काकाणी, डॉ. निलेश मोरे, डॉ. ऋतिका लोखंडे, मुख्य समन्वयक - डॉ. धीरज सवाई, डॉ. सोहेल बारी, डॉ. प्रणित काकडे, डॉ. अनुपम राठोड, डॉ. भूषण सरगणे, डॉ. अक्षय चांदूरकर, तसेच विविध क्रीडा स्पर्धांसाठी विविध क्रीडा समित्यांचे आयोजन करण्यात आले आहे.राष्ट्रीय स्तरावर मार्गदर्शन राष्ट्रीय अध्यक्ष - डॉ. अनिल कुमार जे. नायक, माजी राष्ट्रीय अध्यक्ष - डॉ. दिलीप भानुशाली, सचिव - डॉ. सर्वरी दत्ता, कोषाध्यक्ष - डॉ. पियुष जैन, सह सचिव - डॉ. वसंत लुंगे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. महाराष्ट्र व अमरावती स्तरावर मार्गदर्शन करणाऱ्यांमध्ये अध्यक्ष - डॉ. संतोष कुलकर्णी, निर्वाचित अध्यक्ष - डॉ. मंजुषा गिरी, माजी अध्यक्ष - डॉ. संतोष कदम, सचिव - डॉ. विक्रांत देसाई, कोषाध्यक्ष - डॉ. अमोल गिते, यांचेही मार्गदर्शन राहणार आहे. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक अडाऊ व डॉ. रवी वानखेडकर आहेत. सोबतच माजी महाराष्ट्र राज्याध्यक्ष डॉ. उद्धव देशमुख, डॉ. दिनेश ठाकरे यांचेही मोलाचे सहकार्य आहे.या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा आणि खेळाचा आनंद घ्यावा असे आवाहन असोसिएशन ने केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये डॉ. दिनेश वाघाडे, डॉ. विक्रम वानखडे, डॉ. रोहन बोबडे आदि उपस्थित होते.

**या क्रीडा प्रकारांचा समावेश-**

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत क्रिकेट सीजन बॉल T२० टूर्नामेंट, टेनिस बॉल क्रिकेट टूर्नामेंट, बॉक्स क्रिकेट टूर्नामेंट, टर्फ बॉल, लॉन टेनिस, टेबल टेनिस, बॅडमिंटन, पिकल बॉल, स्विमिंग, ॲथलेटिक्स, मॅरेथॉन हाफ मॅरेथॉन, बुद्धिबळ, कॅरम, सायकलिंग, गोल्फ आदी क्रीडा प्रकारांचा समावेश असणार आहे.

# विजय सावंत यांनी मरणोत्तर त्वचादान करुन समाजापुढे निर्माण केला आदर्श

**अमरावती/प्रतिनिधीः-** सद्गुरू श्री वामनराव पै प्रणित जीवनविद्या मिशनचे ज्येष्ठ नामधारक तसेच नवी मुंबईतील नेरूळ ज्ञानसाधना केंद्राचे माजी अध्यक्ष श्री विजय सावंत यांनी आपल्या मृत्यूनंतर त्वचा दान करुन समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे .श्री विजय सावंत यांचे शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांनी अगोदरच त्वचा व अवयवदानाची इच्छा व्यक्त केली होती आणि त्यासाठी आवश्यक नोंदणी प्रक्रिया देखील पूर्ण करुन ठेवली होती. इतकेच नव्हे तर ऑपरेशनला जाण्यापूर्वी आपल्या मुलांना त्याची पुन्हा आठवण करून दिली होती. त्यांच्या या इच्छेचा आदर राखत कुटुंबीयांनी दुःखाच्या प्रसंगीही घेतलेला हा निर्णय समाजासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. समाजात अवयवदान आणि देहदानाबाबत जनजागृती होत असली, तरी त्वचादानाबाबत अजूनही उदासीनता आहे. विजय सावंत यांच्या या दातृत्वामुळे संपूर्ण संगमेश्वर तालुका आणि परिसरातून त्यांच्या कुटुंबियांचे कौतुक केले जात आहे. सद्गुरू वामनराव पै प्रणीत जीवनविद्या मिशनचे ज्येष्ठ कार्यकर्ते असलेले विजय सावंत यांनी आपले संगमेश्वर तालुक्यातील देवरुख जवळ मूळ गाव हातीव तसेच मार्लेश्वर, नवी मुंबईतील नेरुळ आणि उलवे परिसरासह यवतमाळ जिल्हा, रत्नागिरी जिल्हा आणि महाराष्ट्राच्या विविध भागांत जीवनविद्येच्या ज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी निरपेक्षपणे कार्य केलेले आहे. श्री विजय सावंत यांचे कुटुंबीय, जीवनविद्या मिशन संस्था, महाराष्ट्र राज्य विभागीय अवयवदान प्रत्यारोपण समिती (ZTCC) आणि नवी मुंबईतील नॅशनल बर्न सेंटरच्या स्किन बँक यांच्या समन्वयातून त्वचादानाची प्रक्रिया व्यवस्थितरीत्या पार पडली.सावंत कुटुंबीयांच्या त्वचादानाच्या (Skin Donation) धाडसी निर्णयामुळे, गंभीररीत्या भाजलेल्या रुग्णांना नवजीवन मिळण्यास मदत होणार आहे.

# १ व १० वरिल उर्वरित

## तर आपल्या देशात पाकसारखे

आहे? असेही त्यांनी नमूद केले. त्या म्हणाल्या, अमित शाह म्हणतात २०२९ मध्ये आम्हीच जिंकू, हा आत्मविश्वास त्यांच्यात कसा आला? ज्ञानेश कुमारला वाचवण्यासाठी इवढे प्रयत्न करतायत, जेवढे धर्मेंद्र प्रधानांसाठीसुद्धा यांनी केले नाहीत. त्यामुळे 'दाल में कुछ काला नाही; संपूर्ण दाल काळी आहे.' देशातील १३ कोटी मतदार ज्ञानेशकुमार यांनी कमी केले आहेत, त्याचे पुरावे आपल्याकडे आहेत. फॉर्म ६ मध्ये जे बदल केले, त्यामुळे आपल्या राज्याचे मुख्य सचिव यांचे नावसुद्धा कट होण्याची शक्यता आहे, अशी भीतीही त्यांनी बोलून दाखवलं. त्या म्हणाल्या, या लोकांनी देशात तिरंगा फडकवला नाही आणि दिल्लीत तिरंगा फडकवणाऱ्यासुद्धा यांनी अटक केली. तब लढे थे गोरोंसे अब लढ रहे है चोरोंसे. आपली लढाई ही पुरोगामी विचारसरणी टिकवण्यासाठी आहे. कितीही पैशाचा वापर त्यांनी केला तर आता त्यांचं काही होणार नाही. देशात आता एक चळवळ निर्माण झाली आहे. ही चळवळ बघून स्वातंत्र्य काळाची आठवण येते. या देशाचे जे नुकसान होतंय, ते भरून काढायला किमान ५० वर्षे लागतील. या देशाचे वाटोळे करण्याचे पाप मोदी आणि शाह करत आहेत. आम्हीही सत्तेत होतो, आमच्याविरोधातही आंदोलन झाली. पण, त्यांच्यासारखे आम्ही त्यावेळी आंदोलकांना अटक केली नाही. त्यांना आंदोलन होऊ द्यायचे नाही. 'जंतरमंतर' वर यापुढे आंदोलन होणार नाही, मग ही हुकूमशाही नाही तर काय आहे? असा सवाल प्रणिती शिंदे यांनी केला.

## धर्मांतरानंतर पूर्वीच्या जातीच्या

शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त अन्य धर्म मानणाऱ्या व्यक्तीला अनुसूचित जातीचा दर्जा मिळत नाही. त्यामुळे संबंधित धर्मांतरानंतर अनुसूचित जातीच्या दर्जावर आधारित लाभांचा दावा करता येणार नाही. धर्मांतरानंतर पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश केल्यासही पूर्वीचा जातीय दर्जा आपोआप पुनर्स्थापित होत नाही. त्यासाठी मूळ सामाजिक ओळख प्रत्यक्षात पुनर्स्थापित झाली आहे का, याची स्वतंत्र आणि वस्तुनिष्ठ तपासणी आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

**तमिळनाडू सरकारचा आदेश रद्द-**तमिळनाडू सरकारने ९ मार्च २०२४ रोजी काढलेल्या शासन आदेशानुसार, मागासवर्गीय, अतिमागासवर्गीय, विमुक्त समुदाय किंवा अनुसूचित जातींमधील व्यक्तीने इस्लाम स्वीकारल्यास तिला मुस्लिम मागासवर्गीय प्रवर्गात समाविष्ट करून प्रमाणपत्र देण्याची तरतूद होती. हा आदेश मद्रास उच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरवला होता.तमिळनाडूमध्ये अन्सार, डेक्कनी मुस्लिम, दुबेकुला, लब्बाई (रोथर आणि मरकयार यांच्यासह), मापिल्ला, शेख आणि सय्यद या सात मुस्लिम समुदायांना मागासवर्गीय म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींना या समुदायांपैकी एखाद्या समुदायाचे प्रमाणपत्र देण्याची तरतूद न्यायालयाने अमान्य केली.

**समीर अहमद यांच्या प्रकरणातून वाद-**समीर अहमद यांनी २०१५ मध्ये हिंदू धर्मातून इस्लाम स्वीकारला होता. २०१६ मध्ये त्याबाबत राजपत्र अधिसूचनाही प्रसिद्ध झाली. त्यानंतर त्यांनी 'मुस्लिम लेब्बाई' समुदायाचे प्रमाणपत्र मागितले; मात्र तहसीलदारांनी अर्ज फेटाळला. शासन आदेशाचा आधार घेत त्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. राज्य सरकारने आरक्षणाचे लाभ धर्मांतरामुळे गमावले जाऊ नयेत आणि सामाजिक समतोल राखला जावा, असा युक्तिवाद केला होता. मात्र, उच्च न्यायालयाने शासन आदेश रद्द केल्यानंतर राज्य सरकारने ६ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने आता ही याचिका फेटाळून उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला आहे.

## अदानीच्या संस्थेकडून मुख्यमंत्री देवेंद्र

व्हाईस चान्सलर डॉ. ललितभूषण वाघमारे, रजिस्ट्रार डॉ. श्वेता काळे-पिसुलकर, डॉ. परीक्षा नियंत्रक डॉ. आदर्शलता सिंग यांची उपस्थिती राहणार आहेत. दिवंगत माजी मंत्री तथा खासदार दत्ता मेघे यांनी १९८८ मध्ये सावंगी (मेघे) येथे दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेची स्थापना केली होती. १९९० मध्ये जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज आणि १९९१ मध्ये शरद पवार दंत कॉलेज सुरू करण्यात आले होते. २००५ मध्ये संस्थेला केंद्रीय मानव संसाधन मंत्रालयाने 'अभिमत विद्यापीठा'चा दर्जा बहाल केला होता. आता नुकतेच २६ सप्टेंबर रोजी संस्थेचे 'अदानी उच्च शिक्षण व संशोधन संस्था', असे नामकरण झाल्याची घोषणा करण्यात आली होती.

## उत्तराखंडच्या कॅबिनेट मंत्र्यांनी

आरोप त्यांनी केला आहे. जेव्हा त्यांनी याला विरोध केला, तेव्हा त्यांच्याशी मारहाण, शिवीगाळ आणि त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्या. एका ऑडिओ क्लिपमध्ये त्यांचे पती एका महिलेसोबत बोलताना आर्य यांना संपवण्याचा कट रचत असल्याचे उघड झाले आहे, त्यांना आणि त्यांच्या अल्पवयीन मुलांना जीवाला धोका निर्माण झाला आहे. सरकारी निवासस्थानी कर्मचाऱ्यांसमोर जातिवाचक अपशब्द वापरून अपमान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, त्यांच्या बनावट सह्या करून खोटी कागदपत्रे तयार करण्यात आली आणि त्यांना कंपनीच्या संचालक पदावरून बेकायदेशीरपणे हटवण्यात आल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवला असून कसून तपास सुरू केला आहे.

**तब्येत बिघडल्याने रुग्णालयात दाखल-**या मानसिक धक्क्यामुळे मंत्री रेखा आर्य यांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार त्यांचा रक्तदाब खूप वाढला होते आणि छातीच्या डाव्या बाजूला तीव्र वेदना होत होत्या. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून तज्ज्ञांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

## आत्महत्या की सुनियोजित खून?

पोलीस या प्रकरणात सर्व पैलूंचा आणि फॉरेन्सिक अँगलचा विचार करून सखोल तपास करीत आहे. या खळबळजनक घटनेनंतर संपूर्ण परिसरात भीतीचे आणि चर्चेचे वातावरण पसरले आहे.

## २५.९४ ग्रॅम एमडी ड्रग्ससह दोन

पोलिसांना एक गुप्त मिळाली होती. माहितीच्या आधारे एमआयडीसी परिसरातील जुन्या अग्रवाल धर्मकाट्याजवळ पोलिसांनी सापळा रचला.तेथे आरोपी पराग उर्फ सन्नी अरविंद गवई (२९, उत्तम नगर, नेरपिंगलाई) हा त्याचा साथीदार सोपान अंबादास खडसे (२६, गोपाल नगर) याच्या सह उपस्थित होता. पंचांच्या उपस्थितीत घेतलेल्या झडतीदरम्यान सोपान खडसे याच्याजवळून पांढऱ्या-दुधाळ रंगाची मेफेड्रोन पावडर जप्त करण्यात आले.जप्त केलेल्या ड्रग्जचे एकूण वजन २५.९४० ग्रॅम असून त्याची अंदाजे बाजारभाव किंमत सुमारे ७७,८२० रुपये आहे. याशिवाय आरोपीं कडून एकूण १ लाख ९१ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्यामध्ये ५ हजार रुपयांचा विवो मोबाईल फोन, ४ हजाररुपयांचा डिजिटल इलेक्ट्रॉनिक वजन काटा, ५ हजार रुपयांचा विवो मोबाईल फोन,एक होंडा करिष्मा आर मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. दोन्ही आरोपीं विरुद्ध एनडीपीएस कायद्याच्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. हा अंमली पदार्थ कुठून आणला गेला होता आणि त्याच्या सप्लाय चेनमध्ये कोण-कोण सामील आहे, याचा पोलीस सखोल तपास करीत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव पानसरे, पोलीस निरीक्षक उमेश मुढे, सहायक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे आणि डीबी स्कॉडने केली.

## प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांच्या

मानसिक त्रास देतात. १५ वर्षांपासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसलेल्या प्रीती देशमुख यांनी प्रकल्प संचालक पदाच्या अधिकारांचा गैरवापर करून खोटी आणि बनावट कारणे दाखवून कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. शासकीय ताकीद देऊनही आक्षेपार्ह भाषेत आदेश काढणे, महिला कर्मचाऱ्यांना अर्वाच्य भाषेत धमकावणे, गरिबांसाठीच्या योजनेत असंवेदनशीलपणे काम करणे आणि अधिकाऱ्यांवर दबाव टाकून त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणे, असे गंभीर आरोप निवेदनात करण्यात आले आहेत. या जाचाला कंटाळून अमरावतीच्या केजाटी अधिकारी शीतल गणोरवार यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक दावा देखील संघटनेने केला आहे.

प्रीती देशमुख यांची तात्काळ बदली करावी आणि त्यांच्या कार्यकाळातील सर्व कामांची जिल्हा कार्यालय व समुदाय स्तरावर सखोल चौकशी करून शासन स्तरावर कठोर कारवाई करावी. उमेद अभियानात ५ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना SRLM धर्तीवर १० टक्के आरक्षण देऊन केजाटी पद्धतीने नियमित सेवेत सामावून घ्यावे.KRA पद्धतीने वार्षिक वेतनवाढ लागू करावी. आमच्या मागण्या तात्काळ मान्य न झाल्यास राज्य भरातील सर्व उमेद कर्मचारी एकजूट होऊन कामबंद आंदोलन पुकारतील आणि घटनात्मक मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील, असा थेट इशारा उमेद महाराष्ट्र राज्य महिला व कर्मचारी संघटनेने शासनाला दिला आहे.

## मायक्रो फायनान्स कंपन्यांची मनमानी

महिला बचत गटातील महिला व सामान्य नागरिक आधीच अडचणीत आहेत. अशा परिस्थितीत कर्जाच्या हप्त्यांसाठी वारंवार फोन करणे, घरी जाऊन दबाव आणणे, धमकावणे, अपमानास्पद भाषा वापरणे आणि कुटुंबाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल असे वर्तन केल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या प्रकारांमुळे अनेक कुटुंबांवर मानसिक तणाव निर्माण होत असून, त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

वसुलीच्या नावाखाली कोणालाही धमकावण्याचा, अपमानित करण्याचा किंवा बेकायदेशीर दबाव आणण्याचा अधिकार नाही. गरीब आणि अडचणीत असलेल्या नागरिकांना वेठीस धरण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. प्रशासनाने या प्रकरणात तातडीने लक्ष घालून पीडितांना न्याय द्यावा,' अशी ठाम भूमिका यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांनी मांडली.

दर्यापूर तालुक्यातील मायक्रो फायनान्स कंपन्या व संबंधित वित्तीय संस्थांच्या कर्जवसुली पद्धतीची चौकशी करावी, कर्जदारांना धमकी देणे, शिवीगाळ करणे, अपमानास्पद वागणूक देणे अथवा बेकायदेशीर दबाव टाकणे अशा प्रकारांना आळा घालावा, तसेच संबंधित नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

'सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी शिवसेना रस्त्यावर उतरायला मागेपुढे पाहणार नाही. प्रशासनाने तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,' असा इशाराही पक्षाच्या वतीने देण्यात आला.

यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर, शिवसेना विधानसभा संघटक बबनराव विल्हेकर, युवासेना जिल्हा चिटणीस प्रतिक राऊत, युवासेना तालुकाप्रमुख सागर गिरे, शिवसेना उपशहरप्रमुख दिपक बगाडे, शिवसेना उपतालुकाप्रमुख भास्कर धोटे, शिवसेना उपतालुकाप्रमुख राजू मानकर, निलेश होले, नितेश गावंडे, सतिश जामनिक, संतोष हागे, शरद बोरखडे, हाजी अशरफ घाणीवाले, मंगेश शामतकर, प्रविण बायस्कर, प्रज्वल गावंडे, नंदकिशोर माहुलकर यांच्या सह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

## ग्रामिण भागातील नागरिकांना घरपट्टी

बहुतांश कुटुंबांचा उदरनिर्वाह शेती व शेतमजुरीवर अवलंबून असल्याने पावसाच्या अनिश्चिततेचा त्यांच्या आर्थिक स्थितीवर मोठा परिणाम झाला आहे. त्यातच वाढत्या महागाईमुळे कुटुंबांचे आर्थिक बजेट कोलमडले असून, दैनंदिन गरजा भागविणेही अनेकांसाठी कठीण झाले आहे. दुष्काळजन्य परिस्थितीमुळे ग्रामिण भागातील नागरिकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत असताना ग्रामपंचायतीकडून आकारण्यात येणारी घरपट्टी व पाणीपट्टी भरणे अनेक गरीब व गरजू कुटुंबांसाठी जिकरीचे ठरत आहे. एकीकडे शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसताना दुसरीकडे घरगुती खर्च आणि विविध करांचा भार सहन करावा लागत आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त परिस्थितीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून ग्रामिण नागरिकांची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. ग्रामिण भागातील नागरिकांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी शासनस्तरावर तातडीने योग्य निर्णय घेण्यात यावा. संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देऊन घरपट्टी व पाणीपट्टी माफीच्या मागणीवर सकारात्मक कार्यवाही करावी, अशी विनंतीवजा मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या ग्रामिण कुटुंबांना मोठा दिलासा मिळू शकतो. निवेदनाच्या प्रती अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जिल्हाधिकारी अमरावती तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविण्यात आल्या आहेत. हे निवेदन तालूका अध्यक्ष निलेश साहेबराव मोपारी यांच्या नेतृत्वात शहर अध्यक्ष अमोल गहरवाल, नगरसेवक राहुल बैताडे, अनंत राऊत, निलेश जुनघरे, कुलदीप काळे, नितीन गावंडे, प्रतिक नाकट, अनिस भाई, योगेश हिंगणकर, शुभम होले, गजानन मानकर, राहुल घायसुंदर, गौरव गावंडे, तौसिफ भाई, प्रफुल राहाटे, गजानन सोळंके, प्रविण आठवले, हर्षल खाडे, चेतन देशमुख, आशिष अरबट, सागर काळे, आदेश ठाकरे, चेतन जुनघरे व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना

शिवरा, धामक तसेच चांदूर रेल्वे परिसरातील शेतीपिकांचे अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्ती आणि वाढत्या शेतीखर्चामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, अनेकांना अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नाही. पूर्ण झालेल्या पंचनाम्यांच्या आधारे पात्र शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मंजुरी देऊन मदतीची रक्कम थेट बँक खात्यात जमा करावी. तसेच प्रलंबित पंचनामे आणि तांत्रिक अडचणींमुळे रखडलेल्या प्रकरणांची विशेष तपासणी करून नुकसानभरपाई वितरणासाठी कालमर्यादा निश्चित करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी चांदूर रेल्वेचे माजी शिवसेना तालुकाप्रमुख अनिल वानखेडे आणि युवासेना विधानसभा प्रमुख राहुल हजारे उपस्थित होते.

## चांदूर रेल्वेत काँग्रेस आणि इंडिया

संपूर्ण चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करून त्यांच्याविरुद्ध तातडीने न्यायालयीन कारवाई करण्यात यावी. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ चांदूर रेल्वे तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने संविधानाच्या आर्टिकल ३२६ चे जाहीर वाचन करण्यात आले.'मत वाचवा - देश वाचवा' या घोषणेसह जोपर्यंत मतदारांच्या हक्कांचे रक्षण होत नाही आणि दोषींवर कारवाई केली जात नाही, तोपर्यंत हा संघर्ष आणि लढा निरंतर सुरूच राहील, असा इशारा या जनआंदोलनाद्वारे देण्यात आला. या आंदोलनाची गांभीर्याने

दखल घेऊन वरिष्ठ स्तरावरून योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी विनंतीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या प्रसंगी परिक्षित जगताप, काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष अमोल दि. होले, ` विठ्ठल जगताप, रावसाहेब शेळके, विनोद जोशी, सतीश चौधरी, राजेंद्र राजनेकर, बाळासाहेब ठाकरे, श्रीनिवास सूर्यवंशी, अनिल सौदागर, छोटू सूर्यवंशी, प्रशांत कोल्हे, सुधीर नालगे जयंत शेळके, प्रफुल कोकाटे, देवानंद खुणे, श्याम पणपालिया, भावेश देशमुख, राजू लांजेवार, वसंतराव गाढवे, अशोकराव चौधरी, अजय होटे, सक्षम वानखडे, अर्जुन देशमुख, सुमित सरदार, विक्रांत भैसे, शैजात सौदागर, सागर दुर्योधन आणि इंडिया आघाडीचे सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काटसुर, वणी सुलतानपूर येथील

यांनी जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता यांना निवेदनाद्वारे दिला आहे.तिवसा तालुक्यातील वणी सुलतानपूर येथील मुख्य रस्त्यावरील पूल गेल्या २ वर्षाआधी पूर्णतः खचलेल्या अस्वस्थेत असून सदर पुलावर कुठल्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता आहे. मागील महिन्यात स्थानिक पत्रकारांनी या पुलाचे वृत्तांकन करून प्रशासनासमोर ही गंभीर बाब उघडकीस आणली होती. परंतु आचारसंहितेचे कारण पुढे करून अद्यापही पुलाचे बांधकामाला सुरुवात न झाल्याचे चित्र आहे. याचसोबत काटसुर येथील मुख्य पूल अतिशय धोकादायक व क्षतीग्रस्त झाला असून पुलाला मोठमोठे खड्डे पडलेले असून दोन्ही बाजूला कठडे नाही तेव्हा दोन्ही गावातील पुलाचे प्राधान्याने बांधकाम हाती घेण्यात यावे या मागणीसाठी वंचित बहुजन युवा आघाडीने आक्रमक पवित्रा घेत जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता यांना निवेदन सादर केले आहे.निवेदन सादर करतेवेळी वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते यांच्यासमवेत उपसरपंच सिद्धार्थ कटारने, आशिष भगत, विलास मसलदी, विनोद मसलदी, विनोद खाकसे, अमोल जवंजाळ, शैलेश बागडे, नितीन थोरात सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## PNG गॅस पाईपलाईनला मार्क्सवादा

२०२६ रोजी शहरातील पद्मपाणी मंगल कार्यालय येथे एक जनजागृती मोहीम/कार्यक्रम आयोजित करण्यात आला . मात्र, हा प्रकल्प सर्वसामान्य नागरिकांच्या जिवाशी खेळणारा असल्याचा आरोप करत माकपच्या शहर व तालुका कमिटीने थेट विरोध दर्शविला आहे.

हा गॅस अत्यंत धोकादायक आणि मानवी आरोग्यास हानिकारक असल्याने नांदगाव खंडेश्वर शहराला PNG गॅसपासून पूर्णपणे मुक्त ठेवण्यात यावे, अशी मागणी कम्युनिस्ट पक्षाने केली आहे. प्रशासनाने या निवेदनावर मानवी दृष्टिकोनातून तात्काळ विचार न केल्यास, शहरातील नागरिकांची भक्कम एकजूट करून प्रशासनाविरुद्ध तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा गर्भित इशारा पक्षाच्या वतीने माकप चे जिल्हा सचिव श्याम शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली देण्यात आला आहे.

## नांदगाव तालुक्यात ३५००० मतदारांची

पक्ष CPI ,मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष CPM , शिवसेना उबाठा पक्ष मोर्चात सहभागी होते .

कांग्रेस नेते माजी आमदार प्रा विरेंद्र जगताप व भाकप नेते कॉ .तुकाराम भस्मे यांच्या नेतृत्वात इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांनी नांदगाव खंडेश्वर येथील बसस्थानकापासून तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढला व तहसीलदार यांना निवेदन दिले . या वेळी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदारांचे अधिकार आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणाच्या मागण्या करण्यात आल्या.

मोर्चानंतर तहसीलदार यांच्यामार्फत भारताच्या राष्ट्रपतींना मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता कायम ठेवावी, मतदारांचे अधिकार सुरक्षित ठेवावेत, फॉर्म सहामधील बदलांना स्थगिती देऊन त्यांचा पुनर्विचार करावा आणि एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या.

नांदगाव खंडेश्वर तालुक्यात ३५००० मतदारांची नावे एस आय आर प्रक्रियेच्या पहिल्या स्टेजमध्ये बाद झालेली आहेत .एवढ्या मोठ्या संख्येने मतदारांना त्यांच्या हक्कापासून वंचित करणे चिंताजनक आहे असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

तहसीलदार यांना निवेदन सादर करतेवेळी या आंदोलनात शिवसेना उबाठाचे नगरसेवक प्रकाश मारोटकर ,भाकपचे जिल्हा सचिव कॉ . सुनिल मेटकर ,तालुका सचिव कॉ संतोष सुरजुसे , कांग्रेसचे तालुकाध्यक्ष समीर पाटील , शहराध्यक्ष अमोल धवसे , माकप तालुका सचिव कॉ . श्याम शिंदे , कृ.उ. बा . समितीचे संचालक कॉ . ओमप्रकाश सावळे , युवक कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष दिपक भगत , शिवसेनेचे शहरप्रमुख प्रशांत काळे , भाकपचे कॉ . हरिदास राजगिरे , कॉ . हनुमान शिंदे , कॉ . जया मंडवधरे , कॉ .पुरुषोत्तम टापरे , कॉ अरुण शिंदे , कॉ . किशोर शिंदे , कॉंग्रेस कार्यकर्ते रमेश ठाकरे ,सर्फराज खान , गजानन भडके, निशिकांत जाधव , मोहमद रियाज , शिवाजी चव्हाण , राहुल गुल्हाणे , अतुल ठाकुर ,विनोद जगताप , राजेंद्र सरोदे , मोरेश्वर दिवटे , ज्योतीपाल चवरे , नितिन इंगोले , सुशिल थोरात , गौतम सोनोने, सुनिल शिरभाते ,प्रफुल कापडे , भैय्यापाटील धवस ,सुरेश तांदूळकर ,शेख हारुण शेख युसुफ ,मोहम्मद जुनेद , राजेश पारधी , नागोराव शिंदे , ऋषीकेश मुंदे , तुषार उईके ॲड .मोहन जाधव , सैयद युनुस , बाळासाहेब मुरादे , विठोबा सातपुते , पुंडलिक शेंडे , प्रविण माहुलकर , मारोती काळेकर , सुरेश अवघड , गजानन गंधे यांचे सह अनेकांचा सहभाग होता.

## खोडगाव येथील गरीब कुटुंबाला

तालुक्यातील खोडगाव येथील रहिवासी विवेक दुर्योधन रामेकर यांनी मोतीलाल ओसवाल होम फायनान्स कंपनीकडून गृहकर्ज घेतले होते. मात्र, निसर्गाची अवकृपा, दुष्काळजन्य परिस्थिती आणि हाताला काम नसल्यामुळे कर्जाचे काही हप्ते वेळेत भरता आले नाहीत. या आर्थिक अडचणीचा कोणताही सहानुभूतीपूर्वक विचार न करता फायनान्स कंपनीने कारवाई करत रामेकर यांच्या घराला कुलूप लावून ताबा घेतला होता. अचानक डोक्यावरचे छप्पर हिरावले गेल्याने हे कुटुंब उघड्यावर आले होते.

ही बाब समजताच खासदार वानखडे यांनी तात्काळ खोडगाव येथे धाव घेत घटनास्थळाची पाहणी केली. रामेकर कुटुंबाची व्यथा जाणून घेतल्यानंतर त्यांनी जागेवरूनच फायनान्स कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना व कायदेशीर सल्लागारांना फोन लावून तीव्र शब्दांत जाब विचारला. खासदार वानखडे यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे कंपनी प्रशासनाचे धाबे दणाणले. दिलेल्या मुदतीत कंपनीच्या प्रतिनिधींनी खोडगाव येथे येऊन अधिकृतपणे घराची चाबी विवेक रामेकर यांच्या स्वाधीन केली. खासदारांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे बेघर होण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या गरीब कुटुंबाला पुन्हा स्वतःच्या हक्काचे घर मिळाले. यावेळी आमदार गजानन लवटे , प्रदीप देशमुख , संजू सरोदे , योगेश नेमाडे , अतुल खारोडे , संजय येऊल ,शुभम वाघ यांच्या सह मोतीलाल हाऊसिंग फायनान्स चे अधिकारी , रामेकर कुटुंबातील सदस्य व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## अचलपूरात बंदूकीचा धाक दाखवून

साठी पेनही मागितला.त्याच वेळी आफकच्या आई (वय ६०) या नमाज पठणासाठी जात असताना, दोन्ही संशयितांनी त्यांचे तोंड दाबून त्यांना एका खोलीत बंद केले. हा सर्व प्रकार पाहून घरातील सून धावत आली, तेव्हा दरोडेखोरांनी तिच्या गळ्यातील सोन्याची पोत ओढण्याचा प्रयत्न केला आणि चाकू व बंदुकीचा धाक दाखवून घर लूटण्याचा प्रयत्न केला. तक्रार कर्ता महिलेचा मुलगा जि प शाळेमध्ये शिक्षक असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे.घराला पाठीमागून दार असल्याने महिलेने प्रसंगावधान राखून जोरदार आरडाओरडा केला. आवाजामुळे आजूबाजूचे नागरिक तातडीने घटनास्थळी जमा झाले. लोकांची गर्दी जमल्याचे पाहून दरोडेखोरांनी घाईगडबडीत चाकू तिथेच सोडून पळ काढला. या झटापटीत संबंधित महिलेच्या तोंडावर किरकोळ दुखापत झाली आहे. घटनेची माहिती मिळताच अचलपूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसराची पाहणी करून घटनास्थळावरून एक चाकू जप्त केला आहे. या धाडसी चोरीच्या प्रयत्नामुळे अल करीम कॉलनी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस आरोपींचा कसून शोध घेत आहेत. घटनास्थळी श्वान पथक फॉरेन्सिक टीमही बोलविण्यात आली होती. त्यांनी तपास सुरू केला आहे.

## शेतक-यांच्या दिवाळीसाठी ९ हजार कोटींची मदत; सावरकरांचा दावा

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या देवानंद ताले यांच्यासह कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यातील शेतकऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, यासाठी महायुती सरकारने ९ हजार कोटी रुपयांची मदत जाहीर केली असून, काँग्रेसने १६ वर्षांत शेतकऱ्यांना केवळ २२ कोटी रुपयांची मदत केल्याचा दावा आमदार रणधीर सावरकर यांनी केला. शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे हे सरकार असल्याचेही त्यांनी सांगितले.



अकोल्यातील भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात आयोजित पक्षप्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (सुप्रिया सुळे गट) कार्याध्यक्षपदावर असलेले देवानंद ताले यांनी आपल्या समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास वाढत असल्याचे सावरकर म्हणाले. तसेच, एसआयआरला विरोध करणाऱ्या काँग्रेसने नेमकी कोणाची नावे मतदारयादीतून वगळली, हे स्पष्ट करावे, असे आव्हानही त्यांनी दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयंत मसने होते. यावेळी विजय अग्रवाल, डॉ. किशोर मालोकार, ॲड. देवाशिष काकड, माधव मानकर, अंबादास उमाळे, संजय गोटफोडे, पवन महल्ले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. देवानंद ताले यांच्यासह संदानंद भदे, ऋषिकेश गोरे, गणेश भदे, दत्ता चराटे, सोपान मालठाणे, केतन गोहाडे, महेश भिवटे, आशिष काळे, अमोल चिकटे आणि अन्य कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

## सिरत क्वीज़ बक्षीस वितरण समारोह उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | रिसोड ■

इस्लाम धर्माचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जीवन विषयावर आधारित सिरत क्वीज़ बक्षीस वितरण समारोह दिनांक ११ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता रिसोड येथील डॉक्टर अल्लामा इकबाल उर्दू हायस्कूल येथे उत्साहात संपन्न झाला. जामिया इस्लामिया फ़ैज़ाने अबरार सीरतुन्नबी क्विज या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हाफिज अब्दुल हमीद खान हे होते तर कार्यक्रमासाठी विशेष प्रमुख वक्ता म्हणून गुजरात येथून आलेले क़ारी उसामा साहब हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रिसोड शहरातील विविध भागातील इमाम मंचावर उपस्थित होते. गेली २ महिन्यापासून सदर स्पर्धा ही रिसोड शहर व तालुक्यातील विविध भागातील उर्दू शाळेत घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या जीवन विषयावर आधारित ३०० प्रश्नाची परीक्षा घेण्यात आली होती. यामध्ये सात विद्यार्थी हे बक्षीसासाठी पात्र झाले होते. सदर स्पर्धा ही मौलना ओवैस खाऩ अशरफ़ी यांच्या नेतृत्वात घेण्यात आली होती.

## विद्यार्थ्यांनी स्वच्छतादूत म्हणून जबाबदारी निभवावी : उपशिक्षणाधिकारी कृष्णा बिरादार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःच्या स्वच्छतेपुरते मर्यादित न राहता समाजातही स्वच्छतेचे विचार रुजवावेत. स्वच्छतेचे महत्त्व इतरांना पटवून देत विद्यार्थ्यांनी खऱ्या अर्थाने स्वच्छतादूत म्हणून आपली जबाबदारी पार पाडावी, असे प्रतिपादन उपशिक्षणाधिकारी कृष्णा बिरादार यांनी केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अंबादास कऱ्हे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जगन्नाथ इंगळे, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे क्षमता बांधणी तज्ज्ञ प्रफुल्ल काळे, जनसंपर्क अधिकारी राम श्रृंगारे, मनुष्यबळ विकास सल्लागार शंकर आंबेकर आणि पाणी गुणवत्ता सल्लागार अभिजीत दुधाटे उपस्थित होते.

जागतिक हात धुवा दिनानिमित्त (१५ ऑक्टोबर) भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय



जिल्हा परिषद शाळा, साखरा येथे विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शंकर आंबेकर यांनी विद्यार्थ्यांना हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. योग्य पद्धतीने हात धुण्याचे महत्त्व, हात धुण्याच्या विविध पायऱ्या तसेच दैनंदिन जीवनात स्वच्छतेच्या सवयी अंगीकारण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या निर्देशानुसार, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गजानन खुळे यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा, आरोग्य केंद्रे आणि ग्रामपंचायतींमध्ये जागतिक हात धुवा दिन साजरा करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत जिल्ह्यात विविध ठिकाणी हात धुवा दिनानिमित्त जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी राम श्रृंगारे आणि शंकर आंबेकर यांनीही विद्यार्थ्यांशी संवाद साधला. जेवणापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर तसेच आवश्यक त्या वेळी साबणाने हात धुणे ही आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची सवय आहे.

## प्रभाग क्रमांक ७ मध्ये मच्छरांचा प्रकोप; चार नागरिकांना डेंग्यूची लागण!

### घंटागाडीची अनियमितता, धूळफवारणीचा अभाव

■ प्रतिनिधी | कारंजा ■

नगरपरिषदेच्या हद्दवाढीत नव्याने समाविष्ट झालेल्या प्रभाग क्रमांक ७ मध्ये अस्वच्छतेची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, डास-मच्छरांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सद्यस्थितीत या प्रभागातील अंदाजे चार नागरिकांना डेंग्यूची लागण झाल्याची माहिती असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. कचरा संकलनातील अनियमितता, नाल्यांची अपुरी स्वच्छता आणि संपूर्ण प्रभागात धूळफवारणी न झाल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

प्रभागात ठिकठिकाणी साचणारा कचरा, नाल्यांमध्ये जमा होणारा गाळ आणि स्वच्छतेच्या कामातील अनियमितता यामुळे डासांच्या उत्पत्तीस पोषक परिस्थिती निर्माण होत असल्याचे चित्र आहे. डेंग्यूचा वाढता धोका लक्षात घेता नगरपरिषदेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाने तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### आठ-आठ दिवस घंटागाडीची प्रतीक्षा!

घरगुती कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी उपलब्ध असलेली घंटागाडी प्रभाग क्रमांक ७ मध्ये नियमितपणे येत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. एकदा घंटागाडी आल्यानंतर पुढील सात ते आठ दिवस ती संबंधित घरांकडे फिरकत नसल्याचे नागरिक सांगतात. या समस्येबाबत वारंवार तक्रारी करूनही ठोस उपाययोजना झालेली नसल्याचा आरोप आहे. कचरा संकलनाचे कंत्राट नव्याने देण्याच्या प्रक्रियेमुळे अडचण निर्माण झाल्याचे संबंधितांकडून सांगितले जात असले, तरी ही समस्या मागील वर्षभरापासून कायम असल्याचे नागरिकांचे



म्हणणे आहे.

### नाल्यांतील गाळ आणि धूळफवारणीचा अभाव

नाल्या नियमितपणे उपसणे, त्यातून काढलेल्या गाळाची योग्य विल्हेवाट लावणे आणि परिसरात कीटकनाशकांची फवारणी करणे या बाबींकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार आहे. प्रभागाच्या भौगोलिक विस्ताराच्या तुलनेत सफाई कर्मचाऱ्यांची पुरेशी नियुक्ती नसल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. नियुक्त कर्मचारी प्रत्यक्ष प्रभागात काम करण्याऐवजी ऐनवेळी इतर प्रभागांत कार्यरत असल्याचे चित्र दिसून येत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, संपूर्ण प्रभागात अद्याप एकदाही धूळफवारणी करण्यात आलेली नसल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे. डास-मच्छरांचा वाढता प्रादुर्भाव आणि डेंग्यूच्या रुग्णांची नोंद लक्षात घेता, नियमित स्वच्छता, साचलेल्या पाण्याचे व्यवस्थापन, डासांच्या अळ्यांचा नायनाट आणि आवश्यक फवारणी तातडीने करण्याची मागणी होत आहे.

### पाणीटंचाई आणि पथदिव्यांचाही प्रश्न

प्रभागातील अनेक नागरिकांना पाण्यासाठी कूपनलिकांवर अवलंबून राहावे लागते. मात्र, सध्याच्या पाणीटंचाईमुळे कूपनलिका कोरड्या पडत असल्याने नागरिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पाणीपुरवठा पाइपलाइन अद्याप संपूर्ण प्रभागात पोहोचलेली नाही. यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी मागणी केल्याचे सांगण्यात येते. त्याचप्रमाणे, अनेक भागांत पथदिव्यांची व्यवस्था अपूर्ण असून, काही ठिकाणी दिवे लावण्यासाठी आवश्यक विद्युत तारांची जोडणीही झालेली नाही. त्यामुळे मूलभूत सुविधांअभावी नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

### भटक्या कुत्र्यांचा त्रासही वाढला

प्रभागातील भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव नागरिकांसाठी आणखी एक चिंतेचा विषय ठरत आहे. या कुत्र्यांचा बंदोबस्त करून नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे. निसर्गनिर्मित पाणीटंचाईचा सामना करत असतानाच अस्वच्छता, डास-मच्छरांचा प्रादुर्भाव आणि डेंग्यूचा धोका यांमुळे प्रभाग क्रमांक ७ मधील नागरिकांची चिंता वाढली आहे. नगरपरिषदेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाने केवळ तात्पुरती उपाययोजना न करता नियमित घंटागाडी, नाल्यांची स्वच्छता, गाळाची योग्य विल्हेवाट, धूळफवारणी आणि डेंग्यू प्रतिबंधक मोहिमेसाठी ठोस कृती आराखडा राबवावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने निव्वळ बोलून चालून वेळ काढू धोरण न अवलंबीता प्रत्यक्षपणे ठोस कार्यवाही करण्यावर भर देऊन येथील नागरिकांच्या समस्या सोडवाव्यात अशी मागणी करण्यात येत आहे. नगरपरिषद हद्दीमध्ये समाविष्ट होऊन आज रोजी जवळपास दहा वर्षाचा कालावधी उलटून सुद्धा नगर परिषदेच्या अपेक्षित असलेल्या कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे येथील नागरिक व लोकप्रतिनिधी नगरपरिषद प्रशासनावर कमालीचे नाराज असल्याचे बोलल्या जात आहे.

## ऑस्ट्रेलियातील तीन विदेशी पर्यटकांची काटेपूर्णा अभयारण्याला भेट



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

वाशिम जिल्ह्याची नैसर्गिक संपदा असलेल्या काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याला १४ ऑक्टोबर रोजी ऑस्ट्रेलियातील तीन विदेशी पर्यटकांनी भेट दिली. नील ग्लीन (Neil Glynn), जोआना ग्लीन (Joanne Glynn) आणि व्हिव्हियन काइट (Vivien Kite) यांनी यावेळी जंगल सफारीचा आनंद घेत अभयारण्यातील समृद्ध जैवविविधतेचा अनुभव घेतला.

सफारीदरम्यान पर्यटकांना कोल्हे, चितळांचे व माकडांचे कळप, नीलगाय, मुंगुसांची जोडी आणि घोरपड यांसारखे वन्यप्राणी दिसले. तसेच सर्पगरुड, किंगफिशर, ब्लॅक ड्रॉन्गो, रंगीत करकोचा, हनी बझार्ड आणि जंगल डव्ह यांसह विविध पक्ष्यांचे दर्शन घडले. अभयारण्यातील जलाशय परिसरात रिव्हर टर्न, पानबगळे आणि इतर पाणपक्षीही पाहायला मिळाले. सफारीदरम्यान पर्यटकांशी इंग्रजीत संवाद साधून त्यांना अभयारण्यातील वन्यजीव, पक्षी आणि जैवविविधतेविषयी माहिती देण्यात आली. या संवादातून अभयारण्याचे नैसर्गिक महत्त्व आणि वन्यजीव संवर्धनाची गरज त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. सफारीनंतर तिन्ही पर्यटकांनी काटेपूर्णा अभयारण्याबाबत समाधान व्यक्त केले. आणि भविष्यात पुन्हा भेट देण्याची इच्छा दर्शविली. विदेशी पर्यटकांच्या या भेटीमुळे काटेपूर्णा अभयारण्यातील नैसर्गिक सौंदर्य, आणि वन्यजीव पर्यटनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळण्यास मदत होणार आहे.

## जमिनीचे आरोग्य जपण्यासाठी राज्यभरात 'खेत बचाओ अभियान'

**अकोला :** जमिनीचे आरोग्य सुधारणे, रासायनिक खतांचा संतुलित वापर वाढविणे, जलसंधारणाला प्रोत्साहन देणे आणि नैसर्गिक शेतीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या निर्देशानुसार २२ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत देशभरात 'खेत बचाओ अभियान' राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्रातही हे अभियान सर्व जिल्ह्यांमध्ये प्रभावीपणे राबविण्यात येणार असून, यासंदर्भात कृषी आयुक्तालयाने विभागीय व जिल्हास्तरीय कार्यालयांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. शेतीची उत्पादकता टिकवून ठेवण्यासाठी जमिनीची सुपीकता आणि मृदा आरोग्य जपणे आवश्यक आहे.

## गोवंश संरक्षण आणि भारतीय संस्कृतीच्या जतनासाठी व्यापक जनसहभागाचे आवाहन

■ प्रतिनिधी | मानोरा ■

गोवंशाचे संरक्षण, संवर्धन आणि संगोपनाला चालना देण्यासोबतच समाजात गोसेवेची भावना रुजविण्याच्या उद्देशाने तीर्थक्षेत्र पोहरादेवी येथे ५ नोव्हेंबर रोजी भव्य महागोदान महासोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र गोसेवा आयोग आणि अखिल भारतीय बंजारा लमानी शक्तिपीठ, तीर्थक्षेत्र पोहरादेवी यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या महासोहळ्याच्या पूर्वनियोजन बैठक १४ आक्टोबर ला पोहरादेवी येथे पार पडली यावेळी गोसेवेच्या कार्याला व्यापक सामाजिक चळवळीचे स्वरूप देण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला.



या बैठकीच्या अध्यक्षस्थानी आमदार तथा धर्मगुरू बाबुसिंग महाराज होते. महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा आणि महंत सुनील महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्रातील विविध गोशाळांचे अध्यक्ष, सचिव, गोसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने बैठकीत सहभागी झाल्या.

गोवंश संरक्षणातून सेवाभावी संस्कृतीचा जागर

महागोदान महासोहळ्याचा मुख्य उद्देश गोवंशाचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या कार्याला प्रोत्साहन देणे, गोशाळांच्या माध्यमातून गोसेवेचे कार्य बळकट करणे आणि या कार्यात समाजातील विविध घटकांचा सहभाग वाढविणे हा आहे. भारतीय संस्कृतीत गोसेवेला असलेले धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्यासोबतच सेवाभाव, दायित्व आणि सामाजिक एकोपा वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महासोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

गोवंशाचे संगोपन, निराधार व गरजू गोवंशाच्या संरक्षणासाठी प्रयत्न, गोशाळांच्या कार्याला प्रोत्साहन आणि गोसंवर्धनाबाबत जनजागृती या व्यापक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी अशा उपक्रमांची भूमिका महत्त्वाची ठरते. गोसेवा ही केवळ धार्मिक श्रद्धेपुरती मर्यादित न राहता सामाजिक जबाबदारी म्हणूनही स्वीकारली जावी, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा विचार आहे. महासोहळ्याच्या यशस्वितेसाठी नियोजन बैठकीत ५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महासोहळ्याच्या विविध नियोजनात्मक बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## तुळजापूरच्या गर्भगृहाची आठवण करून देणारे मालेगावातील स्वयंभू तुळजाभवानी मंदिर



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

केळी रस्त्यावर शहरालगत असलेले स्वयंभू श्री तुळजाभवानी मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे. मंदिरातील गर्भगृहाची रचना श्री क्षेत्र तुळजापूर येथील तुळजाभवानी मंदिराच्या गर्भगृहाची आठवण करून देणारी आहे. त्यामुळे येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना विशेष आध्यात्मिक अनुभूती मिळते. नवरात्रोत्सवानिमित्त मंदिराची रंगरंगोटी करण्यात आली असून, आकर्षक विद्युत रोषणाईने मंदिर परिसर उजळून निघाला आहे.

स्व. तुळजारामजी गाभणे यांची श्रद्धा अन् मंदिराची उभारणी स्वयंभू श्री विठ्ठलाची मूर्ती मंदिरात स्थापन केल्यानंतर स्वर्गीय तुळजारामजी गाभणे यांना आपल्या शेतात श्री तुळजाभवानीची मूर्ती असल्याची जाणीव झाली. श्री निलनाग महाराज आणि श्री चंदनशेष महाराज यांनीही त्यास पुष्टी दिल्याचे सांगितले जाते. त्यानंतर गाभणे यांनी तुळजाभवानी मंदिराच्या उभारणीला सुरुवात केली. ज्या ठिकाणी मूर्ती असल्याची त्यांची श्रद्धा होती, त्या ठिकाणी नियमित पूजा-अर्चा आणि आरती केली जात असे.

## 'यंदाची दिवाळी साजरी करणार नाही' न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा निर्धार!

### राज्य शासनाकडे प्रलंबित मागण्यांसाठी कार्यरत कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा इशारा; तर सेवानिवृत्तांचा आमरण तसेच साखळी उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

'समान काम समान वेतन' या तत्त्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रलंबित मागणीसाठी राज्यातील न्यायिक कर्मचाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. राज्य सरकारने मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याने शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'यंदाची सन २०२६ ची दिवाळी साजरी करणार नाही' असा निर्णय राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयातील कार्यरत न्यायिक कर्मचाऱ्यांनी घेतला असून, जेष्ठ सेवानिवृत्त न्यायिक कर्मचाऱ्यांनी सन २०२६ च्या दिवाळी सणाच्या पहिल्या दिवसापासून आमरण तसेच साखळी उपोषणाचा कठोर निर्णय घेतला आहे.

दरम्यान शासनावर नाराजी आणि कर्मचाऱ्यांमध्ये संतापाची लाट मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजी सुधारित वेतनश्रेणीचा परिपक्व प्रस्ताव मंजूर करून राज्य सरकारकडे पाठवला आहे. मात्र जवळपास २० महिने उलटून गेल्यानंतरही या प्रस्तावावर शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. यामुळे शांत व न्यायप्रिय असलेल्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नैराश्य आणि तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर दि. १६ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या विशेष सर्वसाधारण सभेत तीव्र प्रतिक्रिया उमटून आंदोलनाचे हत्यार उपसण्याचा एकमुखी ठराव मंजूर करण्यात आला. पक्षकारांना वेठीस न धरता टप्प्याटप्प्याने आंदोलन करणार न्यायालयात येणारे पक्षकार, वकील आणि पोलीस तसेच वेगवेगळ्या कार्यालयांचे अधिकारी/कर्मचारी यांना त्रास होऊ नये, यासाठी न्यायिक कर्मचाऱ्यांनी राज्य शासनास पुरेसा वेळ देऊन लक्ष वेधण्यासाठी सुरुवातीला शांततेच्या मार्गाने आंदोलन करण्याची भूमिका घेतली आहे. मात्र, तरीही शासनाला जाग न आल्यास हे आंदोलन तीव्र केले जाणार आहे. अशी असेल कार्यरत न्यायिक कर्मचाऱ्यांची आंदोलनाची दिशा दि. १६ व १७ ऑक्टोबर २०२६ असे दोन दिवस काळ्या फिती लावून कार्यरत न्यायिक कर्मचारी कामकाज करतील.

५ नोव्हेंबर २०२६ रोजी (दिवाळी सणाचा पहिला दिवस व सुबारस) या दिवशी सर्व न्यायिक कर्मचारी एक दिवसाच्या सामूहिक रजेवर जाऊन कामकाज बंद ठेवतील. दिनांक ०६ व ०७ नोव्हेंबर २०२६ रोजी दिवाळीच्या सणासुदीच्या काळात कर्मचारी अन्नत्याग करून शांततेच्या मार्गाने आंदोलन करतील. १७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत शासनाने मागण्या मान्य न केल्यास नाइलाजास्तव राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयांतील न्यायिक कर्मचारी बेमुदत संपावर जातील. अशी असेल सेवानिवृत्त न्यायिक कर्मचाऱ्यांची आंदोलनाची दिशा दि. ०५ नोव्हेंबर २०२६ रोजी (दिवाळी सणाचा पहिला दिवस वसुबारस) काही सेवानिवृत्त न्यायिक कर्मचारी नाशिक येथे आमरण उपोषण सुरू करतील तसेच राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात सेवानिवृत्त न्यायिक कर्मचारी साखळी उपोषण सुरू करतील. राज्याचे मुख्यमंत्री यांना न्यायिक कर्मचाऱ्यांची भावनिक साद्या निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी मा. उच्च न्यायालयाने पाठवलेल्या प्रस्तावाला तातडीने मंजुरी द्यावी व न्यायप्रिय असलेल्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांना आंदोलनापासून परावृत्त करावे.

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३१९ ■ शुक्रवार, १६ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# वैनगंगा-नळगंगा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी शासनस्तरावर प्रयत्न करणार - पालकमंत्री

## शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यासाठी सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन; सेलू तालुक्यातील शेतक-यांनी दिले पालकमंत्र्यांना निवेदन

**सेलू जनमाध्यम :** विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या सुपीक जमिनी ताब्यात घेणार असाल, तर त्यांच्या भवितव्याची जबाबदारीही शासनाने स्वीकारली पाहिजे. वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहणाच्या हालचाली सुरू असताना सेलू तालुक्यातील रिंगणी, घोराड, जाखळा, कोळगाव आणि चिंचोली येथील शेतकऱ्यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी आक्रमक भूमिका घेत पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांना निवेदन दिले. प्रकल्पाच्या नावाखाली शेतकऱ्यांवर अन्याय सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या निवेदनातून देण्यात आला.



शेतकऱ्यांच्या सुपीक काळ्या जमिनीवर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. त्यामुळे अधिग्रहित जमिनीचा योग्य मोबदला द्यावा. उर्वरित जमिनीवरील हक्क अबाधित ठेवावेत. विहिरी, गोठे, झाडे आणि घरांचे स्वतंत्र मूल्यांकन करून भरपाई द्यावी. बाधित कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी, जमिनीचे नकाशे व मोजणी मोफत उपलब्ध करून द्यावी, तसेच रस्ते, सिंचनासाठी पाणी आणि वीज जोडणीची व्यवस्था करावी, अशा मागण्या शेतकऱ्यांनी मांडल्या.

प्रकल्पाचा लाभ विदर्भाला मिळणार असेल, तर त्याची किंमत शेतकऱ्यांनीच का मोजावी? हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. विकासाला विरोध नसला, तरी शेतकऱ्यांचे नुकसान करून विकास साधण्यास विरोध असल्याची भूमिका निवेदनातून मांडण्यात आली.

पालकमंत्री डॉ. भोयर यांनी शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनस्तरावर प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. प्रकल्पामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, यासाठी प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले. मात्र, शेतकऱ्यांना आता आश्वासनांपेक्षा ठोस निर्णय आणि न्याय्य मोबदल्याची प्रतीक्षा आहे.

# संभाव्य पाणी टंचाई निवारणासाठी क्षेत्रीयस्तरावर समन्वयाने काम करा - जिल्हाधिकारी

## देवळी व वर्धा तालुका पाणी टंचाई आढावा बैठक

### अवैध पाणी उपसावर कारवाई करण्याचे निर्देश

**वर्धा जनमाध्यम :** यावर्षी सरासरीच्या ३० टक्के कमी पाऊस झाला आहे. सद्या पाणी टंचाई नसली तरी भूगर्भातील पाणी पातळी कमी झालेली आहे. त्यामुळे पुढील काळात पाणी टंचाईची समस्या जाणवणार आहे. त्यामुळे जुन जुलै पर्यंत पिण्यासाठी व जनावरांसाठी पाणी पुरेल असे नियोजन करा. यासाठी अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय स्तरावर जाऊन समन्वयाने काम करुन काटकसरीने पाणी वापराबाबत जनजागृती करावी, अशा सुचना जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केल्या.



तहसिल कार्यालय देवळी येथे वर्धा व देवळी तालुक्यातील पाणी टंचाई व दुष्काळ निवारणार्थ उपाययोजना संबंधित आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी जिल्हाधिकारी बोलत होत्या. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, उपविभागीय अधिकारी कुश मोटवाणी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानदा फणसे, तहसिलदार समर्थ क्षिरसागर, संदीप पुंडेकर आदी उपस्थित होते.

प्रत्येक नागरिकाला प्रति दिन प्रति व्यक्ती ५५ लिटर पाणी उपलब्ध करुन देणे शासनाचे धोरण आहे. परंतु पाणी स्त्रोतातील उपलब्धतेनुसार पाणी वाटपात कपात करण्यात यावी. नळावर मोटरपंप लावून अवैधपणे पाणी वापरणाऱ्या व्यक्तींवर कार्यवाही करावी. गावातील प्रत्येक कुटूंबाला पिण्याचे पाणी मिळेल यासाठी नियोजन करा. गावात नळयोजनेच्या अनेक विहिरी असल्यास विहिरीवरुन आळीपाळीने पाणी पुरवठा करावा. अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर कार्यवाही करण्याच्या सुचनाही यावेळी देण्यात आल्यात.

बैठकीत वर्धा व देवळी तालुक्यातील पाणी टंचाईची सद्यस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, अवैध उपसा कारवाई, चारा नियोजन तसेच आगामी काळातील संभाव्य परिस्थितीचा जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर आढावा घेतला. अवैध पाणी उपसा, चारा व पाणी व्यवस्थेचे नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

पाणी पुरवठा आराखड्याचे नियोजन करतांना विहिर खोलीकरण, गाळ काढणे, खाजगी विहिर अधिग्रहण करणे, टँकर लावणे, प्रगतीपथावरील पाण्याची कामे पूर्ण करणे, नळ योजनांची विशेष दुरस्ती करणे, विंधन विहिरीची विशेष दुरस्ती करणे, विंधन विहिरी घेणे, तात्पुरत्या नळ योजना घेणे, बुडक्या घेणे या ९ पाणी पुरवठ्याचा आराखड्यात समावेश करण्यात यावा.

जलस्त्रोतांमधून होणाऱ्या अवैध उपसावर कठोर व तातडीने कारवाई करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाने चारा उपलब्ध राहतील असे नियोजन करावे. चाऱ्याची टंचाई होऊ नये यासाठी आगाऊ नियोजन करून आवश्यक ती व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले.

# अंगात देव संचारल्याचा दावा करणाऱ्यांपासून सावध राहा

## जादूटोण्याच्या नावाखाली शोषण; वैज्ञानिक दृष्टिकोनातून अंधश्रद्धेची पोलखोल

**वर्धा जनमाध्यम :** अंगात देव संचारल्याचा दावा करून लोकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेतला जातो. चमत्कारांच्या नावाखाली आर्थिक आणि मानसिक शोषण करणाऱ्यांपासून सावध राहा. फसवणूक झाल्यास पोलिसांत तक्रार करा, असे आवाहन अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे युवा राज्य संघटक तथा जादूटोणाविरोधी कायद्याचे तज्ज्ञ प्रशिक्षक पंकज वंजारे यांनी केले.

वर्ध्यातील कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क येथे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जादूटोणाविरोधी कायदा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

**प्रात्यक्षिकांतून अंधश्रद्धेची पोलखोल**

नारळाच्या साहाय्याने पाणी शोधणे, कापराच्या माध्यमातून अंगात भूत किंवा देवी संचारल्याचा आभास निर्माण करणे आणि चिंचेच्या झाडावरील भूत उतरविण्याच्या कथित प्रकारांमागील युक्त्या वंजारे यांनी प्रात्यक्षिकांतून उघड केल्या. अंधश्रद्धा आणि अवैज्ञानिक विचारांमुळे सामान्य नागरिकांची फसवणूक होते. त्यामुळे जादूटोणाविरोधी कायद्याची माहिती घेऊन समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे ही



तरुणांची सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर यांनी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारांचा संदर्भ देत अंधश्रद्धा आणि महिलांच्या शोषणाविरोधात समाजाने एकत्र येण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला सुहास लिहितकर, सतीश गंडेवार, प्रा. डॉ. नरेश पाटील, प्रा. डॉ. पूनम येसंबरे आणि होमराज रवांदळे उपस्थित होते. एम.एस.डब्ल्यू. व बी.एस.डब्ल्यू.चे विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# गौरक्षण वॉर्डात दूषित पाण्याचे संकट; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील गौरक्षण वॉर्डात सलग दोन दिवसांपासून दूषित आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार समोर आली आहे. पिण्याच्या पाण्यातून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत असून, नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा यंत्रणेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



नागरिकांना स्वच्छ पाणी देण्याची जबाबदारी असताना दूषित पाणीपुरवठा होत असल्याने प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची गरज आहे.

नगरसेवक डॉ. सुनील चरणसिंग चावरे यांनी या गंभीर प्रकाराबाबत नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली आहे. दूषित पाण्याचे नमुने तातडीने प्रयोगशाळेत तपासावेत, जलवाहिन्या आणि संपूर्ण पाणीपुरवठा व्यवस्थेची पाहणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे केवळ तक्रार स्वीकारून चालणार नाही, तर दूषित पाणीपुरवठ्याचे नेमके कारण शोधून दोष दूर करणे आवश्यक आहे.

बाधित भागातील पाणीपुरवठ्याची तपासणी करून नागरिकांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.

# संशोधनातून ज्ञानाची भरारी; वर्ध्यातील दोन अधिव्याख्यात्यांना पीएच.डी.

## विवेक राठोड आणि मिलिंद भोयर यांची शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी

**वर्धा जनमाध्यम :** अध्यापनासोबत संशोधनाची धुरा सांभाळणाऱ्या बोरगाव (मेघे) येथील इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इन फार्मसीमधील दोन अधिव्याख्यात्यांना आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. विवेक हिरासिंग राठोड आणि मिलिंद नेकराम भोयर यांनी संशोधन क्षेत्रात मिळविलेल्या या यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक क्षेत्रात मानाची भर पडली आहे.

विवेक राठोड यांनी वनस्पतीजन्य घटकांच्या नॅनो सस्पेंशनयुक्त ट्रान्सडर्मल पॅचेसचे सूत्रीकरण, अनुकूलन आणि मूल्यमापन या विषयावर संशोधन केले. तर मिलिंद भोयर यांनी उच्च रक्तदाबाच्या उपचारात



औषधांचा योग्य वेळी परिणाम साधण्यासाठी क्रोनोथेरपीवर आधारित प्रेस-कोटेड टॅबलेटची निर्मिती व मूल्यमापन या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला.

दोघांचेही संशोधनकार्य संस्थेचे प्राचार्य डॉ. भूषणकुमार एस. साठे यांच्या मार्गदर्शना खाली पूर्ण झाले. औषधानिर्माणशास्त्रातील संशोधनाला चालना देणारी ही कामगिरी मानली जात आहे.

या यशाबद्दल विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी आणि कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख यांनी दोन्ही अधिव्याख्यात्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या यशाचे शैक्षणिक वर्तुळातून स्वागत होत आहे.

# खडका येथील शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

## बोधनापूर शिवारातील नदीकाठच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळला मृतदेह

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** खडका येथील ४५ वर्षीय शेतकरी प्रफुल रामदास नान्हे यांचा मृतदेह गुरुवारी, १५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास बोधनापूर शिवारातील नदीकाठच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. बुधवारी घरातून बाहेर पडलेले नान्हे घरी परतले नसल्याने कुटुंबीय त्यांचा शोध घेत होते. या घटनेने खडका परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



प्राप्त माहितीनुसार, प्रफुल नान्हे हे बुधवारी, १४ ऑक्टोबर रोजी बाहेर जाऊन येतो, असे सांगून घरातून निघाले होते. मात्र, रात्र होऊनही ते घरी परतले नाहीत. त्यामुळे कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. दरम्यान, गुरुवारी सकाळी बोधनापूर येथील शेतशिवारात नदीकाठच्या झाडाला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळला. शेतात जाणाऱ्या व्यक्तीच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली.

# पशुधन तहानलेले, पशुपालक संकटात

## चारा डेपो सुरू करा; खासदार अमर काळे यांचे प्रशासनाला पत्र

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट गडद होत असताना आता शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या चारा-पाण्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. संकट गडद होण्याची वाट कशाला पाहता, असा प्रश्न उपस्थित करत खासदार अमर काळे यांनी प्रशासनाला तातडीच्या उपाययोजनांसाठी पत्र दिले आहे. चारा संपल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा आताच चारा डेपो सुरू करण्याचे नियोजन करा, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.



पावसाचे अपुरे प्रमाण, पिकांवरील संभाव्य परिणाम आणि ग्रामीण भागातील दुग्धव्यवसायाची परिस्थिती पाहता पशुपालकांसमोर आर्थिक संकट उभे राहण्याची शक्यता आहे. चारा महागला किंवा उपलब्धता घटली, तर जनावरांचे संगोपन करायचे कसे, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडू शकतो. त्यामुळे गरजू पशुपालकांना शासकीय मदत देण्यासह आवश्यक ठिकाणी चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी काळे यांनी केली.

जनावरांच्या पाण्याची व्यवस्था करण्याबरोबरच जंगलातील वन्यप्राण्यांसाठीही तात्पुरते पाणवठे निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. पाण्याचे स्त्रोत आटल्यास वन्यप्राण्यांची भटकंती वाढण्याची शक्यता असल्याने वन विभागानेही वेळीच पावले उचलावीत, असे त्यांनी म्हटले.

दुग्धव्यवसायावर अनेक कुटुंबांची उपजीविका अवलंबून आहे. त्यामुळे पशुधनाचे संरक्षण आणि पशुपालकांचे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने केवळ कागदी नियोजन न करता प्रत्यक्ष उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खासदारांनी केली आहे. आता प्रशासन या पत्राची कितपत दखल घेते आणि चारा-पाण्यासाठी प्रत्यक्ष कृती कधी सुरू होते, याकडे पशुपालकांचे लक्ष लागले आहे.

# शेतीच्या वादातून बहिण-भाच्याशी रस्त्यावरच राडा

## सेवाग्राम रेल्वे उड्डाणपुलाजवळ दुचाकी अडवून वाद

**वर्धा जनमाध्यम :** वडिलोपार्जित शेतीच्या हिस्सेवाटणीवरून सुरू असलेल्या न्यायालयीन वादाचे पडसाद रस्त्यावर उमटले. सेवाग्राम रेल्वे उड्डाणपुलाजवळ चारचाकी वाहन आडवे करून दुचाकीस्वार शेतकऱ्याला अडविण्यात आले. यावेळी बहिण आणि भाच्याने वाद घालत भाच्याने हेल्मेटवर जोरात बुक्की मारल्याची तक्रार रमेश बलखंडे (६२, रा. तरोडा) यांनी सेवाग्राम पोलिसांत दिली. याप्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रमेश बलखंडे यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या दहा एकर शेतीच्या हिस्सेवाटणीसाठी त्यांची बहीण चंदा जयपुरकर हिने वर्धा दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. या प्रकरणाची १४ ऑक्टोबर रोजी तारीख असल्याने रमेश हे भाऊ सुरेश यांच्यासोबत दुचाकीने वर्ध्याकडे जात होते.

दरम्यान, सेवाग्राम रेल्वे उड्डाणपुलाजवळ एमएच ०१ एएन ९५८० क्रमांकाच्या चारचाकीने त्यांची दुचाकी अडविल्याचा आरोप आहे. वाहनातून उतरलेल्या चंदा जयपुरकर आणि भाचा अश्विन जयपुरकर यांनी शेतीच्या पेरणीवरून वाद घातला. न्यायालयीन प्रकरणाचा निकाल लागल्यानंतर निर्णय घेऊ, असे रमेश यांनी सांगितले असता अश्विनने त्यांच्या हेल्मेटवर बुक्की मारल्याचे तक्रारीत नमूद आहे.

# शेताच्या वादातून ८३ वर्षीय वृद्धाला मारहाण

## लाकडी दांडक्याने धमकावत लाथाबुक्क्यांनी हल्ला; डाव्या हाताला फ्रॅक्चर

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** शेतजमिनीच्या जुन्या वादातून ८३ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना साहूर शिवारात घडली. या हल्ल्यात रामदास बाजीराव भोरे यांच्या डाव्या हाताला फ्रॅक्चर झाले. याप्रकरणी आष्टी पोलिसांनी राहुल टापरे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोरे यांच्या मुलाच्या नावावर बोरखेडी शिवारात तीन एकर शेती आहे. या जमिनीला लागून असलेल्या शेताच्या मालकीवरून टापरे कुटुंबासोबत न्यायालयात वाद सुरू असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.



१३ ऑक्टोबर रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास भोरे स्वतःच्या शेतात गवत काढत होते. जनावरांपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी लावलेली झटका मशीनची तार तुटू नये म्हणून त्यांनी बाजूला केली. यावरून राहुल टापरे याने त्यांच्याशी वाद घालत शिवीगाळ केली. तसेच लाकडी दांडक्याने मारण्याची धमकी देत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत भोरे यांच्या डाव्या खांद्याला आणि हाताला दुखापत झाली. वैद्यकीय तपासणीत डाव्या हाताला फ्रॅक्चर झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आष्टी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ११७(२), ३५२ आणि ३५१(३) अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार सतीश नंदागवळी करीत आहेत.

# एक गाव, एक गणपती, समुद्रपूरच्या विघ्नहर्त्याचा राज्यभर डंका

## महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव पुरस्कार जाहीर; आज मुंबईत मान्यवरांच्या हस्ते होणार गौरव

**समुद्रपूर जनमाध्यम :** गाव एक, गणपती एक आणि भक्तीचा धागा हजारो मनांना जोडणारा! सामाजिक एकोपा, धार्मिक श्रद्धा आणि सर्वधर्मसमभावाची परंपरा जपणाऱ्या समुद्रपूरच्या गणेश मंडळाने आता राज्याच्या राजधानीत आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. महाराष्ट्र शासनाच्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत समुद्रपूर गणेश मंडळाची पुरस्कारासाठी निवड झाली असून, आज मुंबईत या मंडळाचा राज्यस्तरीय गौरव होणार आहे. या यशामुळे समुद्रपूरच्या विघ्नहर्त्याच्या नावाचा डंका आता संपूर्ण महाराष्ट्रात गुंजणार आहे.



**'एक गाव, एक गणपती'तून सामाजिक ऐक्याचा संदेश**

सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे केवळ धार्मिक उत्सव नव्हे, तर समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारे लोकचळवळीचे व्यासपीठ आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक स्वरूप देत सामाजिक एकजुटीचा विचार समाजासमोर ठेवला. याच विचारांचा वारसा समुद्रपूर गणेश मंडळाने आजही जपला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे दरवर्षी उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा आयोजित केली जाते. या स्पर्धेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने परीक्षण केल्यानंतर समुद्रपूर गणेश मंडळाची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यामुळे मंडळाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक कार्याला राज्यस्तरावर मान्यता मिळाली आहे.

समुद्रपूरच्या नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी आणि गणेशभक्तांनी दिलेले सहकार्य हे या यशाचे महत्त्वाचे बळ ठरले आहे. मंडळाचे पदाधिकारी, प्रशासनातील अधिकारी आणि पत्रकार यांच्याही योगदानामुळे उत्सवाची परंपरा अधिक व्यापक झाली आहे.

जा. क्र, १९५० /२०२६
दि, ०७/१०/२०२६
पत्ता:-सार्वजनिक व्यास नोंदणी कार्यालय वर्धा
राजेश नरहरशेट्टीवार यांची इमारत
दुसरा माळा, हिरो शोरूमच्या मागे, मोहन नगर,
नामपुर रोड, वर्धा

## चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक २७८/ २६, कलम १९

**अर्जदार श्री. दिलीप रामजी मांडवकर**

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोदंणी क्रमांक विठठल रूख्मिनी देवस्थान सेवा समिती चांदणी, शिरपुर ता. आर्वी, जि वर्धा

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की. धर्मादाय उपआयुक्त सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत :-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय

(२) खाली निर्दीष्ठ केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकिची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत :- १३०००/-यांचे ट्रस्ट जवळ जमा आहे.
स्थावर मिळकत (वर्णन)-

निरंक

(अ) जंगम मिळकत :- १३०००/- यांचे ट्रस्ट जवळ जमा आहे.
स्थावर मिळकत : (वर्णन)

--निरंक

सदरच्या चौकशी प्रकणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व नोंदणी अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

हि नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०७/१०/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक**
**(न्याय शाखा) सार्वजनिक न्यास नोदंणी कार्यालय, वर्धा विभाग वर्धा**

# महिला हॉकीतील ४४ वर्षांची प्रतीक्षा संपली; खेळाडूंचे यश, देशाचे यश

## पंतप्रधान मोदी दिल्लीत आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदकविजेत्यांना भेटले

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज दिल्लीतील मेजर ध्यानचंद राष्ट्रीय स्टेडियमवर २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्यांची भेट घेतली. ते म्हणाले की, आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून भारतीय महिला हॉकी संघाने ४४ वर्षांची प्रतीक्षा संपवली आहे. खेळाडूंचे यश हेच देशाचे यश आहे.हा कार्यक्रम नवी दिल्लीतील मेजर ध्यानचंद राष्ट्रीय स्टेडियमवर पार पडला. या कार्यक्रमाला केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया आणि भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यादेखील उपस्थित होत्या.आयची-नागोया येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने एकूण ८५ पदके जिंकली. यामध्ये २१ सुवर्ण, २७ रौप्य आणि ३७ कांस्य पदकांचा समावेश आहे. पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर राहिला.



**संपूर्ण राष्ट्राचा अभिमान वाढतो.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, खेळाडूंमध्ये असण्याने त्यांना ऊर्जा मिळते. एकाच वेळी इतकी पदके जिंकलेल्या खेळाडूंना भेटणे हा एक विशेष अनुभव आहे. ते म्हणाले की, तरुण खेळाडूंनी दाखवून दिले आहे की, जेव्हा जिद्दीचे विजयात रूपांतर होते, तेव्हा केवळ पदकेच मिळत नाहीत, तर चेहऱ्यावर एक वेगळीच चमक येते. यामुळे संपूर्ण राष्ट्राचा अभिमान वाढतो.

**तरुण पिढी स्वतःचा मार्ग तयार करत आहेत-** पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताचे यश हे देशाच्या बदलत्या मानसिकतेचेही प्रतिबिंब आहे. हे यश दर्शवते की, आजची तरुण पिढी प्रत्येक क्षेत्रात यशाची नवी उंची गाठण्याची आकांक्षा बाळगते. तरुणांच्या दृढनिश्चयापेक्षा मोठे आव्हान नाही आणि त्यांच्या क्षमतेच्या पलीकडचे कोणतेही ध्येय नाही. त्यांच्यासमोर शक्यतांचे एक अमर्याद आकाश पसरलेले आहे आणि ते स्वतःचा मार्ग तयार करत आहेत.

**८५ पदकांपैकी ३८ पदके महिलांनी जिंकली.**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, १९८२ नंतर प्रथमच भारताने मॅरेथॉनमध्ये यश मिळवले आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे. त्यांनी विशेषतः महिला खेळाडूंचे कौतुक केले. ते म्हणाले की, भारताने जिंकलेल्या ८५ पदकांपैकी ३८ पदके महिला खेळाडूंनी जिंकली असून, त्यात ११ सुवर्ण पदकांचा समावेश आहे. ही पदके केवळ आकडेवारी नसून, ती एका नव्या भारताचे सशक्त चित्र रेखाटतात.

**भारताने २८ वर्षांनंतर वेटलिफ्टिंगमध्येही पदक जिंकले.**

ते पुढे म्हणाले, 'भारताने तिरंदाजीमध्ये पाच सुवर्णपदके जिंकली. नेमबाजीमध्ये उत्कृष्ट कामगिरी पाहायला मिळाली, तर भारतीय खेळाडूंनी बॉक्सिंग आणि कुस्तीमध्येही लक्षणीय यश मिळवले. खेळाडूंनी नवीन विक्रम प्रस्थापित केले आणि भारताने २८ वर्षांनंतर वेटलिफ्टिंगमध्येही पदक जिंकले.'

**भारतीय क्रिकेट संघाची प्रशंसा केली-** पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, नुकतेच झालेले आशियाई खेळ अनेक अर्थांनी संस्मरणीय ठरले. भारतीय पुरुष आणि महिला हॉकी संघाने सुवर्णपदके जिंकली. महिला हॉकी संघाने सुवर्णपदक जिंकून ४४ वर्षांची प्रतीक्षा संपवली. भारताच्या पुरुष आणि महिला क्रिकेट संघानेही सलग दुसऱ्यांदा पदके जिंकून आपल्या पूर्वीच्या विक्रमाची पुनरावृत्ती केली. दोन्ही संघांनी कबड्डीमध्ये सुवर्णपदके जिंकली.

**भारतीय महिला हॉकी संघाने ४४ वर्षांनंतर सुवर्णपदक जिंकले**

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला हॉकी संघाने चीनचा १-० असा पराभव केला. संघासाठी एकमेव गोल लालरेमसियामीने केला. यापूर्वी भारताने १९८२ मध्ये दक्षिण कोरियाचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले होते.

# शेतक-यांच्या तोंडाला पाने पुसली

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्यातील दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेता, शेतक-यांना अग्रीम मदत म्हणून सरकारकडून ५ हजार रूपये दिले जाणार आहेत. या बैठकीत दुष्काळाच्या दृष्टीने महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मात्र काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी दुष्काळग्रस्त शेतक-यांसाठी राज्य सरकारने जाहीर केलेल्या ५ हजार रुपये प्रति शेतकरी आग्रीम मदतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारची ५ हजारांची मदत शेतक-यांच्या कोणत्या अडचणी सोडवणार? असा सवाल वडेट्टीवार यांनी केला आहे.



विजय वडेट्टीवार यांनी 'एक्स' अकाउंटवर पोस्ट करत लिहिले की, शेतक-यांच्या तोंडाला ५ हजारांची पाने पुसू नका. राज्यातील शेतकरी पुढचं वर्ष कसं जगायचं, या चिंतेत आहे. कर्ज काढून शेती केली, सावकारी आणि खासगी कर्जाचा डोंगर उभा राहिला, पण घरात धान्याचा एक दाणाही आला नाही. अशा परिस्थितीत सरकारची ५ हजारांची मदत शेतक-यांच्या कोणत्या अडचणी सोडवणार?'

'५ हजार देऊन शेतक-यांच्या जखमेवर मीठ चोळले'

तसेच सध्या कुंभमेळा आणि शक्तिपीठ महामार्गासाठी केल्या जात असलेल्या खर्चावरूनही वडेट्टीवार यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. शेतक-यांना भरीव मदत करण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत, पण कुंभमेळा आणि शक्तिपीठ महामार्गासाठी सव्वा लाख कोटींच्या खर्चाचे नियोजन सुरू आहे. अनावश्यक खर्च थांबवा आणि शेतक-यांना मदत करा. कुंभमेळ्यापेक्षा संकटात सापडलेल्या शेतक-यांचे आशीर्वाद मिळवा. ५ हजार देऊन शेतक-यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे असे वडेट्टीवार यांनी म्हंटले आहे.

# वाचन प्रेरणा दिन वर्षभर साजरा व्हावा



**मुंबई /प्रतिनिधी-** भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणारा वाचन प्रेरणा दिन हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता वर्षातील ३६५ दिवस वाचनाची प्रेरणा देणारा असावा. मंत्रालयातील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचा-याने पुढील वाचन प्रेरणा दिनापर्यंत किमान एक पुस्तक वाचण्याचा संकल्प करावा, असे आवाहन मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात मराठी भाषा विभागाच्या वतीने आयोजित वाचन प्रेरणा दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच, मराठी भाषा विभागाच्या वतीने आयोजित पुस्तक प्रदर्शन व विक्री केंद्रांना मंत्री डॉ. सामंत यांनी भेट दिली. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिची समृद्ध परंपरा, सांस्कृतिक वारसा, साहित्यिक योगदान आणि वाचन संस्कृती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मराठी भाषा विभागाने विशेष उपक्रम राबविला. राज्यातील विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्व आणि तिची अभिजात परंपरा समजावून सांगणा-या या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला असून, दहा दिवसांत सुमारे दहा लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता आल्याचे, आणि हा एक नवा विक्रम प्रस्थापित झाल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले.

आजच्या काळात वाचन संस्कृती कमी होत असल्याची चिंता व्यक्त करताना, केवळ वाचन प्रेरणा दिन साजरा करून उद्दिष्ट साध्य होणार नाही, तर दैनंदिन जीवनात वाचनाची सवय रुजविणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. मराठी भाषा शिकविण्याच्या विभागाच्या उपक्रमांतर्गत सुमारे एक लाख ६७ हजार जणांना मराठी भाषेचे प्रशिक्षण देण्यात आले. मात्र, मराठी भाषिकांनी दैनंदिन व्यवहारात मराठीतून संवाद साधण्याची सवय लावली, तर इतर भाषिकांना मराठी शिकण्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षणाची गरजच भासणार नाही, असा आशावाद मंत्री डॉ. सामंत यांनी व्यक्त केला.

# एसटीच्या १५ टक्के हंगामी भाडेवाढीचा प्रस्ताव नामंजूर!-परिवहन मंत्री

**मुंबई/ प्रतिनिधी-** दुष्काळाच्या झळांनी होरपळणारा शेतकरी, महागाईमुळे आर्थिक ओढाताण सहन करणारा सर्वसामान्य नागरिक आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह करताना होणारी दमछाक, अशा परिस्थितीत जनतेवर भाडेवाढीचा अतिरिक्त भार कशासाठी, असा सवाल उपस्थित करत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिवाळीच्या गर्दीच्या हंगामासाठी प्रस्तावित केलेली १५ टक्के हंगामी भाडेवाढ नामंजूर केली.





दरवर्षी दिवाळीच्या गर्दीच्या काळात एसटीच्या प्रवासी भाड्यात हंगामी वाढ केली जाते. यंदाही १ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनाने मंत्री सरनाईक यांच्याकडे सादर केला होता. मात्र, आधीच आर्थिक संकटाचा सामना करणा-या जनतेवर आणखी भार टाकणे योग्य नसल्याची भूमिका घेत त्यांनी हा प्रस्ताव फेटाळून लावला. 'आधीच संकटांनी घेरलेल्या जनतेला भाडेवाढीचा चटका देऊन त्यांच्या जखमेवर मीठ चोळणे मला मान्य नाही,' असे स्पष्ट करीत त्यांनी जनहिताला प्राधान्य दिले.

एसटी महामंडळाला आर्थिक तोटा सहन करावा लागत असला, तरी त्याची भरपाई सर्वसामान्य प्रवाशांकडून करणे योग्य ठरणार नाही. एसटीची 'लालपरी' ही ग्रामीण महाराष्ट्रातील लाखो नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग आहे. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, नोकरदार, ज्येष्ठ नागरिक आणि कष्टकरी वर्गासाठी ती परवडणा-या प्रवासाचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे भाडेवाढीचा थेट परिणाम त्यांच्या दैनंदिन खर्चावर झाला असता. विशेषत: दुष्काळामुळे अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना हा अतिरिक्त भार सहन करणे कठीण झाले असते.'शासन संवेदनशील आहे. संकटाच्या काळात शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेला वा-यावर सोडणार नाही,' असा विश्वास व्यक्त करीत मंत्री सरनाईक म्हणाले की, जनतेच्या अडचणी समजून घेऊन तिला दिलासा देणे ही शासनाची जबाबदारी आहे. आर्थिक गणिते महत्त्वाची असली, तरी जनतेच्या वेदना आणि तिचा जगण्याचा संघर्ष यांचाही विचार होणे आवश्यक आहे.

'पर्यायी मार्गातून अडचणींवर मात करू'-एसटी महामंडळाच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी पर्यायी उपाययोजना शोधल्या पाहिजेत. दुर्गम गावांपासून शहरांपर्यंत सुरक्षित, विश्वासार्ह आणि परवडणारी प्रवासी सेवा उपलब्ध करून देणे हे महामंडळाचे मूलभूत कर्तव्य आहे. त्यामुळे आर्थिक तोट्याचे ओझे थेट प्रवाशांवर टाकण्याऐवजी त्यावर अन्य मार्गांनी तोडगा काढण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जनतेच्या संकटाच्या काळात त्यांच्या खिशाला हात घालण्यापेक्षा त्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसणे अधिक महत्त्वाचे आहे. एसटीच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी पर्यायी मार्ग शोधू; मात्र अडचणीत असलेल्या जनतेला दिलासा देण्याचे कर्तव्य विसरणार नाही,' या भूमिकेतून मंत्री सरनाईक यांनी प्रस्तावित भाडेवाढीला नकार देत सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला.

# महिला पत्रकारांवरील कथित हल्ल्याची चौकशी होणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** आंदोलनादरम्यान महिला पत्रकारांसोबत कथित मारहाण आणि गैरवर्तन झाल्याच्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे.



या आरोपांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे संकेत न्यायालयाने दिले आहेत. तसेच, महिला पत्रकारांना अटक न करण्याचे निर्देश दिल्ली पोलिसांना दिल्याचे वृत्त आहे. आंदोलनाशी संबंधित सर्व सीसीटीव्ही फुटेज आणि डिजिटल पुरावे सुरक्षित ठेवण्याचे आदेशही न्यायालयाने पोलिसांसह संबंधित यंत्रणांना दिले आहेत.मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांना दोन स्वतंत्र सीलबंद लिफाफ्यांमध्ये माहिती सादर करण्यास सांगितले. पहिल्या लिफाफ्यात पोलिसांकडून मारहाण किंवा गैरवर्तन झाल्याचा आरोप करणा-या महिला पत्रकारांची नावे देण्यास सांगण्यात आले आहे. तर, दुस-या लिफाफ्यात संभाव्य चौकशी समितीमध्ये समावेश करता येईल अशा निवृत्त महिला न्यायाधीश आणि वरिष्ठ पोलिस अधिका-यांची नावे सादर करण्यास सांगितले आहे.आंदोलनादरम्यान घडलेल्या घटनांची सत्यता तपासण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. सर्व कायदा अंमलबजावणी यंत्रणा आणि पोलिस अधिका-यांनी आंदोलनाशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज, डिजिटल रेकॉर्ड आणि अन्य उपलब्ध सामग्री सुरक्षित ठेवावी, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. याशिवाय, खासगी व्यक्ती आणि संबंधित पक्षांनाही त्यांच्याकडे उपलब्ध असलेले व्हीडीओ तसेच अन्य पुरावे जतन करून ठेवता येणार आहेत. आवश्यकतेनुसार हे पुरावे न्यायालयात सादर करता येतील.

# SC ने म्हटले- CJP आंदोलनाचे सीसीटीव्ही फुटेज सुरक्षित ठेवा

## आंदोलनस्थळ जंतर मंतरवरून हटवल्याबद्दल केंद्राला नोटीस

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** १० ऑक्टोबर रोजी दिल्लीत सीजेपीच्या आंदोलनादरम्यान मेट्रो स्टेशन आणि इंटरनेट बंद केल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान, आंदोलनस्थळ जंतर मंतरवरून हटवण्याच्या निर्णयासंदर्भात न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली. त्या दिवसाचे सर्व सीसीटीव्ही फुटेज जतन करण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.यापूर्वी, १० ऑक्टोबर रोजी दिल्लीतील इंटरनेट बंद केल्याबद्दल केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाची बिनशर्त माफी मागितली होती. गृहसचिव गोविंद मोहन यांनी न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि अफवांना आळा घालण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले होते.गोपाल शंकरनारायणन, कपिल सिब्बल आणि मेनका गुरुस्वामी यांनी न्यायालयात विरोधी पक्ष आणि आंदोलकांच्या वतीने युक्तिवाद सादर केला. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि गौरव भाटिया यांनी सरकारचे प्रतिनिधित्व केले. दिल्लीचे पोलिस आयुक्त अनुराग कुमार यांनी सांगितले की, आंदोलकांना रोखणे आणि ताब्यात घेणे हे कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक होते. त्यांनी CJP वर हिंसाचार, मालमत्तेचे नुकसान आणि लोकांना जखमी केल्याचा आरोप केला.



प्रतिज्ञापत्रात दिल्ली पोलिसांनी CJP यांच्या २० जुलै रोजीच्या NEET-UG पेपरफुटीविरोधी मोर्चालाही बेकायदेशीर आणि गैरकायदेशीर ठरवले आहे. पोलिसांनी सांगितले की, त्या मोर्चात सहभागी झालेले लोक बेकायदेशीर जमावाचा भाग होते. याचिकाकर्त्यांनी आरोप केला होता की, ९ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला निर्देश दिले होते की, आंदोलनामुळे दिल्ली मेट्रो आणि येथे येणाऱ्या गाड्यांच्या वाहतुकीवर पूर्णपणे बंदी घालू नये. त्यानंतरही शनिवारी न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन झाले. त्यानंतर न्यायालयाने रविवारी सुनावणीदरम्यान दिल्लीच्या अधिकाऱ्यांना नोटीस बजावून मंगळवारपर्यंत उत्तर मागितले होते. न्यायालयाने म्हटले होते की, मेट्रो सेवा सुरळीतपणे सुरू राहायला हव्यात. इंटरनेट सेवा बाधित होता कामा नये आणि लोकांची वाहतूक रोखली जाऊ नये.

# अभिनेता इम्रान खानला भारत सोडण्याची नोटीस

**मुंबई/ प्रतिनिधी-** अभिनेता इम्रान खानला मुंबई पोलिसांनी नोटीस बजावून २८ ऑक्टोबरपर्यंत भारत सोडण्याचे निर्देश दिले आहेत. इम्रान १० ऑक्टोबर रोजी मुंबईच्या ऑगस्ट क्रांती मैदानावर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या आंदोलनात सहभागी झाला होता. मुंबई पोलिसांनी इम्रान खानला १० ऑक्टोबर रोजी ताब्यात घेतले होते. ते २२-२३ जुलै रोजी नीट पेपर लीकच्या निषेधार्थ झालेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनातही सहभागी झाला होता. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, इम्रान भारतीय नागरिक नाहीत आणि तो विरोध प्रदर्शनात सहभागी झाला होता. या प्रकरणी त्याच्याविरुद्ध इमिग्रेशन कायद्याच्या संबंधित कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.



**इम्रान खानचा जन्म अमेरिकेत झाला-** इम्रानचा जन्म अमेरिकेतील विस्कॉन्सिन येथे झाला होता. जन्मापासूनच त्याच्याकडे अमेरिकेचे नागरिकत्व आणि अमेरिकन पासपोर्ट आहे.तो कायदेशीरदृष्ट्या भारताचे नागरिक नाहीत. भारतात राहण्यासाठी आणि काम करण्यासाठी ते ओव्हरसीज सिटिझनशिप ऑफ इंडिया (ध्र्ण्घ्) कार्डाचा वापर करतात.भारतात परदेशी नागरिकांचा प्रवेश, वास्तव्य आणि त्यांच्या गतिविधींवर नियंत्रण ठेवण्यासाठी इमिग्रेशन अँड फॉरेनर्स ?क्ट, २०२५ लागू आहे.यानुसार सरकार परदेशी नागरिकांच्या भारतातील वास्तव्यावर आणि त्यांच्या गतिविधींवर अटी घालू शकते. प्रदर्शनादरम्यान शनिवारी ताब्यात घेतल्यानंतर इम्रान खान यांनी पोलिसांच्या व्हॅनमधून आपला एक फोटो सोशल मीडियावर शेअर केला होता. त्यांनी लिहिले होते, 'बहुतेक मी ड्राइव्हवर जात आहे'. व्हॅनमधून समोर आलेल्या एका व्हिडिओमध्ये त्यांच्या चुलत बहिणी जैन यांनी त्यांना कधी तुरुंगात गेला आहात का, असे विचारले. त्यावर इम्रान यांनी सध्याची परिस्थिती पाहता तसे होण्याची शक्यता वाटत असल्याचे सांगितले. माध्यमांशी बोलताना इम्रान यांनी सांगितले की, पोलिसांनी त्यांना कोणतेही कारण नसताना रस्त्यावरून उचलून व्हॅनमध्ये बसवले होते.

# शाळेचे छत कोसळून २० मुलांचा मृत्यू

**कराची :** पाकिस्तानमधील पेशावर येथे शाळेचे छत कोसळल्याने वीस मुले आणि एका शिक्षिकेचा मृत्यू झाला आहे. लेडी रीडिंग हॉस्पिटलचे (एलआरएच) प्रवक्ते मुहम्मद आसिम यांनी' एका वर्तमापत्राला सांगितले की, ७ ते १२ वयोगटातील १८ मुले आणि दोन मुलींसह २० विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे.एका महिला शिक्षिकेचाही मृत्यू झाला आहे. त्यांनी पुढे सांगितले की, २१ जण जखमी झाले असून, त्यापैकी पाच जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांनी



सांगितले की, रुग्णालयात आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे.पेशावरचे उपायुक्त अफक वझीर यांनी 'एका वर्तमापत्राला दिलेल्या माहितीनुसार, अल खैर शाळेचे छत कोसळल्याने विद्यार्थी ढिगा-याखाली गाडले गेले. त्यांच्या कार्यालयातून जारी केलेल्या निवेदनानुसार, ही घटना घडली तेव्हा विद्यार्थी वर्गात होते. निवेदनात पुढे म्हटले आहे की, मुलांना वाचवण्यासाठी बचावकार्य सुरू असून, बचाव पथके ढिगारा हटवण्याचे काम करत आहेत.रेस्क्यू ११२२ चे प्रवक्ते बिलाल अहमद फैझी यांनी यापूर्वी सांगितले होते की, बचाव पथकांनी विद्यार्थी आणि शिक्षकांसह सुमारे २० जणांना रुग्णालयात दाखल केले आहे. त्यावेळी एलआरएचचा हवाला देत त्यांनी सांगितले होते की, या घटनेत चार जणांचा मृत्यू झाला आहे.एजन्सीच्या दुस-या एका निवेदनात यापूर्वी म्हटले होते की, १० हून अधिक मुलांना प्रथमोपचार देऊन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ढिगा-याखाली आणखी बरीच मुले अडकली असण्याची भीतीही व्यक्त केली जात होती. दरम्यान, खैबर पख्तुनख्वा (केपी) चे राज्यपाल फैसल करीम कुंडी यांनी शाळेचे छत कोसळून झालेल्या मुलांच्या मृत्यूवर दुःख व्यक्त केले. त्यांनी सविस्तर अहवालाची मागणी केली आणि अधिका-यांना छत कोसळण्याच्या कारणाची चौकशी करण्याचे निर्देश दिले.ते म्हणाले, निष्पाप मुलांचा जीव जाणे ही एक अत्यंत दुःखद शोकांतिका आहे. त्यांनी पीडितांच्या कुटुंबीयांप्रति तीव्र शोकसंवेदना व्यक्त केल्या. त्यांनी जखमी मुलांच्या शीघ्र आरोग्यासाठी प्रार्थना केली आणि संबंधित अधिका-यांना त्यांना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा देण्याचे निर्देश दिले.

# शेतमजुरांना दिवाळीपूर्वी दहा हजारांची मदत द्या-संजय दुधगावकर

**मुंबई/ प्रतिनिधी-** स्थलांतर रोखण्यासाठी ग्रामीण भागातील शेतमजुरांनी दिवाळीपूर्वी घरटी दहा हजार रुपयांचे अनुदान द्यावे, मनरेगाची कामे सुरू करावीत, अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीचे जिल्हा संयोजक संजय पाटील दुधगावकर यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. या मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे, की दुष्काळामुळे धाराशिव जिल्ह्यातील खरीप हंगाम वाया गेला आहे. त्याचा फटका शेतकरी व शेतमजुरांना बसला आहे. शेतीची कामे नसल्याने शेतमजुरांवर उपासमारीची वेळ आली आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे. शासनाने दुष्काळ जाहीर केलेला असून दुष्काळात होरपळणा-या शेतमजुरांना तातडीने दहा हजार रुपये घरटी मदत करणे अत्यंत गरजेचे आहे. तलावांतील गाळ काढणे, नद्या, नाल्यांचे खोलीकरण करणे, बांध बंधिस्ती करणे आदी कामे मनरेगातून मजुरांसाठी उपलब्ध करून द्यावीत. कामे सुरू झाली तर दुष्काळामुळे झालेली बेरोजगारी दूर होऊ शकेल, अन्यथा दिवाळीपूर्वीच शेतमजुरांचे मोठ्या संख्येने शहरांकडे स्थलांतर होण्याची शक्यता आहे. या उपाययोजना तातडीने कराव्यात, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

# जम्मू-कश्मीरच्या काही भागात हिमवृष्टी

**श्रीनगर :** जम्मू-कश्मीरमधील मैदानी भागांत गुरुवारी अनेक ठिकाणी पाऊस झाला. तर कश्मीर खो-यातील उंचावरील भागांत रात्री झालेल्या हिमवृष्टीनंतर सर्वत्र बर्फाची सफेद चादर पसरली आहे. महत्त्वाच्या रस्त्यांवरील बर्फ हटवण्यासाठी प्रशासनाने कर्मचारी आणि यंत्रसामग्री तैनात केली आहे अशी माहिती अधिका-यांनी दिली. हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार, जम्मू विभागातील उधमपूर येथे सर्वाधिक ५९.६ मिमी पावसाची नोंद झाली. त्यानंतर पूंछ येथे ३९.५ मिमी, सांबा येथे ३४ मिमी, शोपियाँ येथे ३४ मिमी, बारामुल्ला येथे २९ मिमी, कटरा येथे २३.१ मिमी, रामबन येथे १७ मिमी, अनंतनाग येथे १६ मिमी, कुलगाम येथे १८ मिमी आणि जम्मू येथे ७.६ मिमी पाऊस झाला. जम्मूमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत अचानक पूर आल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली, असे अधिका-यांनी सांगितले. कश्मीर खो-यातही रात्री अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. श्रीनगरमध्ये १२ मिमी पावसाची नोंद झाली. गुरुवारी सकाळपर्यंत पाऊस सुरूच होता. या भागातील बहुतांश ठिकाणी आकाश ढगाळ होते, अशी माहिती अधिका-यांनी दिली.हवामान विभागाच्या अंदाजानुसार, गुरुवारी संपूर्ण जम्मू-कश्मीरमध्ये पाऊस आणि सोसाट्याचे वारे सुरू राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी गारपीट होण्याचा, तर उंचावरील भागांत हलकी हिमवृष्टी होण्याचा इशाराही देण्यात आला आहे.



# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## अर्थव्यवस्थेतील चढउतार

जगाची अर्थव्यवस्था सध्या विलक्षण संकटातून जात आहे. पश्चिम आशियातील संघर्षाने ऊर्जापुरवठा साखळी विस्कळीत झाली. अमेरिकेच्या व्यापार धोरणातील अनिश्चिततेने आंतरराष्ट्रीय व्यापारावर दबाव निर्माण केला. एआयच्या क्षेत्रात अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक होत असताना त्यातून होणाऱ्या आर्थिक फुगवट्याची भीती वाढली आहे. अनेक विकसित देश सार्वजनिक कर्जाच्या ओझ्याखाली दबले आहेत. अशा परिस्थितीत भारतीय अर्थव्यवस्थेने आपली वाढीची गती कायम राखत जगाला आश्चर्याचा धक्का दिला आहे. मागील तिमाहीमधील आकड्यांनी याबाबतचे वास्तव मांडले होते; पण त्यावर अनेकांनी साशंकता व्यक्त केली. आता आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या आर्थिक विकासाचा अंदाज ६.४ टक्क्यांवरून थेट ७ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. जी-७ ही जगातील सर्वांत श्रीमंत देशांची संघटना; यातील सदस्य देशांच्या अर्थव्यवस्थांना उतरती कळा लागली आहे. य तुलनेत भारताची कामगिरी निश्चितच आश्वासक आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ऑक्टोबरमधील अहवालानुसार, २०२६ मध्ये जागतिक अर्थव्यवस्था ३.१ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. जुलैमधील अंदाजापेक्षा ही वाढ ०.१ टक्क्याने अधिक आहे. २०२७ मध्ये जागतिक विकासदर ३.४ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. या तुलनेत भारताचा अपेक्षित विकासदर लक्षणीय ठरतो. विशेष म्हणजे, भारताच्या वाढीमागे देशांतर्गत मागणीचा मोठा वाटा आहे. विशाल ग्राहक बाजारपेठ, पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक, सेवा क्षेत्राचा विस्तार आणि वाढती उत्पादन क्षमता यांमुळे अर्थव्यवस्थेला आधार मिळत आहे. निर्यातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या देशांना जागतिक मागणी घटल्याचा थेट फटका बसतो. भारताच्या आर्थिक वाढीत देशांतर्गत मागणी आणि गुंतवणुकीची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे बाह्य धक्क्यांचा परिणाम मर्यादित ठेवणे शक्य होते. अर्थात, कच्चे तेल, नैसर्गिक वायू, इलेक्ट्रॉनिक सुटे भाग आणि औद्योगिक कच्च्या मालासाठी भारताचे आयातीवर अवलंबित्व कायम आहे. डॉलरचे वधारलेले मूल्य आणि जागतिक अस्थिरतेमुळे पुरवठा साखळीतील व्यत्यय यांमुळे भारताचे आयातीसाठीचे देयक वाढले आहे. आरबीआय आणि आर्थिक पाहणी अहवालातील विश्लेषणानुसार, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत प्रतिपिंप केवळ १ डॉलरची वाढ झाली, तरी भारताचे वार्षिक तेल आयात बिल तब्बल १.५ ते २ अब्ज डॉलर्सने म्हणजेच सुमारे १२ ते १६,००० कोटी रुपये वाढते. याचा परिणाम जीडीपीवर होतो. तेलाच्या चढ्या दरांमुळे देशांतर्गत वाहतूक, खते, रसायने आणि उत्पादन खर्च वाढतो. यामुळे महागाईचा भडका उडतो. रिझर्व्ह बँकेला व्याजदर वाढवावे लागतात. व्याजदरवाढीमुळे भांडवली गुंतवणूक आणि कर्जपुरवठा मंदावतो. आयातीसाठी डॉलर्स खर्च झाल्याने भारतीय रुपयावर प्रचंड दबाव येऊन चलन अवमूल्यन होते. कच्च्या तेलदरात दीर्घकाळ १० टक्के वाढ कायम राहिल्यास भारताच्या प्रत्यक्ष जीडीपीवाढीच्या दरात ०.२ ते ०.३ टक्क्यांची घट होते. ग्राहकांची क्रयशक्ती आकुंचन पावून आर्थिक चक्राचा वेग मंदावतो. हा तपशील लक्षात घेतला असता भारतीय अर्थव्यवस्थेच्या वृद्धीला घोडदौड का म्हटले जात आहे, हे लक्षात येईल. संघर्ष दीर्घकाळ चालल्यास ऊर्जा साठे कमी होण्याबरोबरच पुरवठ्यावरील दबाव वाढू शकतो. त्यामुळे भारताने विकासदरात सातत्य राखण्यासाठी ऊर्जा आयातीत विविधता, देशांतर्गत उत्पादन आणि पर्यायी ऊर्जेतील गुंतवणूक यांना प्राधान्य देण्याची गरज आहे. केंद्र सरकारने आधीच पर्यायी ऊर्जा स्त्रोतांच्या वापरावर भर देण्यास सुरुवात केली होती. १४० कोटी लोकसंख्येचा भारत विकसित देशांसाठी महत्त्वाची बाजारपेठ आहे. अनेक प्रगत अर्थव्यवस्थांना वृद्धत्वाकडे झुकणाऱ्या लोकसंख्येचे आव्हान भेडसावत असताना भारताकडे तुलनेने तरुण मनुष्यबळ आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी अलीकडेच भारताच्या मुक्त व्यापार करारांमधून निर्माण होणाऱ्या संधींचा उल्लेख केला. येत्या १८ महिन्यांत भारतीय उद्योगांना सुमारे ८५ लाख कोटी डॉलर्सच्या अर्थव्यवस्था असलेल्या बाजारपेठांमध्ये प्राधान्याने प्रवेश मिळण्याची संधी आहे. भारताची अर्थव्यवस्था ४ लाख कोटी डॉलर्सची असल्याचे, तर क्रयशक्ती समानतेनुसार तिचा आकार सुमारे १६ लाख कोटी डॉलर्स असल्याचे गोयल म्हणाले. यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाटाघाटींत भारताची सौदेबाजी शक्ती वाढेल; मात्र अनुकूल अटींचा उपयोग करण्यासाठी भारतीय उत्पादनांचा दर्जा, किंमत, पुरवठ्याची विश्वासार्हता स्पर्धात्मक असावी लागेल. अर्थ मंत्रालयाच्या मासिक आर्थिक आढाव्यात मांडलेला विचार यासंदर्भात महत्त्वाचा आहे. भारताने उद्योगस्नेही अर्‌थव्यवस्थेपेक्षा स्पर्धास्नेही अर्थव्यवस्था घडवण्यावर भर द्यायला हवा. उद्योगस्नेही धोरणांमुळे परवानग्या लवकर मिळतात, कर प्रक्रिया सुलभ होते आणि उद्योगांचा खर्च कमी होतो; परंतु स्पर्धास्नेही धोरणांमुळे नव्या उद्योगांना बाजारपेठेत प्रवेश मिळतो, मक्तेदारीला मर्यादा येतात आणि कंपन्यांवर गुणवत्ता व उत्पादकता वाढवण्याचा दबाव निर्माण होतो. दीर्घकालीन आर्थिक विकासासाठी ही स्पर्धा आवश्यक असते. भारतात मोठ्या उद्योग समूहांना भांडवल, तंत्रज्ञान, प्रशासकीय प्रक्रियांमध्ये तुलनेने अधिक सुलभता असते. लहान उद्योगांना मात्र कर्ज, नियामक परवानग्या, बाजारपेठेतील प्रवेश आणि वितरण व्यवस्थेत अनेक अडथळे येतात. या विषमतेमुळे नवकल्पनांना मर्यादा पडतात. मोठ्या कंपन्यांभोवती आर्थिक व्यवहारांचे केंद्रीकरण होण्याचा धोका असतो. परवाना व्यवस्था, सरकारी खरेदी, अनुदाने, आयात शुल्क आणि क्षेत्रनिहाय नियम यांचा बाजारातील स्पर्धेवर थेट परिणाम होतो. देशांतर्गत उद्योगांचे संरक्षण करताना त्यांना कायमस्वरूपी संरक्षणाच्या कुबड्यांवर अवलंबून राहावे लागणार नाही, याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाचा विस्तार आर्थिक धोरणांच्या यशाचे चांगले उदाहरण आहे. गेल्या पाच वर्षांत इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन दुपटीहून अधिक झाले. निर्यात पाच पट वाढली. आर्थिक वाढीचे व्यापक रोजगारनिर्मितीत रूपांतर करणे हे भारतीय अर्थव्यवस्थेतील मोठे आव्हान आहे. वेगाने वाढणाऱ्या विकासदराचा लाभ अधिकाधिक कुटुंबांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. पर्यटन, आरोग्यसेवा, अन्न प्रक्रिया, वस्त्रोद्योग, लघुउद्योग या श्रमप्रधान क्षेत्रांना मोठी संधी आहे. यंदा दुष्काळी स्थिती अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी प्रतिकूल ठरू शकते. त्यामुळे निसर्गाची साथ, वित्तीय शिस्त, नियंत्रित महागाई, कृषी क्षेत्राचे सबलीकरण, मजबूत बँकिंग व्यवस्था, स्थिर धोरणे आणि उद्योगांना समान संधी देणारी नियामक चौकट या घटकांच्या समन्वयाने नाणेनिधीच्या अंदाजित वेगापेक्षा अधिक गतीने भारतीय अर्थव्यवस्थेची घोडदौड होताना दिसेल.

# वाढत्या तापमानात पिके अन् मातीचे व्यवस्थापन

डॉ. महेश आजबे, डॉ. समाधान सुरवसे, डॉ. अशोक कडलग

हवामान बदलामुळे मागील काही वर्षांत तापमानातील चढ-उतार, पावसाचे अनियमित वितरण, पावसातील दीर्घ खंड तसेच अल्प कालावधीत होणारी अतिवृष्टी यांसारख्या हवामानविषयक घटनांची तीव्रता आणि वारंवारता वाढत आहे. या बदलांचा शेती उत्पादनावर, पिकांच्या वाढीवर आणि उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होत आहे. वाढते तापमान केवळ पिकांच्या वाढीवर आणि प्रकाशसंश्लेषण प्रक्रियेवर परिणाम करत नाही, तर जमिनीतील ओलाव्याचे प्रमाण, अन्नद्रव्यांची उपलब्धता व ग्रहणक्षमता, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण आणि मातीतील सूक्ष्मजीवांच्या कार्यक्षमतेवरही परिणाम करते. तापमानवाढ आणि अनियमित पर्जन्यमानामुळे मातीतील जलसंतुलन बिघडणे, अन्नद्रव्यांचा ऱ्हास होणे आणि सेंद्रिय पदार्थांच्या विघटनाच्या प्रक्रियेत बदल होणे यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यामुळे बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत केवळ पीक व्यवस्थापनावर भर देण्याऐवजी पीक आणि मृदा व्यवस्थापन यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे. जमिनीतील ओलावा टिकवून ठेवणे, सेंद्रिय कर्ब वाढविणे, संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, सेंद्रिय पदार्थांचा वापर, सूक्ष्मजिवांची कार्यक्षमता वाढविणे, कार्यक्षम सिंचन पद्धतींचा अवलंब आणि हवामानास अनुकूल पिके व वाणांची निवड या उपाययोजना हवामान बदलाच्या परिणामांचा सामना करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

### तापमानवाढीचा पिकांवर परिणाम

पिकांच्या योग्य वाढीसाठी अनुकूल तापमान, जमिनीतील पुरेसा ओलावा आणि संतुलित अन्नद्रव्यांची उपलब्धता आवश्यक असते. तापमानात वाढ झाल्यास जमिनीतील बाष्पीभवन तसेच पिकांमधून होणारे बाष्पोत्सर्जन वाढते. परिणामी जमिनीतील उपलब्ध ओलावा वेगाने कमी होऊन पिकांच्या पाण्याच्या गरजेत वाढ होते. जमिनीतील ओलावा पिकाच्या गरजेपेक्षा जास्त कमी झाल्यास पिकामध्ये पाण्याचा ताण निर्माण होतो. तापमानवाढीबरोबरच जमिनीतील ओलावा कमी झाल्यास अधिक तीव्र परिणाम दिसून येतात.



### पिकामधील ताणाची लक्षणे

- पानांमधील रंध्रे बंद होणे.
- प्रकाशसंश्लेषणाचा दर कमी होणे.
- पानांची कोमेजणे
- मुळांची वाढ व कार्यक्षमता कमी होणे
- पिकाच्या वाढीवर व उत्पादनक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होणे.

### संवेदनशील अवस्था

फुलोरा, फलधारणा, शेंगा किंवा दाणे भरणे यांसारख्या संवेदनशील वाढीच्या अवस्थांमध्ये उष्णतेचा ताण अधिक जाणवतो. या अवस्थेत उच्च तापमानामुळे परागीभवन, फलधारणा आणि दाणे भरण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होऊन उत्पादन व गुणवत्तेत घट होऊ शकते. त्यामुळे तापमानवाढीच्या परिस्थितीत संवेदनशील वाढीच्या अवस्थांची पिकावरील ताणाची योग्य ओळख पटवून मातीतील ओलावा टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी गरजेनुसार कार्यक्षम सिंचन करणे, आच्छादनाचा वापर करणे आणि संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन तंत्रात अवलंब आवश्यक आहे. विशेषतः दीर्घकाळ पावसाचा खंड असल्यास पिकाची पाणी व पोषणाची गरज लक्षात घेऊन पूर्वनियोजन करणे महत्त्वाचे ठरते.

### ओलावा टिकविण्यासाठी...

### आच्छादनाचा वापर

तापमानवाढीच्या परिस्थितीत सर्वप्रथम जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यावर भर देणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी आच्छादनाचा वापर हा अत्यंत सोपा, प्रभावी आणि पर्यावरणपूरक उपाय आहे. सेंद्रिय आच्छादनासाठी पीक अवशेष, काडीकचरा, पालापाचोळा किंवा इतर योग्य सेंद्रिय पदार्थांचा वापर करता येतो.

आच्छादनासाठी सेंद्रिय पदार्थांचा वापर केल्यामुळे त्यांचे विघटन झाल्यानंतर त्यातील सेंद्रिय पदार्थ जमिनीत मिसळतात. त्यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढण्यास, जमिनीची जलधारण क्षमता सुधारण्यास आणि मृदा संरचना टिकवून ठेवण्यास मदत होते. त्यामुळे तापमानवाढ आणि पावसातील अनियमितता अशा दोन्ही परिस्थितींमध्ये आच्छादन, सेंद्रिय पदार्थांचा वापर आणि कार्यक्षम सिंचन यांचा एकत्रित वापर करून जमिनीतील ओलाव्याचे संवर्धन करणे शक्य होते.

### फायदे

- आच्छादनामुळे जमिनीच्या पृष्ठभागावर पडणाऱ्या थेट सूर्यप्रकाशाची तीव्रता कमी होते.
- जमिनीतील बाष्पीभवनाचा वेग कमी होऊन ओलावा अधिक काळ टिकून राहतो.
- जमिनीच्या पृष्ठभागाचे तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते.
- दिवसाच्या वेळी होणारी तापमानवाढ कमी करण्यास मदत होते.
- जमिनीतील सूक्ष्मजीवांच्या कार्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण होते.
- सेंद्रिय कर्ब वाढण्यास, जमिनीची जलधारण क्षमता सुधारण्यास आणि मृदा संरचना टिकवून ठेवण्यास मदत होते.
- सूर्यप्रकाश जमिनीच्या पृष्ठभागापर्यंत कमी प्रमाणात पोहोचल्यामुळे तणांच्या उगवणीवर आणि वाढीवरही नियंत्रण मिळविता येते.

### सेंद्रिय पदार्थांचा वापर

तापमानवाढीच्या परिस्थितीत जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे महत्त्व अधिक वाढते. शेणखत, कंपोस्ट, गांडूळखत, पिकांचे अवशेष आणि उपलब्धतेनुसार हिरवळीची खते यांचा नियमित व योग्य प्रमाणात वापर केल्यास जमिनीची भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणवत्ता सुधारण्यास मदत होते.

सेंद्रिय पदार्थांमुळे जमिनीची जलधारण क्षमता, मृदा संरचना आणि भुसभुशीतपणा सुधारतो. परिणामी पावसाचे किंवा सिंचनाचे पाणी जमिनीत अधिक प्रमाणात मुरण्यास आणि उपलब्ध ओलावा तुलनेने अधिक काळ टिकून राहण्यास मदत होते. विशेषतः हलक्या जमिनीत सेंद्रिय पदार्थांचा नियमित वापर केल्यास ओलावा संवर्धन आणि पिकांना पाण्याची उपलब्धता सुधारण्यास फायदा होतो. सेंद्रिय पदार्थ हे मातीतील सूक्ष्मजिवांसाठी ऊर्जा व कार्बनचा स्त्रोत असल्याने त्यांच्या वापरामुळे मातीतील जैविक क्रियाशीलता आणि अन्नद्रव्यांच्या चक्रास चालना मिळते. त्यामुळे सेंद्रिय पदार्थांचा वापर हा केवळ जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठीच नव्हे, तर हवामानातील ताण सहन करण्याची जमिनीची क्षमता वाढविण्यासाठीही महत्त्वाचा आहे. म्हणून केवळ रासायनिक खतांवर अवलंबून न राहता सेंद्रिय व रासायनिक आणि जैविक खतांचा संतुलित वापर, पिकांचे अवशेष व्यवस्थापन आणि हिरवळीच्या खतांचा समावेश असलेले एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन स्वीकारणे आवश्यक आहे. यामुळे जमिनीची दीर्घकालीन सुपीकता टिकवून ठेवण्यास आणि बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत पिकांची उत्पादकता स्थिर राखण्यास मदत होऊ शकते.

### योग्य पद्धतीने मशागत

अति मशागत केल्यामुळे जमिनीतील ओलावा वेगाने कमी होऊ शकतो. तसेच जमिनीची नैसर्गिक संरचना आणि भौतिक गुणधर्म बिघडण्याची शक्यता असते. वारंवार मशागत केल्याने जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे जलद विघटन होण्याबरोबरच जमिनीची धूप आणि संरचनेतील ऱ्हास होऊ शकतो. त्यामुळे जमिनीची स्थिती, पीक पद्धती आणि उपलब्ध साधनसामग्री यांचा विचार करून कमीत कमी आणि आवश्यक तेवढीच मशागत करण्यावर भर द्यावा.

पिकांचे अवशेष जाळण्याऐवजी त्यांचे योग्य व्यवस्थापन करून ते जमिनीच्या पृष्ठभागावर आच्छादन म्हणून ठेवणे किंवा योग्य पद्धतीने जमिनीत मिसळणे फायदेशीर ठरते. यामुळे जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यास, सेंद्रिय कर्ब वाढविण्यास, मृदा संरचना सुधारण्यास आणि सूक्ष्मजीवांच्या कार्यक्षमतेस चालना देण्यास मदत होते. कीड-रोगग्रस्त किंवा रोगजनकांचा प्रादुर्भाव असलेल्या पिकांच्या अवशेषांचे व्यवस्थापन करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अशा अवशेषांचा अनियंत्रित वापर केल्यास रोग व किडींचा प्रसार होण्याची शक्यता असते. त्यामुळे अवशेषांचा वापर करण्यापूर्वी त्यांची स्थिती तपासून, आवश्यकतेनुसार योग्य विघटन, कंपोस्टिंग किंवा इतर शिफारशीनुसार व्यवस्थापन करावे.

### योग्य सिंचन नियोजन

तापमानवाढीमुळे बाष्पीभवन व बाष्पोत्सर्जन वाढल्याने पिकांची पाण्याची गरज वाढू शकते. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा अपव्यय टाळून पिकाची वाढीची अवस्था, जमिनीतील ओलावा आणि हवामानाची स्थिती लक्षात घेऊन सिंचनाचे नियोजन करणे आवश्यक आहे. पाण्याचा कार्यक्षम वापर करण्यासाठी परिस्थितीनुसार ठिबक किंवा तुषार सिंचनासारख्या कार्यक्षम सिंचन पद्धतींचा अवलंब करता येतो. ठिबक सिंचनाद्वारे पिकाच्या मुळांच्या कार्यक्षम क्षेत्रात नियंत्रित प्रमाणात पाणी देता येत असल्याने पाण्याची बचत आणि ओलावा व्यवस्थापनास मदत होते.

सिंचनाची वेळ ठरविताना स्थानिक हवामानाचा विचार करावा. शक्य असल्यास सकाळी लवकर किंवा संध्याकाळच्या वेळेत सिंचन करणे उपयुक्त ठरते. मात्र केवळ वेळेच्या आधारावर सिंचन न करता जमिनीतील उपलब्ध ओलावा आणि पिकाची प्रत्यक्ष पाण्याची गरज यांना प्राधान्य द्यावे. सिंचनाचे नियोजन करताना जमिनीचा प्रकार, पिकाची अवस्था, मुळांची खोली, हवामान आणि उपलब्ध पाण्याचे प्रमाण यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. विशेषतः फुलोरा, फलधारणा किंवा उत्पादननिर्मितीच्या संवेदनशील अवस्थेत पाण्याचा ताण येणार नाही याची काळजी घ्यावी.

### संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन

उष्णतेच्या ताणाच्या परिस्थितीत पिकांच्या मुळांची वाढ, मुळांची कार्यक्षमता आणि अन्नद्रव्यांचे शोषण प्रभावित होऊ शकते. त्यामुळे माती परीक्षणाच्या आधारे खत व्यवस्थापन करणे अधिक महत्त्वाचे ठरते. संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापनामुळे पिकांची निरोगी वाढ, मुळांची कार्यक्षमता आणि प्रतिकूल हवामान सहन करण्याची क्षमता सुधारण्यास मदत होऊ शकते. विशेषतः तापमानवाढ परिस्थितीत योग्य पोषण व्यवस्थापन हे पिकांची वाढ व उत्पादकता टिकवून ठेवण्यासाठी महत्त्वाचे आहे. दुष्काळ परिस्थितीत ह्युमिक ॲसिड, ०:५२:३४, ०:०:५०, १३:०:४५ यांचा योग्य व पिकाच्या गरजेनुसार वापर उपयुक्त ठरतो.

### तण व्यवस्थापन

तण हे पिकांशी पाणी, अन्नद्रव्ये, प्रकाश आणि वाढीसाठी आवश्यक जागा यांसाठी स्पर्धा करतात. तापमानवाढीच्या परिस्थितीत ही स्पर्धा अधिक तीव्र होऊन पिकांवरील पाण्याचा ताण वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे सुरुवातीच्या पीक वाढीच्या अवस्थेत तणांचे प्रभावी व वेळेवर व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे.

**डॉ. महेश आजबे,**
८८३००७६३३५
(एम. जी. एम. नानासाहेब कदम कृषी महाविद्यालय, गांधेली, जि. छत्रपती संभाजीनगर)

**संवाद**

## आशियाड कामगिरी बद्दल क्रीडा मंत्रालयात मंथन

जपानमध्ये नुकत्याच संपलेल्या आशियाड क्रीडा स्पर्धांचा आढावा आज नवी दिल्ली येथे होत आहे. क्रीडा मंत्रालयाने या स्पर्धेसाठी गेल्या तीन वर्षांत जवळपास ७०० कोटी रुपये खर्च केले होते. या स्पर्धेत भारताला एकूण ८५ पदके मिळाली. ५०१ खेळाडूंच्या संघाने २१ सुवर्णपदके मिळवली. मागील आशियाडमध्ये भारताला १०६ पदके होती. विशेष म्हणजे शेवटच्या दोन दिवसांत ११ सुवर्णपदके मिळाली. तिरंदाजी, बॉक्सिंग आणि गोल्फमधील कामगिरी याला कारणीभूत ठरली. मात्र ॲथलेटिक्स, बॅडमिंटन आणि शूटिंगमध्ये कामगिरी निराशाजनक ठरली. बॅडमिंटनमध्ये केवळ पुरुष संघाला एक कांस्यपदक मिळाले. शूटिंगमध्ये ऑलिम्पिक विजेती मनू भाकरलाही पदक मिळाले नाही. ॲथलेटिक्समध्ये केवळ एक सुवर्णपदक मिळाले, मागील वेळी तिथे ६ सुवर्णपदके होती. एकूण पदकतालिकेत भारत चौथ्या क्रमांकावर राहिला. अमेरिका, चीन हे असेच करतात. आपल्या खेळाडूंमध्येही टॅलेंट आणि मेहनत करण्याची तयारी आहे, फक्त त्यांना योग्य दिशा हवी आहे. आजच्या बैठकीत यावर साधक-बाधक चर्चा होऊन योग्य निष्कर्ष निघेल आणि पुढील स्पर्धेची तयारी जोरात होईल, हीच अपेक्षा आहे.

**शांताराम वाघ, पुणे**

## मामा भाचा एका माळेचे मणी

प्रसिद्ध अभिनेता आमिर खान याचा भाचा, अभिनेता इम्रान याला देश सोडण्याचा आदेश केंद्र सरकारने दिल्याचे सांगितले जाते. इम्रान हा अमेरिकन नागरिक असून मुंबईत निवडणूक आयोगाच्या विरोधातील आंदोलनात त्याने भाग घेतला होता. परदेशी नागरिकाला दुसऱ्या देशाच्या अंतर्गत आंदोलनात भाग घेता येत नाही, असा नियम आहे. ज्या कलावंतांना या देशाने आणि जनतेने जागतिक प्रसिद्धी दिली, त्यांनी देशाप्रती निष्ठा राखणे हे कर्तव्य आहे. आमिर खान आणि शाहरुख खान यांनी २०१५-१६ च्या दरम्यान भारतात असहिष्णुता वाढत असल्याचे वक्तव्य केले होते. २०१५ मध्ये रामनाथ गोएंका पुरस्कार सोहळ्यात आमिर म्हणाला होता की, देशातील घडामोडींमुळे त्याला चिंता वाटते आणि पत्नी किरण रावने त्याला देश सोडण्याचा सल्ला दिला होता. ही घटना केवळ दोन कलाकारांपुरती मर्यादित नाही. राष्ट्रनिष्ठा, कायदा आणि सामाजिक जबाबदारी याचा हा धडा आहे. प्रसिद्धीसोबत मोठी जबाबदारी येते, याचे भान ठेवणे आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च मानणे हाच यातून संदेश मिळतो.

**अविनाश देशपांडे**

## शांततेच्या पुरस्कारासाठी कृती महत्त्वाची!

जगातील सर्वात प्रतिष्ठेचा नोबेल शांतता पुरस्कार ९ ऑक्टोबर २०२६ रोजी दक्षिण आफ्रिकेतील ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ नावी पिल्ले यांना जाहीर झाला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार मिळण्याची अपेक्षा होती, मात्र ती अपूर्ण राहिली. पिल्ले यांनी संपूर्ण आयुष्य न्याय आणि मानवाधिकारां साठी समर्पित केले आहे. वर्णद्वेषाविरुद्धच्या लढ्यात त्यांनी नेल्सन मंडेला यांच्यासह कार्यकर्त्यांच्या हक्कांसाठी वकिली केली. दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालय, आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायाधिकरण आणि आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयात त्यांनी न्यायाधीश म्हणून काम केले. २००८ ते २०१४ या काळात त्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त होत्या. दुसरीकडे ट्रम्प यांनी अनेक संघर्ष थांबवल्याचा दावा करत नोबेलसाठी आपण पात्र असल्याचे सुचवले. मात्र प्रयत्नांची परिणामकारकता, टिकणारी शांतता यांचाही विचार व्हायला हवा. एकीकडे शांततेची भाषा आणि दुसरीकडे शस्त्रास्त्रांची विक्री, लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन हा विरोधाभास दिसतो. भारतासारख्या देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने पाकिस्तानला होणाऱ्या शस्त्रपुरवठ्याकडेही दुर्लक्ष करता येणार नाही. २०२५ मध्ये व्हेनेझुएलातील मारिया कोरिना मचाडो यांना, तर २०२६ मध्ये नावी पिल्ले यांना हा पुरस्कार मिळाला. दोन्ही निवडींमधून लोकशाही आणि न्यायाच्या रक्षणाचे महत्त्व स्पष्ट होते. शांतता भाषणातून नव्हे, तर कृतीतून निर्माण होते. सत्तेपेक्षा न्यायाला आणि सामर्थ्यापेक्षा कायद्याला अधिक महत्त्व द्यावे लागेल.

**श्याम ठाणेदार**

## खाद्यपुर्तीसाठी अन्नाचा एक कण

अन्नाची समस्या पाहता संयुक्त राष्ट्रसंघाने १६ ऑक्टोबर १९७९ पासून विश्व खाद्य दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून जगभरात हा दिवस साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश म्हणजे जगातील वाढत्या भुकबळीच्या समस्येप्रती लोकांना जागरूक करणे, उपासमारी, कुपोषण आणि गरिबीविरुद्धच्या संघर्षाला बळ देणे. भारतीय अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करत आहे, परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट आहे. तर दुसरीकडे गोडाऊनमध्ये करोडो टन अन्नधान्य सडत आहे, हे भारताचे विदारक वास्तव आहे. अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाणी आणि निसर्गावर अवलंबून आहे. अन्नाला जेवढे महत्त्व आहे, त्यापेक्षा जास्त महत्त्व पाण्यालाही आहे. कारण पाणी राहिले तरच अन्नाचे उत्पादन होऊ शकते. जगात अन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातून घाम गाळतो आणि शेती पिकवतो. तेव्हाच देशासह जगातील लोकांची पोटाची खळगी भरते. म्हणूनच शेतकऱ्यांना 'अन्नदाता' म्हटले जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवले नाही तर संपूर्ण जनतेवर उपाशी मरण्याची पाळी येऊ शकते. सरकारच्या अन्नधान्य साठ्याचे नियोजन कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातूनच भुकबळीची सुरुवात होते. आजही मेळघाट सारख्या अतिदुर्गम भागात भुकबळी आणि कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसते. भारतात सहा वर्षांखालील ४७ टक्के मुले कुपोषणाची शिकार होत आहेत. आज १४५ कोटी जनतेचे दायित्व बनते की, अन्नाचा प्रत्येक कण वाचवून देशातील उपासमारी आणि कुपोषणावर अंकुश लावला पाहिजे. अन्नधान्याचा काळाबाजार ताबडतोब रोखला पाहिजे आणि जमाखोरांच्या मुसक्या आवरल्या पाहिजेत. तेव्हाच विश्व खाद्य दिवसाला खरे महत्त्व येईल.

**रमेश लांजेवार**
मो.९९२१६९०७७९

## सीजेपी मूळ जाहीरनामा भरकटला

'कॉकरोच जनता पार्टी' सुरुवातीला सोशल मीडियावरील उपरोधिक चळवळ आणि रस्ते, पाणी, स्वच्छता यांसारख्या स्थानिक नागरी प्रश्नांवर भाष्य करणारी संघटना म्हणून पुढे आली होती. आता ती निवडणूक सुधारणा आणि थेट राजकीय संघर्षाच्या मार्गावर जाताना दिसते. सीजेपीची सुरुवात बेरोजगारी, नीट पेपर लीक आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरून झाली होती. मात्र सध्या 'व्होट चोरी' किंवा निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याचे आंदोलन हे विद्यार्थ्यांपेक्षा राजकीय अजेंड्याकडे झुकल्याचे दिसते. ऑक्टोबर २०२६ मधील दिल्लीतील जंतर-मंतर आंदोलनात पूर्वीसारखी गर्दी दिसली नाही. काँग्रेस, युवासेना (ठाकरे गट), मनसे आणि आप सारख्या पक्षांचा थेट पाठिंबा मिळाल्याने ही संघटना स्वतंत्र दबाव गट न राहता एका विशिष्ट बाजूने काम करत असल्याचा आरोप होत आहे.




दिल्ली पोलिसांनी संस्थापक अभिजीत दिपके आणि इतर नेत्यांना ताब्यात घेतल्यानंतर ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक हमीपत्रावर सोडले. संघटनेचा निधी आणि त्याच्या वापरावरही काही यंत्रणांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दुसरीकडे समर्थकांचे म्हणणे आहे की, सीजेपी केवळ एका आंदोलनापुरती मर्यादित नाही. मानवाधिकार, द्वेषयुक्त भाषणांविरोधी लढा आणि घटनात्मक मूल्यांचे रक्षण यासाठी ती काम करते. आसाममधील एनआरसी, आदिवासींचे हक्क आणि पत्रकारांचे स्वातंत्र्य अशा विविध क्षेत्रात ती कायदेशीर मदत करते. त्यामुळे हा भरकटणे नसून कामाचा विस्तार आहे, असा युक्तिवाद केला जातो. सरकारने ३० हजारांहून अधिक जवान तैनात करून आंदोलन चिरडण्याचा प्रयत्न केल्याचेही समर्थक सांगतात.

थोडक्यात, सीजेपी आता मूळ नागरी सुधारणांचा जाहीरनामा विसरून थेट केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाला आव्हान देणाऱ्या आक्रमक राजकीय आंदोलनाच्या मार्गावर आहे का, हा प्रश्न उपस्थित होतो.

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा**
मो. ९५६१५९४३०६

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# महागाव, दराटी व माहूर पोलिस हद्दीत अवैध दारूची 'होम डिलिव्हरी'..!

## मद्य माफियांचा सुळसुळाट, खाकी आणि खाबुगिरीची चर्चा जोरात!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. १५ :** महागाव तालुक्याच्या अखेरच्या टोकावर असलेल्या फुलसावंगी येथुन देशी दारू च विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमावर्ती भागात सुरू असलेल्या बेकायदा देशी दारू तस्करी खुलेआम सुरूआहे. फुलसावंगी ते थेट किनवट दरम्यान तब्बल ४५ किलोमीटरच्या पट्ट्यात अधिकृत देशी दारूचे दुसरे दुकान नसताना, या बंदी भागाचा गैरफायदा घेत मद्य माफियांनी चक्क व्दार पोच चा हायटेक धंदा थाटला आहे.

दुचाकी आणि चारचाकी वाहनांमधून खेडोपाडी अवैध दारूचा पुरवठा केला जात असून, या रॅकेटमुळे तरुण पिढी उद्ध्वस्त होत आहे. खात्रीशीर माहितीनुसार, फुलसावंगी येथील मद्य माफियाने परिसरातील विविध गावांना दारू पुरवठ्याचे टार्गेट ठरवून दिले आहे. यामध्ये प्रामुख्याने बंदी भागातील नारळी येथे २ पेटी, आमडापूर येथे २ पेटी, घामपूर येथे १ पेटी, भवानी येथे २ पेटी, डोंगरगाव येथे - बंटी व संतू प्रत्येकी २ पेटी, कोरटा येथे ४ पेटी, टेंभी येथे २ पेटी तर मराठवाड्यातील परिसरातील ईवळेश्वर येथे २ पेटी, हडसनी येथे २ पेटी, हिंगणी येथे १ पेटी, बोरवाडी फाटा येथे २ पेटी, कुपटी येथे २ पेटी, पाचोंदा येथे १ पेटी, अनमाळ येथे २ पेटी असा हा सर्व देशी दारूचा माल ९० मिलीच्या बॉक्समध्ये पुरवला जातो, ज्यामध्ये एका पेटीत १०० नग असतात. या दारूच्या प्रति पेटीची एमआरपी कमी असतानाही, मद्य माफिया पंटरांच्या मार्फत प्रति पेटी ३,८०० रुपये आणि अधिकचा १०० रुपये पेट्रोल खर्च असा मिळून थेट ३,९०० रुपयांचा दर लावुन अवैध विक्रेत्यांकडून वसूल करत आहे. हा सर्व गोरखधंदा महागाव, दराटी आणि माहूर या तीनही पोलीस स्टेशनच्या हद्दीत बिनदिक्कत सुरू आहे. विशेष म्हणजे, या हद्दीतून दारूची तस्करी होत असतानाही पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. मागील आठ महिन्यांपूर्वी घमापूर फाट्यावर दराटी पोलिसांनी घरपोच देशी दारू नेणारी दुचाकी पकडली होती. मात्र, यात केवळ पंटर (मजुरी करणाऱ्या डिलिव्हरी बॉय) वर कारवाई करून तपास गुंडाळण्यात आला. यामध्ये मुख्य मद्य माफियांपर्यंत पोहोचण्याऐवजी प्रकरण तिथेच थांबवण्यात आल्याने पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महागाव, दराटी, माहूर पोलीस स्टेशन आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग या गलेलठ्ठ मद्य माफियाच्या दावणीला बांधले आहेत का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. केवळ छोट्या पंटरांवर कारवाई करून स्वतःची पाठ थोपटून घेऊन अर्थकारण साधणाऱ्या पोलीस आणि दारूबंदी विभागाने आता कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. वाहतूक होणाऱ्या देशी दारूच्या बॉटल्स वरील बॅच नंबर आणि लॉट नंबर तपासून हा माल नेमका कोणत्या अधिकृत परवानाधारकाच्या दुकानातून बाहेर पडला, याचा मूळ शोध घ्यावा. केवळ पंटरला न पकडता थेट मुख्य मद्य माफिया आणि संबंधित परवानाधारक दुकानदारावर दंडात्मक व फौजदारी कारवाई करावी, अशी आक्रमक मागणी परिसरातील सुजाण नागरिकांमधून होत आहे. पोलीस प्रशासन यावर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्यात खरीप पिक व चाऱ्याच्या नियोजनासाठी मध्यम व लघु प्रकल्पातून पाणी सोडण्यास सुरुवात

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या निर्देशानुसार कार्यवाही

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १५ :** यवतमाळ जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाने दिलेल्या दीर्घ खंडामुळे आणि अपुऱ्या पावसामुळे शेती पिकांवर अत्यंत विपरीत परिणाम झाला आहे.

कपाशीवर विविध किडींचा प्रादुर्भाव झाल्याचे तसेच पिकांची वाढ खुंटल्याचे चित्र समोर आले आहे. यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाल्याने, शेतात उभ्या असलेल्या खरीप पिकांचे नुकसान टाळण्यासाठी व पिकांना तातडीने सिंचन संरक्षण मिळण्यासाठी शेतकरी वर्गाकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रकल्पांमधील उपलब्ध जलसाठ्यातून पाण्याचे आवर्तन सोडण्याची मागणी करण्यात आली होती. शेतकऱ्यांची ही तीव्र अडचण लक्षात घेऊन प्रशासनाने तात्काळ पावले उचलली आहेत. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची अडचण भासणार नाही याची खबरदारी घेत, तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व मार्गदर्शक नियमांचे पालन करून व स्थानिक परिस्थितीचा सखोल विचार करून जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील विविध मध्यम, लघु आणि मोठ्या जलप्रकल्पांतून खरीप पिकांच्या संरक्षणासाठी व चाऱ्याच्या नियोजनाकरिता पाण्याचे पहिले आवर्तन सोडण्याचा निर्णय घेतला आहे.



**"जिल्ह्यातील दुष्काळस्थितीच्या पार्श्वभूमीवर विविध सवलती लागू केल्या असून दुष्काळ निवारणासाठी उपाययोजना केल्या जात आहे. अनेक भागातील शेतकऱ्यांकडून शेतपिकासाठी प्रकल्पातील पाण्याची मागणी होत होती. त्याअनुषंगांने जिल्हाधिकारी यांना नियोजन करुन मागणीनुसार पाणी सोडण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आज शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध होत असून जलसंधारणाची कामे केली जात आहे. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येणार आहे."**

**- पालकमंत्री संजय राठोड, यवतमाळ**

दिनांक १४/१०/२०२६ (सायंकाळ पर्यंत) विविध प्रकल्पांमधून सोडण्यात आलेल्या पाण्याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:

बोरगांव मध्यम प्रकल्प (ता. यवतमाळ): ०.०८ दलघमी (MCM) पाणी सोडण्यात आले आहे. सायखेडा मध्यम प्रकल्प (ता. केळापूर): ०.५० दलघमी (MCM) पाणी सोडण्यात आले आहे. टाकळी लघु प्रकल्प (ता. यवतमाळ): ०.४९ दलघमी (MCM) पाणी सोडण्यात आले आहे. राजुर लघु प्रकल्प (ता. कळंब): ०.२० दलघमी (MCM) पाणी सोडण्यात आले आहे. इटोला लघु प्रकल्प (ता. दिग्रस): ०.०६ दलघमी (MCM) पाणी सोडण्यात आले आहे. बेंबळा मोठा प्रकल्प: खरीप पिकांच्या सिंचनासाठी मुख्य कालव्यातून १५ क्युमेक (Cumec) वेगाने पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे अंतिम टप्प्यात असलेल्या खरीप पिकांना संजीवनी मिळणार असून, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मिटण्यास मोठी मदत होणार आहे. पाणी सोडताना पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून, उपलब्ध साठ्याचे काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. संबंधित क्षेत्रातील शेतकऱ्यांनी या पाण्याचा वापर पिकांच्या संरक्षणासाठी योग्य पद्धतीने करावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात



### सेवा संकल्प अभियानांतर्गत खैरखेडा शासकीय आश्रम शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**पुसद :** शासकीय माध्यमिक आश्रम शाळा खैरखेडा येथे वाचन प्रेरणा दिन याचे औचित्य साधून डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला याप्रसंगी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जीवन चरित्रावर आधारित माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली त्याचबरोबर विद्यार्थ्यांकडून एक तास वाचन करून घेण्यात आले या उपक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी, मुख्याध्यापक आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

### मराठा उद्योजकतेला जागतिक बाजारपेठेची संधी, पुण्यात उद्यापासून बिझनेस एक्स्पो!

**५० पेक्षा अधिक उद्योगक्षेत्रांचा सहभाग**

**यवतमाळ :** मराठा उद्योजकांना व्यवसायविस्ताराची नवी दिशा देण्यासाठी पुण्यात उद्यापासून (१५ ऑक्टोबर) 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो २०२६' सुरू होत आहे. मोशी येथील पिंपरी-चिंचवड आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्रात १८ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या प्रदर्शनात एक हजारांहून अधिक दालने असणार आहेत. मराठा सेवा संघ प्रणित मराठा उद्योजक विकास आणि मार्गदर्शन संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित या एक्स्पोमध्ये ५० हून अधिक उद्योगक्षेत्रांतील उद्योजक, व्यावसायिक आणि नवउद्योजक सहभागी होणार आहेत. उत्पादनांचे सादरीकरण, व्यावसायिक संपर्क, नव्या बाजारपेठांचा शोध आणि उद्योगविस्तारासाठी सहकार्य मिळविण्याची संधी यातून उपलब्ध होणार आहे. आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे आणि संजय काटकर यांच्या मार्गदर्शन सत्रासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य ठरणार आहे. मराठा समाजातील तरुणांनी नोकरीच्या संधींसोबतच उद्योजकतेकडेही वळावे, व्यवसायवृद्धीसाठी या व्यासपीठाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मराठा सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### प्रथम अपीलचे अधिकार कनिष्ठ अधिकाऱ्यांकडे?

### पंचायत समितीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह!

**पांढरकवडा :** पांढरकवडा पंचायत समितीतील प्रशासकीय कारभार पुन्हा चर्चेत आला असून, प्रथम अपील सुनावणीचे अर्धन्यायिक अधिकार कनिष्ठ अधिकाऱ्याकडे सोपविल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. गटविकास अधिकारी (BDO) आणि सहाय्यक गटविकास अधिकारी (ABDO) यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करत आकाश अनंतराव सामलवार यांनी वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे चौकशीची मागणी केली आहे. माहिती अधिकार कायदा, २००५ मधील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचा दावा करत, प्रथम अपील सुनावणीची प्रक्रिया आणि त्याअंतर्गत पारित आदेशांची कायदेशीर वैधता तपासण्याची मागणी त्यांनी केली आहे. यापूर्वी आक्षेप नोंदवूनही दुर्लक्ष झाल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव, विभागीय आयुक्त, राज्य माहिती आयुक्त आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करण्यात आले आहे. दोषी आढळणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. आता वरिष्ठ प्रशासन या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करणार का, याकडे लक्ष लागले आहे. संबंधित अधिकाऱ्यांची बाजू आणि प्रशासनाचा अधिकृत खुलासा अद्याप प्राप्त झालेला नाही.

### झरी-जामणीमध्ये बोगस वैद्यकीय व्यवसायाचा पर्दाफाश?

**इलेक्ट्रो होमिओपॅथीच्या नावाखाली क्लिनिकमध्ये औषधांचा साठा एकाविरुद्ध गुन्हा**

**झरी. :** परिसरात कथित अनधिकृत वैद्यकीय व्यवसायाचा प्रकार समोर आला असून, इलेक्ट्रो होमिओपॅथीचे काम करण्याऐवजी क्लिनिकमध्ये ॲलोपॅथीची औषधे आढळल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी सुकांत कलीपाद राय (वय ५३, रा. आशीर्वाद हॉटेलजवळ, मेन रोड, झरी-जामणी) याच्याविरुद्ध पाटण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडे दाखल तक्रारीनुसार, १३ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी २.३० ते ३.३० वाजताच्या दरम्यान जैसवाल यांच्या इमारतीतील श्रीराम मोहितकर यांच्या आठ बाय वीस फुटांच्या गाळ्यात हा प्रकार घडल्याचे नमूद आहे. फिर्यादी डॉ. मोहन गेडाम (वय ५५), तालुका आरोग्य अधिकारी, झरी, यांच्या तक्रारीनुसार, आरोपी इलेक्ट्रो होमिओपॅथीचे काम करणे अपेक्षित असताना त्याच्या क्लिनिकमध्ये ॲलोपॅथीची औषधे आढळली. तसेच टेबलावर प्रिस्क्रिप्शन, पावत्या आणि बिल पेमेंटसाठी स्वतःच्या नावाने असलेला यूपीआय क्यूआर कोड मिळून आल्याचे तक्रारीत नमूद आहे. संबंधित औषधे वापरण्यासाठी आवश्यक अधिकृत परवाना किंवा प्रमाणपत्र नसताना वैद्यकीय व्यवसाय केला जात असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी महाराष्ट्र वैद्यक व्यवसाय अधिनियम, १९६१ मधील कलम ३३(१) व ३३(२) अन्वये अप. क्र. २१४/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पाटण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नागोराव जाधव करीत आहेत.

# वंचित लाडक्या बहिणींचे अर्ज स्वीकारून समस्यांचे निराकरण करा

## महिला काँग्रेस च्या शहराध्यक्षा जयश्री नरवाडे यांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. १५ :** लाडक्या बहिणींचे अनुदान बंद झाल्याने त्यांना मदत मिळावी याकरिता काँग्रेसच्या वतीने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये हजारो वंचित महिलांनी आपले अर्ज केले होते ते अर्ज स्वीकारून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याची मागणी महिला काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष ,नगरसेविका सौ.जयश्री नरवाडे यांनी निवेदनाद्वारे महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे केली आहे.



महागाव तालुक्यातील हजारो लाडक्या बहिणींचे शासनाकडून मिळणारे अनुदान विविध त्रुटी दाखवित अचानक बंद केले गेले त्यामुळे या वंचित लाडक्या बहिणींना अनुदान मिळवुन देण्यासाठी महागाव तालुका महिला काँग्रेस कमिटी,काँग्रेस कमिटी यांच्या वतीने दिनांक ३०सप्टेंबर रोजी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .या शिबिरात योजनेच्या अनुदानापासून वंचित राहिलेल्या हजारो महिलांनी उपस्थिती लावुन राज्य शासनाच्या तुघलकी कारभाराचा निषेध करीत आक्रोश व्यक्त करून आपले अर्ज सादर केले.यावेळी तालुक्यातील ११४६वंचित महिलांनी काँग्रेस कडे अर्ज सादर करून न्याय मिळवुन द्यावा अशी मागणी होती. त्याच अनुषंगाने या शिबिराच्या आयोजक महिला काँग्रेस कमिटीच्या तालुकाध्यक्षा,नगरसेविका सौ.जयश्री संजय नरवाडे यांनी महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी महागाव यांच्याकडे निवेदन सादर करून शिबिरात आलेल्या वंचित लाडक्या बहिणींचे अर्ज स्वीकारून त्यांच्या समस्यांचे निराकरण करून त्यांना अनुदान पुर्ववत सुरू करण्याची मागणी केली.

# १४ वर्षापासून फरार झालेला सराईत गुन्हेगार आरोपी अखेर पुसद शहर पोलिसांच्या ताब्यात.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १५ :** विद्यमान न्यायालयात वर्षानुवर्ष आरोपी हजर राहत नसल्यामुळे गुन्हे प्रलंबित राहत असल्याने माननीय पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिनांक ०१ऑक्टोंबर २०२६ पासून फरार पाहिजे आरोपीची यादी तयार करून त्यामधील फरार असलेले आरोपी यांचा शोध घेणे कामे विशेष मोहीम राबवून विद्यमान न्यायालयात प्रलंबित असलेल्या गुन्ह्यातील पाहिजे फरारा आरोपी यांच्या शोध घेणे करीता पोलीस स्टेशन पुसद शहर येथील विशेष पथक तयार करून फरार पाहिजे आरोपी अटक करणे बाबत आदेशित केले.



त्यावरून पोलीस स्टेशन पुसद शहरचे ठाणेदार गजेंद्र क्षीरसागर यांनी पोलीस स्टेशन पुसद शहर येथील एक विशेष पथक तयार करून पथक प्रमुख अक्षय सनगर पोहवा मनोज कदम, आकाश बाभुळकर, सचिन राऊत, शुद्धधन भगत,राजेंद्र नागमोते ,यांना योग्य ते मार्गदर्शन करून फरार पाहिजे आरोपी अटक करणे बाबत सूचना दिल्या फरार आरोपीचा शोध घेत असतांना पोलीस स्टेशन पुसद शहर पथकास गोपनीय माहिती मिळाली की पोलीस स्टेशन पुसद शहर अपराध क्रमांक ०२/२०१२ कलम ३६३,३६६ भादवी गुन्ह्यातील १४ वर्षापासून फरार असलेला आरोपी रवी नारायण कांबळे रा. शिवाजी वार्ड पुसद हा वेशभूषा बदलून पुणे येथे राहत आहे आशा माहितीवरून ठाणेदार गजेंद्र क्षीरसागर यांनी सदर आरोपीचा शोध घेणे कामी पथकास पुणे येथे रवाना केले त्यावर पोलीस उपनिरीक्षक अक्षय सनगर यांच्या पथकाने सतत ४८ तास परिश्रम करून तांत्रिक माहिती चा आधार घेऊन तसेच गोपनीय माहितीवरून आरोपीचा शोध घेऊन आरोपीस पुणे वाकड येथून ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे सदर आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन पुसद शहर येथे ,जबरी चोरी ,चोरी व अल्पवयीन मुलीस आमिष दाखवून फूस लावून पळून नेल्याचे गुन्हे दाखल आहेत

# दिग्रसमध्ये घंटीबाबांच्या ८१ व्या पुण्यतिथी महोत्सवाचा भक्तिमय जागर!

## २३ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. १५ :** दिग्रस नगरीचे ग्रामदैवत महान तपस्वी सद्गुरू श्री संत घंटीबाबा यांच्या ८१व्या पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन श्री घंटीबाबा संस्थान, दिग्रसच्या वतीने २३ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.



श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक सेवेचा संगम असलेल्या या महोत्सवानिमित्त शहरात भव्य यात्रा भरणार असून, विविध धार्मिक कार्यक्रमांसह मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचेही आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाची सुरुवात २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.३० वाजता श्रींच्या पादुका पूजन व अभिषेकाने होईल. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते ४ या वेळेत तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत मधुमेह तपासणी, उपचार व मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले आहे. याच दिवशी हृदयरोगविषयक मार्गदर्शनासह ईसीजी तपासणीही मोफत केली जाणार आहे. या उपक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानने केले आहे. २९ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता श्रींच्या पवित्र पादुका व मूळ प्रतिमेचा भव्य पालखी सोहळा मंदिरातून शहरातील परंपरागत मार्गाने निघेल. पालखीचे विधिवत पूजन राज्याचे जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजयभाऊ राठोड, खासदार संजयभाऊ देशमुख, नगराध्यक्षा पंचशीलाताई इंगोले, उपाध्यक्ष सचिन बनगीनवार यांच्यासह नगर परिषदेतील पदाधिकारी, नगरसेवक-नगरसेविका आणि भाविकांच्या उपस्थितीत होणार आहे. पालखी सोहळ्याच्या समारोपप्रसंगी संत घंटीबाबांच्या संजीवनी समाधी मंदिरात ह.भ.प. महादेव महाराज माहुरे यांचे काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर विदर्भभूषण, व्यसनमुक्ती सम्राट ह.भ.प. मधुकर महाराज खोडे यांच्या हस्ते दहीहंडी व काल्याच्या प्रसादाचे वितरण आणि महाआरती होणार आहे.शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर नऊ दिवसांच्या या पुण्यतिथी महोत्सवाची सांगता होईल. धार्मिक परंपरेसोबतच आरोग्यसेवेचा संदेश देणाऱ्या या महोत्सवातील सर्व कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री घंटीबाबा संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# अवैध पाणी उपशाच्या तपासणीसाठी प्रशासनाची धडक मोहीम

## सरकारी नाल्यावरील मोटारपंप व डिझेल पंप बंद करण्याचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. १५ :**राज्यातील विविध भागांत पाणीटंचाईची परिस्थिती आणि घटत्या जलसाठ्याच्या पार्श्वभूमीवर जलस्त्रोतांमधील पाण्याचा वापर नियंत्रित करण्यासाठी प्रशासनाकडून तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. धरणांमधील उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी राखीव ठेवण्याच्या दृष्टीने विविध विभागांच्या माध्यमातून उपाययोजना केल्या जात आहेत.



याच अनुषंगाने वणी तालुक्यातील मौजे पेटूर व मानकी शिवारातील सरकारी नाल्याची गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास तपासणी करण्यात आली.यावेळी डिझेल पंपाच्या साहाय्याने पाण्याचा उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले. या ठिकाणी दोन शेतकरी आढळून आले असून, संबंधित प्रकरणाचा अहवाल तयार करून पुढील कार्यवाहीसाठी गटविकास अधिकारी किशोर गजलवार यांच्याकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती आहे. ही तपासणी सिंचन विभागाचे अभियंता सुमित भागवत, मानकीचे ग्रामसेवक ऋषिकेश सोळंके आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे केली. पंप बंद करण्याचे आवाहन नदी व नाल्यांमधून पाण्याचा उपसा सुरू असलेल्या ठिकाणी संबंधित मोटारपंप व डिझेल पंप तात्काळ बंद करावेत,अन्यथा नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध जलस्त्रोतांचा योग्य वापर व्हावा आणि पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम होऊ नये,यासाठी प्रशासनाकडून तपासणीवर भर दिला जात आहे.पेटूर व मानकी शिवारातील या प्रकरणात अहवालानंतर कोणती कार्यवाही होते, याकडे लक्ष लागले आहे.

# गुरुकुल विद्यालयात वाचन प्रेरणादिन उत्साहात, कलामांच्या विचारांतून विद्यार्थ्यांना प्रेरणा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी-जामणी, दि. १५ :** भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि 'मिसाईलमॅन' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त मुकुटबन येथील गुरुकुल विद्यालयात 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. मोबाईलच्या वाढत्या आकर्षणात पुस्तकांपासून दूर जाणाऱ्या नव्या पिढीला वाचनाची गोडी लावणे आणि ज्ञानसमृद्ध समाजाची पायाभरणी करणे, हा या उपक्रमाचा महत्त्वपूर्ण संदेश ठरला.



डॉ. कलाम यांचे जीवन जिज्ञासा, कठोर परिश्रम, ज्ञानसाधना आणि दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. त्यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय जोपासावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. विद्यालयाच्या प्राथमिक विभागातील कडू मॅडम यांनी पुस्तकांचे महत्त्व विशद करताना वाचनामुळे विचारांना दिशा मिळते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी मातृभाषेचा अभिमान बाळगून मराठी भाषेचा गौरव जपावा, असेही त्यांनी आवाहन केले. मुख्याध्यापक विलास चिट्टलवार यांनी पाठ्य पुस्तकांपुरते मर्यादित न राहता कथा, चरित्रे आणि वैचारिक साहित्याचे वाचन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आत्राम सर यांनी केले, तर अतुल सर यांनी आभार मानले. सिद्धार्थ सर आणि गुरुकुल विद्यालय परिवाराच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला. केवळ जयंती साजरी न करता वाचनाची सवय आयुष्यभर जोपासणे, हीच डॉ. कलाम यांना खरी आदरांजली!

# नवसाला पावणाऱ्या श्री एकविरा मातेच्या दर्शनाला भाविकांची मांदियाळी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. १५ :** नवसाला बोलल्यानंतर आपली मनोकामना पुर्ण होत असल्याने महाराष्ट्र राज्यासह देशभरातून नवसाला पावणारी अशी ख्याती असलेल्या आठवे शक्तीपीठ श्री एकविरा मातेच्या दर्शनाला भक्तांची मांदियाळी दाटली आहे.



माता सती चे अवयव जगभरातील अठरा ठिकाणी पडले त्याच ठिकाणी माता भक्तांच्या कल्याणासाठी स्थित झाली त्याच अष्टादश शक्तिपीठांपैकी सतीचा उजवा बाहु पडलेले ठिकाण हिवरा(संगम) येथील आठवे शक्तीपीठ असलेल्या माता एकविरा देवीच्या दर्शनाला भाविकांची मोठी गर्दी उसळली असुन माता नवसाला पावणारी असल्याने याठिकाणी बोललेला नवस पुर्ण झाल्यानंतर तो फेडण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने मातेच्या दरबारात आपली हजेरी लावत आहेत. श्री एकविरा मातेच्या शारदीय नवरात्रोत्सवाला रविवारी दि.११ऑक्टोबर) रोजी दुपारी २वाजता वैदिक मंत्रोच्चाराच्या गजरात घटस्थापना करून सुरुवात झाली आहे. मातेचे मंदिर पुष्पावंती नदीच्या काठावर निसर्गरम्य वातावरणामध्ये वसलेले आहे. मातेचा मुखवटा तांदळा स्वरूपात असुन बेल ,राळ व शेंदुर यांपासुन बनवला आहे. संस्थानच्या वतीने याठिकाणी येणाऱ्या भाविक,यात्रेकरूंच्या सोयीसाठी विविध सुख सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. लोकवर्गणीच्या माध्यमातुन मातेला चांदीचे सिंहासन अर्पण करण्यात आले असुन सिंहासनारूढ असलेले मातेचे रूप मनोहारी स्वरूपाचे आहे. मागील सात वर्षांपासुन नवरात्रोत्सव काळात याठिकाणी भाविकांकडून आपली मनोकामना पुर्ण होण्यासाठी मनोकामना ज्योत लावल्या जात असुन ही ज्योत लावल्यानंतर आपली मनोकामना पुर्ण होत असल्याची भाविकांची श्रद्धा असल्याने यंदा अंदाजे ७००ते८०० भाविकांनी मनोकामना ज्योत लावली आहे. नवमीच्या दिवशी होम व इतर पुजाविधी पार पडल्या नंतर दसऱ्याच्या दिवशी याठिकाणी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असुन भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्त मंडळाने केले आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# एसआयआर प्रक्रिये विरोधात जिल्हयात आक्रोश

## इंडिया आघाडी व काँग्रेस पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयावर धडक

**धामणगाव रेल्वे/वार्ताहर**

मतदारांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी इंडिया आघाडी व काँग्रेस पक्षाच्या वतीने गुरुवारला (ता.१५) तहसीलदार, धामणगाव रेल्वे यांच्यामार्फत राष्ट्रपती यांना निवेदन सादर करण्यात आले.

बिहार, पश्चिम बंगालसह विविध राज्यांतील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करावी, पात्र मतदारांची नावे वगळली जाणार नाहीत



याची दक्षता घ्यावी आणि मतदानाच्या अधिकारापासून कोणालाही वंचित ठेवू नये, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.तसेच, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करून त्यांना पदावरून हटविण्याबाबत घटनात्मक तरतुदींनुसार कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली.त्यावेळी माजी आमदार तथा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष विरेंद्र जगताप , काँग्रेस तालुकाध्यक्ष पंकज वानखडे,जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे, शहराध्यक्ष चंदू डहाणे,कम्युनिस्ट नेते धम्माभाऊ खडसे, महिला तालुकाध्यक्ष अनिताताई मेश्राम,युवा काँग्रेस तालुकाध्यक्ष मयूर डुबे, शहराध्यक्ष आशिष शिंदे, NSUI तालुका अध्यक्ष दर्शन भोगे, NSUI शहर अध्यक्ष अथर्व पळसापूरे,नवीन कनोजिया, वसंत देशमुख, सो कविताताई गावंडे, उषा शर्मा ,श्रीमती शेळके,संजय शेंडे, दिनकर जगताप, अजय तूपसुंदरे ,नितीन दगडकर, सुनील भोगे,मुकुंद माहोरे, संजय तायडे, बालु तायडे,शेख रऊफ, राजीव भोगे,रोशन डाफ,प्रतीक भोंगे,



प्रफुल कडू,समीर पाटील, संजय गाडे,विशाल रोकडे, अनिल धांडे, नरेंद्र सावंत, संदीप भोगे, सुधीर शेळके, विठ्ठलराव सपाटे, प्रशांत भेंडे, रवींद्र गवई, देविदास धारणे, शुभम तरोणे, जगदीश कंटाळे, धनंजय शेलोकार, अशोकराव कडू, आकाश झेले, तन्वीर खान, अर्जुन शिंदे,विशाल बमनोटे, मनोज वेरुळकर, विलास माळोदे, विनोद डहाके, रुपेश गुल्हाने, पवन खुरपडे, विठ्ठलराव नेवल, शिशीर शेंडे, प्रकाश ढाणके, राजेश पुरोहित, विजय गाडबैल, सुरेश रामगुंडे, गणेश धवणे, रमाकांत इंगोले, मेहमूद भाई, संजय इंगळे, अविनाश इंगळे, उमेश शिसोदे, शरद मोहतुरे, विलास डुकरे, प्रशांत सबाने, प्रमोद दुबे, विपीन ठाकरे, विजय निमकर, निवृत्ती वैद्य, किशोर निस्ताने, रितेश निस्ताने, शैलेश निस्ताने, नितीन इंगळे, गिरीश गाडेकर, मंगेश बोबडे,देवराव बमनोटे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडणूक आयुक्तांनी तात्काळ राजीनामा द्यावा



**मोर्शी/वार्ताहर**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष मोर्शी शहर च्या वतीने निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा किंवा केंद्र सरकारने त्यांना बडतर्फ करण्यात यावे या मागणीसाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी च्या पुतळ्याजवळ तसेच तहसील कार्यालय मोर्शी येथे सरकारविरोधी नारेबाजी,घोषणाबाजी करीत तीव्र निदर्शने करण्यात येवून नायब तेहसीलदार चारुदत्त पाटील मार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

नारेबाजी करताना तहसील कार्यालय परिसर दणानून गेला होता. याप्रसंगी विपुल भडांगे सचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमेटी ओबीसि सेल, भुषण कोकाटे अध्यक्ष मोर्शी शहर काँग्रेस कमेटी तथा नगरसेवक, गोलु शेख, मुरलीनाना डहाणे, बबिता बोरेकर अध्यक्ष महिला काँग्रेस, सविता ठाकरे, पुष्पा परतेती, सुनीता कुमरे, सुरेश सिहले,अजीज पठाण,गजानन ठाकरे, पंकज विधळे, चंद्रशेखर तरारे, सय्यद फैझान,प्रकाश काळे, दिनेश बोरेकर, संकेत वानखडे, पंकज वाघमारे तसेच इतर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुख्य निवडणूक आयुक्तांना पदावरून हटवा; काँग्रेसची मागणी

**अचलपूर/वार्ताहर**

मतदार यादीतून पात्र मतदारांची नावे कथितरीत्या मनमानी पद्धतीने वगळली जात असल्याच्या तक्रारींची निष्पक्ष व सखोल चौकशी करावी तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करावी, अशी मागणी अचलपूर तालुका, शहर व परतवाडा शहर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.यासंदर्भात अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांना निवेदन सादर करून मतदार यादी प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याची मागणी करण्यात आली.

भारतीय संविधानाने प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार प्रदान केला आहे. लोकशाही व्यवस्थेत मतदाराचा हा अधिकार अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मात्र मतदार



यादीतून पात्र नागरिकांची नावे वगळली जात असल्याच्या कथित प्रकारांमुळे निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षतेबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मतदार यादीतील अनियमिततेमुळे कोणत्याही पात्र नागरिकाला मतदानाच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.या निवेदनाद्वारे मतदार यादीतील कथित अनियमिततेची निष्पक्ष चौकशी करून संबंधित प्रकरणांत दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.मतदार यादी तयार करण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता राखावी, पात्र मतदारांची नावे अन्यायकारकपणे वगळली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी आणि नागरिकांच्या तक्रारींची गांभीर्याने दखल घ्यावी, अशा प्रमुख मागण्याही निवेदनातून करण्यात आल्या आहेत.

निवेदन देतेवेळी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नामदेव तनपुरे, शहराध्यक्ष श्रीकांत झोडपे, परतवाडा शहराध्यक्ष राहुल गवई, तालुका काँग्रेस सेवादल अध्यक्ष सचिदानंद बेलसरे, सागर व्यास,तालुका काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष राहुल गाठे,आणि मीडिया सेलचे अध्यक्ष विशाल खानझोडे,अमोल चिमोटे, एहतेहशाम नबील,गुड्डू भाई नगरसेवक, अफजल गौरी, निकेश दाभाडे,असलम बंजारा, नगरसेवक राजाभाई, प्रमोद कांबळे, ऐजाजखान, अशोक दाणे, रामेश्वर रावेकर, वीरेंद्र वासनिक, रवींद्र हागवणे, अशोकराव तयावडे,वृतिक गायकवाड, सुधीर वानखडे, संजय मसूद, बाळासाहेब शरसूड्डे, भानुदास आखतकर, रमेश जवंजाळ, गौरव डकरे, रोहित जामनिक, सौरभ भोजने, प्रवीण हूड, जय घोरे, अनिस खान, जलील पठाण, सय्यद रफिक,मो.साद, तुळशीराम धुर्वे,रामदास हिवराळे,किसान तंतरपाडे, अफजल गौरीसह काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सेमाडोह येथे रविवारी 'नालसा मेगा ड्राईव्ह' अंतर्गत विशेष कार्यक्रम

### १३ योजनांचा लाभ मिळणार

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (नालसा) व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार चिखलदरा तालुक्यातील दुर्गम व आदिवासीबहुल सेमाडोह गावात रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर होणाऱ्या या कार्यक्रमात १३ नालसा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ वितरित केले जाणार आहेत. 'न्याय तुमच्या दारी' ही संकल्पना साकारण्यासाठी २५ ऑगस्ट २०२६ पासून सुरू झालेला हा मेगा ड्राईव्ह २३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत चालणार आहे.कार्यक्रमाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि अमरावती जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती प्रविण एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष उज्ज्वला एम. नंदेश्वर राहतील.या उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर,मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, धरणीचे उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, पोलीस अधीक्षक निकेतन कदम,उपवनसंरक्षक, सिपना वन विभाग नीता काटे आदी उपस्थित राहणार आहे.शिक्षण, बालकल्याण, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, मानसिक आजाराने ग्रस्त व्यक्ती, असंगठित क्षेत्रातील कामगार, मानवी तस्करी व ?सिड हल्ला पीडित, वन्यजीव-मानव संघर्षामुळे बाधित व्यक्ती आणि गरजू कुटुंबांसाठी असलेल्या नालसा योजनांच्या अंमलबजावणीवर यात विशेष भर दिला जाईल. कार्यक्रमाच्या ठिकाणी नागरिकांच्या सुविधेसाठी विविध शासकीय विभागांचे माहिती व मार्गदर्शन स्टॉल देखील उभारण्यात येणार आहेत.

हा उपक्रम जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे आणि तालुका विधी सेवा समिती, अचलपूरचे अध्यक्ष पी. एच. खरवडे यांच्या समन्वयातून आयोजित करण्यात आला आहे. तसेच, अमरावती जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशमुख आणि अचलपूर तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. व्ही. डी. यावले यांच्यासह विधी स्वयंसेवक आणि स्थानिक ग्रामस्थ या कार्यक्रमासाठी सहकार्य करत आहेत.

## दुष्काळग्रस्त भागात शेतकऱ्यांना १२ तास वीजपुरवठा द्या-जिल्हाधिकारी

### वीजपुरवठ्यावर देखरेख ठेवण्यासाठी ग्राम व तालुकास्तरावर समित्या

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात यंदा कमी पर्जन्यमानामुळे दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. अल्प पावसामुळे विहिरी, कूपनलिका आणि स्थानिक जलस्रोतांची भूजलपातळी खालावली असून, उपलब्ध पाण्यावर पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांना सातत्यपूर्ण सिंचनाची आवश्यकता आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दररोज १२ तास वीजपुरवठा करण्याच्या शासनाच्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी संबंधित यंत्रणांना निर्देश दिले आहेत.

जिल्ह्यातील अनेक भागांत कृषी फिडरवर वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, अनियमित भारनियमन, कमी दाबाने वीजपुरवठा होणे तसेच ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर वेळेत न बदलणे, अशा तक्रारी शेतकरी व लोकप्रतिनिधींकडून प्राप्त होत आहेत. दुष्काळाच्या परिस्थितीत पिकांचे नुकसान टाळण्यासाठी शासनाच्या १२ तास वीजपुरवठ्याच्या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

वीजपुरवठ्याच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रत्येक महसुली गावात ग्रामस्तरीय वीज तपासणी पथक स्थापन करण्यात येणार आहे. या पथकात तलाठी, ग्रामसेवक किंवा ग्रामविकास अधिकारी, कृषी सहाय्यक, पोलीस पाटील, गावातील प्रगतिशील शेतकरी तसेच महावितरणचा तांत्रिक कर्मचारी यांचा समावेश असेल.या पथकाने गावातील कृषी फिडरवरून शेतकऱ्यांना नियमानुसार दररोज १२ तास वीजपुरवठा होतो की नाही,याची नियमित नोंद ठेवावी.वीजपुरवठा वारंवार खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे किंवा ट्रिपिंगच्या समस्या उद्भवल्यास शेतकऱ्यांशी संवाद साधून परिस्थितीची पाहणी करण्यात येईल. गावातील वीजपुरवठ्याची वेळ, वीज सुरू व बंद होण्याची वेळ आणि तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात स्वतंत्र वीज नोंदवही ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

तालुकास्तरावर तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नियंत्रण समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीत महावितरणचे उपकार्यकारी अभियंता किंवा सहाय्यक अभियंता, तालुका कृषी अधिकारी आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांचा समावेश असेल. तहसीलदारांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत दर सोमवारी आढावा बैठक घेऊन वीजपुरवठ्याच्या परिस्थितीचा आढावा घ्यावा. ग्रामस्तरीय पथकांकडून प्राप्त झालेल्या वीज खंडित होण्याच्या किंवा कमी दाबाच्या तक्रारींवर महावितरणने २४ तासांच्या आत तांत्रिक दुरुस्ती करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## वाचन प्रेरणा दिन साजरा



**अमरावती-**पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी अमरावती, येथील राष्ट्रीय सेवा योजना युनिट द्वारे ग्रंथालयामध्ये भारताचे माजी राष्ट्रपती व महान वैज्ञानिक डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानवृद्धी व्हावी आणि पुस्तक वाचनाचे महत्त्व समजावे यासाठी विद्यार्थ्यांकडून पुस्तकाचे वाचन करून घेण्यात आले.त्याचबरोबर विद्यार्थ्यांकडून वाचन प्रतिज्ञा घेण्यात आली.विद्यार्थ्यांनी आपले आवडते पुस्तक वाचून त्यावर थोडक्यात अभिप्रायही व्यक्त केला.कार्यक्रमाचे नियोजन हे महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.दीप्ती बी. रुईकर यांच्या मार्गदर्शनात करण्यात आले. सर्व कार्यक्रमाचे नियोजन राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या स्वयंसेवकांनी तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ.अमित आर. जयस्वाल .प्रा.निशा वरनदानी,त्याचबरोबर ग्रंथपाल मीनल देशमुख आणि सहाय्यक ग्रंथपाल शुभम राऊत यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये मुलांनी उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## ज्ञानेश्वर यावले यांची नियुकती



**अमरावती-**येथील क्रांती ज्योती ब्रिगेड महाराष्ट्र प्रदेश संघटनेच्या महानगर अध्यक्ष पदावर सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर यावले यांची एकमताने निवड करण्यात आली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. नंदेश अंबाडकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या आढावा बैठकीत सदर निवडीबद्दल करण्यात आली. याप्रसंगी रत्नाकर चरडे पंजाबराव फरकाडे,ओमप्रकाश अंबाडकर, देवानंद गणोरकर , प्रा.सुरेश यावले, राजाभाऊ खवले, रविंद्र चौधरी,जिल्हाध्यक्ष ॲड.प्रभाकर वानखडे, प्रशांत शेगोकर, दत्ताजी घाटोळ, दिपक मेहरे, महिला आघाडीच्या श्रीमती किरणताई मेहरे, सुलभाताई यावले, वनिता खवले, निलीमा काळे, जयाताई खवले,विद्या यावले, लंगडेताई, जया खासबागे, शिल्पा सिनकर,अनिता चरडे आदी उपस्थित होते.

## लांब उडीत विशाखा मेश्रामची जिल्ह्यात बाजी



**चांदूर रेल्वे-**अमरावती येथे आयोजित जिल्हास्तरीय आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत श्री बेंडोजीबाबा विद्यालय, घुईखेड येथील विद्यार्थिनी विशाखा मेश्राम हिने लांब उडी या क्रीडा प्रकारात जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे आगामी विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी तिची निवड झाली असून, तिने विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.सातत्यपूर्ण सराव, कठोर मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर विशाखाने हे यश संपादन केले. तिच्या या यशामागे विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जी. बी. पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विशाखाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. एन. अंबुलकर, शिक्षकवृंद तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच आगामी विभागीय स्पर्धेतही उत्कृष्ट कामगिरी करून विद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, यासाठी तिला शुभेच्छा दिल्या. विशाखाच्या या यशामुळे विद्यालयासह घुईखेड परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## स्व.किशोर कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**वऱ्हा-** महान संगीतकार, निर्माते, दिग्दर्शक, अभिनेते आणि अष्टपैलू गायक स्व. किशोर कुमार यांच्या स्मृतिदिनानिमित्त अमरावती येथील केकेडी किशोर के दीवाने कराओके स्टुडिओ येथे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.संचालक गजेंद्र पाखरे यांच्या हस्ते स्व. किशोर कुमार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. यावेळी उपस्थित संगीतप्रेमी व केकेडी परिवारातील सदस्यांनी किशोरदांच्या अजरामर गीतांच्या माध्यमातून त्यांना आदरांजली वाहिली.याप्रसंगी दिलीप लाड, नितीन कुऱ्हेकर, अजय मोहोड, संदीप मोहोड, बाळकृष्ण पद्मण, विजय करसे, गणेश डाखोरे,संतोष बाहे, वसंतराव पाटील, संजोग विल्हेकर, विशाल सूर्यवंशी, संतोष शर्मा,डॉ.प्रवीण तांबडे, डॉ.अतुल जैन, मनोज पापडकर,अशोक नितनवरे,रविकिरण भोगे ममता पापडकर, मिनाक्षी पांडे, संगीता कुर्वे, राधा डाखोरे असे असंख्य संगीतप्रेमी उपस्थित होते.

# 'सुरक्षित नारी, सक्षम नारी..समृद्ध समाजाचा आधार' संकल्पनेतून विदर्भाच्या महाराणीच्या दरबारात जनजागृती!

### पोलीस उपायुक्त सोनवणे यांच्यासह मान्यवरांकडून उपक्रमाचे कौतुक

**अमरावती/का.प्र.**

श्री अंबानगरी नवदुर्गा उत्सव मंडळ, भाजी बाजार, अंबागेट, अमरावती यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही 'विदर्भाची महाराणी नवरात्र महोत्सव २०२६' धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे.'सुरक्षित नारी, सक्षम नारी..समृद्ध समाजाचा आधार' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून महिलांची सुरक्षितता, सक्षमीकरण, स्वाभिमान आणि समाजातील स्त्रीशक्तीचे महत्त्व अधोरेखित करणारा विशेष जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



या उपक्रमांतर्गत परिसरातील महिला, युवती व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत प्रभावी पथनाट्य सादर केले. महिलांची सुरक्षितता, स्त्रीशिक्षण, महिलांचा सन्मान, आत्मविश्वास, स्त्री-पुरुष समानता आणि समाजातील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी अशा महत्त्वपूर्ण विषयांवर पथनाट्याच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून पोलीस उपायुक्त सोनवणे, मंडळाचे विशेष मार्गदर्शक नानकरामजी नेभनानी, वरिष्ठ महिला पोलीस निरीक्षक सीमा दातालकर, माजी नगरसेविका ललिता रतावा तसेच सुरेश रतावा यांच्यासह परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, महिला, युवती व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.पथनाट्याच्या यशस्वी आयोजनासाठी लीना महाजन, शुभांगी आसरकार, अमृता संगणे, शीतल ठाकरे, पायल ठाकरे, शिवानी रायपूरकर, तन्वी अन्नदाते, सिद्धी मरोडकर, वंशिका मोकाटकर, पूजा उंबरकर, सारिका मरोडकर, वैदेही अनासाने, नंदिनी गौड, श्रावणी गौड, सृष्टी काळभांडे, परी कांबळे आणि स्वानंदी गौड यांनी विशेष परिश्रम घेतले.या सामाजिक जनजागृतीपर कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री अंबानगरी नवदुर्गा उत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला सदस्य आणि युवकांनी विशेष परिश्रम घेतले.

# '७९ पार्क अॅव्हेन्यू'




**मा**गील दोन आठवड्यात मुंबई आणि ठाणे परिसरात टिव्ही तसेच सिनेमा क्षेत्रात काम करणाऱ्या तीन अभिनेत्रींना 'धंदा' करताना पकडले गेले. या प्रकारच्या बातम्या अलीकडे सातत्याने दिसताहेत. पकडलेल्या मुलींची नावे गुप्त ठेवणे कायद्याने बंधनकारक आहे, त्याचे कसून पालन केले जाते. मात्र त्यांचे पुढे काय होते याचा चकार शब्द कुठेही छापून येत नाही. असे का होते याची उत्तरे भयावह आहेत!

'७९ पार्क अॅव्हेन्यू' या कादंबरीची नायिका मेगन राइट याच प्रवृत्तीवर कठोर प्रहार करते. ती म्हणते की, या दलदलीत ह्या बायकांना कोण कोण घेऊन येतं आणि यांचे शोषण कोण कोण करतं हे जोपर्यंत कथित सभ्य समाजाला कळणार नाही तोपर्यंत हा समाज या बायकांनाच कुलटा आणि नीच म्हणत राहील! ह्या बायका तितक्या वाईट नाहीत, वाईट ते लोक आहेत जे यांना ह्या दलदलीत ढकलून नामानिराळे होतात; वाईट ते लोक आहेत जे यांच्या पैशांवर जगतात आणि सर्वात वाईट ते लोक आहेत जे बाहेर नारीसन्मानाच्या गाथा गातात आणि वास्तवात यांचे अतिव शोषण करतात!

साठच्या दशकात प्रकाशित झालेली '७९ पार्क अॅव्हेन्यू' ही कादंबरी विख्यात लेखक हेरॉल्ड रॉबिन्स यांनी लिहिली. अत्यंत वादळी पार्श्वभूमी, वेधक मांडणी, प्रवाही लेखनशैली आणि मानवी भावनांचे पदर उलगडणारे सशक्त कथानक ही या कादंबरीची प्रमुख वैशिष्ट्ये. न्यूयॉर्क शहराच्या उच्चभ्रू वस्तीतील लखलखत्या पडद्याआड दडलेल्या अंधाऱ्या जगाचे आणि एका स्त्रीच्या अथांग संघर्षाचे चित्रण या कथेत आहे. सामाजिक प्रतिष्ठा, कायद्याचा बडगा आणि वासनेच्या बाजारात स्वतःचे अस्तित्व जपणाऱ्या एका स्त्रीची ही अतिशय कारुण्यमय यशोगाथा आहे.

कथेची नायिका मॅरिलीन जॉर्डन हिचे बालपण अत्यंत गरिबीत आणि कौटुंबिक छळात जाते. तिचे सावत्र वडील तिचा शारीरिक आणि मानसिक छळ करतात. एका भीषण प्रसंगात स्वतःचा बचाव करताना मॅरिलीनच्या हाताने सावत्र वडिलांवर हल्ला होतो.कायदा आणि समाज तिच्या परिस्थितीचा विचार न करता तिला गुन्हेगार ठरवतो आणि तिची रवानगी सुधारगृहात केली जाते. हा प्रसंग तिच्या निष्पाप मनावर खोल जखम करतो आणि जगाकडे बघण्याचा तिचा दृष्टिकोन कायमचा बदलतो.

सुधारगृहातील जगणे मॅरिलीनसाठी नरकापेक्षा कमी नसते. तिथून सुटल्यानंतर ती पुन्हा सन्मानाने जगण्याचा प्रयत्न करते. याच काळात तिच्या आयुष्यात माईक कीफे नावाचा एक महत्त्वाकांक्षी, देखणा तरुण येतो. तो कायद्याचे शिक्षण घेतोय. माईकच्या रूपाने, मॅरिलीनला आयुष्यात पहिल्यांदाच खऱ्या प्रेमाची आणि स्नेहादराची अनुभूती मिळते. दोघांचेही सुखाचे दिवस सुरू होतात, परंतु मॅरिलीनचा दुर्दैवी भूतकाळ आणि तिची पार्श्वभूमी समजताच माईकचे कुटुंब त्यांच्या नात्याला कडाडून विरोध करते. परिस्थिती अशा वळणावर येते की, माईकही तिच्यापासून दुरावतो.

प्रेम आणि समाज या दोघांनीही नाकारलेली मॅरिलीन उदरनिर्वाहासाठी आणि जगण्यासाठी एका अशा जगात पाऊल ठेवते, जिथून परतण्याचा मार्ग नसतो. ती वेश्या व्यवसायाच्या चक्रव्यूहात अडकते. सुरुवातीला ती खचते. मात्र ती स्वतःचे अस्तित्व शोषण व्यवस्थेचा बळी ठरण्यापुरते ठेवत नाही; ती परिस्थितीला आपल्या हातातील शस्त्र बनवते. त्यासाठी सर्वात आधी ती आपले नाव बदलून 'मेगन राइट' असे करते. आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या आणि सौंदर्याच्या जोरावर ती न्यूयॉर्कमधील सर्वात आलिशान आणि हाय प्रोफाइल कॉल-गर्ल एजन्सी सुरू करते; जिचा पत्ता असतो, '७९, पार्क अॅव्हेन्यू'. लवकरच, शहरातील बडे राजकारणी, उद्योगपती आणि न्यायाधीश तिच्या या साम्राज्याचे नियमित ग्राहक बनतात. तिच्याकडे अफाट पैसा आणि सत्ता येते, पण मनातले एक एकाकीपण कायम राहते.

मेगन राइटचे हे गुप्त साम्राज्य कायद्याच्या नजरेतून सुटू शकत नाही. न्यूयॉर्कमधील संघटित गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करण्यासाठी सरकार एका विशेष वकिलाची नियुक्ती करते.नशिबाच्या क्रूर खेळाचे फासे असे पडतात की, हा वकील दुसरा कोणी नसून मेगनचे जुने प्रेम,तिचा एक्स प्रियकर, माईक कीफे असतो.माईक आता एक प्रामाणिक आणि कर्तव्यतत्पर कठोर सरकारी वकील बनलेला असतो. ज्या स्त्रीवर त्याने कधीकाळी जीवापाड प्रेम केले होते, तिलाच आता गुन्हेगार म्हणून न्यायालयाच्या पिंजऱ्यात उभे करण्याची ऐतिहासिक जबाबदारी त्याच्यावर येते.

कादंबरीचा उत्तरार्ध हा पूर्णपणे कोर्टरूम ड्रामावर केंद्रित आहे. माईक आणि मेगन समोरासमोर येतात. एका बाजूला माईकचे कायद्याचे कर्तव्य असते,तर दुसऱ्या बाजूला मेगनचा स्वाभिमान. खटल्यादरम्यान मेगनच्या आयुष्यातील एकेक काळेकुट्ट सत्य आणि समाजधुरिणांचे ढोंगी चेहरे जगासमोर येऊ लागतात. माईकला जाणीव होते की, मेगनला गुन्हेगार बनवण्यात या समाजाचा आणि न्यायव्यवस्थेचाच मोठा वाटा होता.

हा खटला केवळ मेगनच्या शिक्षेपुरता मर्यादित राहत नाही, तर तो संपूर्ण उच्चभ्रू समाजाच्या नैतिकतेचे लक्तरे वेशीवर टांगतो.मेगन आपल्या गुन्ह्यांची आणि संघर्षाची किंमत चुकवायला तयार होते, परंतु ती माईकच्या आणि जगाच्या डोळ्यात अंजन घालण्यात यशस्वी ठरते. शारीरिक शोषणाच्या गर्तेतून तावून सुलाखून निघालेली मेगन, पुरुषांच्या या जगात स्वतःच्या अटींवर जगून एक वेगळा आदर्श आणि न्यायाची नवी व्याख्या मागे सोडून जाते.

'७९, पार्क अॅव्हेन्यू' ही केवळ एका कॉल-गर्लची कथा नाही, तर ती एका स्त्रीच्या अस्मितेचा, तिच्या अदम्य इच्छाशक्तीचा आणि पुरुषांच्या दुटप्पी नैतिकतेवर कोरलेला एक जळजळीत साहित्यिक दस्तऐवज आहे.मेगन राइट आपल्या वाताहतीबद्दल जे काही सांगते त्यातला शब्द न शब्द आजही लागू होतो! आपल्याकडेही पकडले गेल्यानंतर ज्या स्त्रिया आपले नाव जाहीर करण्यास स्वखुशीने राजी असतील त्यांच्या शोषणाची समग्र माहिती पब्लिक डोमेनमध्ये यायला पाहिजे. मनोमन खात्री आहे की, आपल्याकडचे अनेक नैतिकतेचे शुभ्रधवल राजहंस वासनेच्या चिखलात आकंठ बुडालेले आहेत हे जनतेच्या समोर येईल! हे व्हायला पाहिजे.

आपल्याकडे प्रत्येक राज्यात शहरात असे '७९, पार्क अॅव्हेन्यू' आहेत ज्यांचे शोषणबिंदू बलाढ्य आणि नीतिमान मानल्या जाणाऱ्या लोकांच्या हाती केंद्रित आहेत, त्यांच्या शक्तिशाली साखळ्या आहेत! कालपरवा पकडल्या गेलेल्या अभिनेत्री अशाच एका साखळीच्या कड्या आहेत!

**समीर गायकवाड**

# भक्ती की व्यावसायिक इव्हेंट?

**न**ऊ दिवस चालणारा नवरात्रोत्सव आणि घराघरांपासून ते मोठ्या मैदानांपर्यंत दुमदुमणारा 'गरबा' हा आपल्या संस्कृतीचा एक अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा भाग आहे.आजच्या काळात नवरात्र म्हटले की डोळ्यांसमोर येतात ती झगमगीत प्रकाशझोत असलेली मोठी मैदाने, डीजेचा कर्णकर्कश आवाज आणि महागडे कपडे घालून थिरकणारी तरुण मंडळी. पण आजकाल गरब्याला जाताना किंवा त्यात सहभागी होताना प्रवेशासाठी आकारली जाणारी भरमसाठ तिकीटांची रक्कम, महागडे पासेस आणि त्यावरील मोठी आर्थिक उलाढाल पाहून प्रश्न पडतो, की ज्या गरब्यामागे एक पवित्र अध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरा होती, त्याचे आज नेमके काय?

मुळात 'गरबा' हा शब्द संस्कृतमधील 'गर्भदीप' किंवा 'गर्भ' या शब्दापासून आला आहे.प्राचीन परंपरेत मातीचा एक छिद्रयुक्तघडा मध्यभागी ठेवून त्यात दिवा(दीप) तेवत ठेवला जाई. हा घड सृष्टीच्या गर्भाचे प्रतीक मानला जायचा, तर आतील दिवा हा त्यातील चैतन्य व दैवी शक्तीचे प्रतीक होता. स्त्रिया एकत्र येऊन या 'गर्भदीपाभोवती' किंवा देवीच्या मूर्तीभोवती फेर धरून आदिशक्तीची (दुर्गामाता) आराधना करत असत.वर्तुळ हे जीवनचक्र आणि अनंत काळाचे प्रतीक मानले गेले आहे, जिथे सर्वजण मिळून त्या परमशक्तीला मध्यभागी मानून लीन होतात. हा संपूर्ण प्रवास गुजरातच्या लोकसंस्कृतीतून सुरू होऊन आज देशभरात पसरला आहे.

परंतु,काळानुरूप या पारंपरिक आणि सात्विक लोकनृत्याचे स्वरूप आता पूर्णपणे बदलले आहे.पूर्वी गरबा हा गल्लीच्या चौकात, मंदिराच्या प्रांगणात किंवा घरच्या घरी अगदी विनामूल्य खेळला जाणारा भक्तीचा व आनंदाचा सोहळा होता. आज मात्र त्याचे रूपांतर एका मोठ्या व्यावसायिक उद्योगात झाले आहे. मोठ्या शहरांमध्ये आणि क्लबसमध्ये लाखो रुपयांची तिकीट विक्री करून आणि महागड्या पासेसची सक्ती करून हा उत्सव साजरा केला जातो. पारंपारिक लोकसंगीताची जागा आता हाय-फाय डीजे आणि इलेक्ट्रॉनिक संगीताने घेतली आहे. वृत्तपत्रे, टीव्ही आणि सोशल मीडियावर कोट्यवधी रुपयांची जाहिरातबाजी करून या उत्सवाला ग्लॅमरचे रूप दिले गेले आहे.

नवरात्रीचे नऊ दिवस हे प्रामुख्याने देवीच्या नऊ रूपांचे पूजन करण्यासाठी आणि आदिशक्तीची आराधना करण्यासाठी असतात. हा उत्सव निसर्गाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि स्त्रीशक्तीचा सन्मान करण्याचा आहे. मनोरंजनाचा आनंद नक्कीच घ्यावा, पण तो घेताना आपल्या संस्कृतीचे मूळ पावित्र्य, देवीची उपासना आणि त्याचा अध्यात्मिक अर्थ विसरून चालणार नाही. गरब्याच्या नावाखाली चालणारे हे व्यावसायिक अवडंबर कुठेतरी थांबवून आपल्या अस्सल लोकसंस्कृतीचे व भक्तीचे जतन करणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे.

**रेणुका हरदास**
नागपूर

## शिक्षक आमदार कशासाठी ?

कित्येक वर्षापासून माध्यमिक
ज्यु.कॉलेजची रिक्त आहेत पदे
विद्यमान शिक्षक

आमदारांनी का
शासनास धारेवर धरले
नाही गडे?.

शाळा म्हणजे अधिकृत प्रमाणपत्रे
देण्याचे बनलेत अड्डे

रिक्त पदे असुनही
निकाल अंशी टक्के लागतो
हे उघड गुपित आहे ना गडे...

पालक संस्थाचालक
हे जाणून आहेत सारे

झाकली मुठ सव्वा लाखाची
म्हणती ते खोटे नाही गडे ..

आर्थिक नुकसान झाले तर
ते भरून येईल काढता
विद्यार्थ्यांचे भविष्यच बर्बाद
करणाऱ्यांना कोणती शिक्षा देता?

तांत्रिक कारणे सांगुन
करू नका भुलावन
अशा वेळकाढू यंत्रणेला
का बरे करायचे सहन?

शिक्षणाप्रती यंत्रणेचे
धोरण दिसते उदासिन
म्हणून कोचिंग क्लासेसना
आले अच्छे दिन..!

**अशोक सारडा मेहकर**
मो.९४२१३९४३३९

# मासिक पाळीचा शास्त्रशुद्ध धांडोळा

**अरुणा देशपांडे यांनी लिहिलेले 'एका 'शापा'ची जन्मकथा' हे पुस्तक मासिक पाळी या विषयाचा विविध अंगांनी आढावा घेते. या पुस्तकाची ओळख..**

**मा**सिक पाळी ही एक नैसर्गिक घटना परंतु जगभरातील बहुतेक सर्व समाजांमध्ये ती मल-मूत्र विसर्जनासारखी एक सामान्य जैविक बाब मानली जात नाही. मासिक पाळीभोवती अनेक सांस्कृतिक-सामाजिक धारणा व चालीरीतींचा गोफ विणलेला असतो व त्याचा प्रत्येक बाईच्या आयुष्यावर परिणाम होत असतो.

मुलींना मासिक पाळीविषयी माहिती देताना शरीरात कोणते बदल होतात एवढेच सांगणे पुरेसे नाही तर या विषयाशी निगडित सामाजिक व सांस्कृतिक मुद्द्यांबद्दल देखील बोलले पाहिजे असे लेखिका मानते.त्यामुळे,'मासिक पाळीकडे आपल्या समाजात एवढ्या तिरस्करणीय आणि गोपनीय दृष्टीने का पाहिले जाते?','मासिक पाळीच्या काळात स्त्रीला अमंगल अपवित्र का मानले जाते?','तिच्यावर निरनिराळी धार्मिक, शारीरिक बंधने का घातली जातात?', 'स्त्रीत्वाच्या या महत्त्वपूर्ण अनुभवाला आपल्या संस्कृतीने विटाळ म्हणून का पाहिले असावे?' या प्रश्नांचा धांडोळा लेखिकेने या पुस्तकाच्या माध्यमातून घेतलेला आहे. धार्मिक बंधनांचा उगम शोधण्यासाठी लेखिकेने काही धार्मिक ग्रंथ, प्राचीन भारतीय आयुर्वेद शास्त्रावरची पुस्तके यांचे वाचन केले आहे. तसेच मासिक पाळी हा फक्त स्त्रियांचा विषय नसून पुरुषांनी देखील हे समजून घेणे आवश्यक आहे हे लेखिकेने स्पष्ट केले आहे.

या पुस्तकातील 'आम्हाला बोलायचं आहे' या प्रकरणात काही स्त्रियांनी त्यांच्या मासिक पाळीशी निगडित अनुभवांचे कथन केलेले आहे. ते वाचताना वाचकाला स्वतःच्या परिवारातील अनेक घटना डोळ्यासमोर येतात व त्या आठवणींच्या पार्श्वभूमीवर आपण पुढील माहिती समजून घेण्यासाठी अधिक उत्सुक बनतो. या पुस्तकातील 'शापाचे मूळ' व 'मनूचे मनोदर्शन' या प्रकरणांमध्ये भारतातील विविध राज्ये आणि जगभरातील विविध देशांतील मासिक पाळीशी संबंधित समजुती व चालीरीतींचा लेखाजोखा मांडलेला आहे. त्यात लेखिका सांगते की '... पाळीशी निगडित सर्व जगभर अस्तित्वात असणाऱ्या समज-गैरसमज व अंधश्रद्धांच्या मुळाशी स्त्रीला पाळीच्या काळात होणाऱ्या रक्तस्त्रावामध्ये अतिमानवी किंवा दैवी शक्ती असते अशी एक सर्वमान्य कल्पना आहे.' काही ठिकाणी ही दैवी शक्ती दुष्ट मानली जाते तर काही ठिकाणी त्या रक्तस्त्रावात सामर्थ्य असते असे मानले जाते. मासिक पाळीशी निगडित विविध प्राचीन कथा देखील लेखिकेने या विभागात सांगितल्या आहेत.




पुस्तक वाचताना कळते की मासिक पाळीला 'प्रॉब्लेम' मानणारा दृष्टिकोन समाजात खोलवर रुजल्याने वैद्यकीय शास्त्राचे विद्यार्थी स्त्री रोग शास्त्राच्या अभ्यासासाठी जेफकॉट यांचे जे प्रसिद्ध पुस्तक वापरतात त्यात देखील मासिक पाळीला 'गर्भाशयाचे अश्रू' असे संबोधले आहे. वास्तविक पाहता एका जैविक क्रियेला दुःखाचे लेबल लावण्याची कोणतीच आवश्यकता नाही.

'पाळी'विषयी वैज्ञानिक दृष्टिकोन

'अशीही एक वैद्यकसत्ता...' या प्रकरणात लेखिकेने मासिक पाळीच्या काळात स्त्रीने पाळावयाच्या आयुर्वेदप्रणित नियमांची वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सा केली आहे. ती प्रत्येकाने जरूर वाचायला हवी. पुढे जाऊन लेखिकेने मासिक पाळीविषयी आधुनिक वैद्यकशास्त्रात आढळणाऱ्या पूर्वग्रहदूषित विचारसरणीचा देखील आढावा घेतलेला आहे. 'मानसिक असुरक्षितता, नैसर्गिक भावनांना नकार, सांस्कृतिक दडपण, सामाजिक बंधने, प्रस्थापित सौंदर्य कल्पना, लैंगिकता शिक्षणाचा अभाव, मुलींना पदरातील निखारा मानण्याची वृत्ती, प्रसारमाध्यमे या सर्वांचा वयात येणाऱ्या मुलींच्या आयुष्यावर काय परिणाम होतो याचा आढावा लेखिकेने 'नाते तना मनाचे' या प्रकरणात घेतलेला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनातून मासिक पाळी संबंधी माहिती देणारे एक परिशिष्ट पुस्तकाच्या शेवटी जोडण्यात आलेले आहे. त्यामध्ये मासिक पाळी आणि पुनरुत्पादन यांचा संबंध, आंतरस्त्रावी ग्रंथी आणि मासिक पाळीचे चक्र, मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखण्याची शास्त्रीय कारणे, मासिक पाळीच्या वेळी होणारा त्रास व लग्न यांचा संबंध, मासिक पाळी लांबवण्यासाठी गोळ्या घेणे, पाळी बंद होण्याच्या काळात होणारा त्रास... आदी विविध मुद्द्यांची शास्त्रीय माहिती देण्यात आलेली आहे.

स्वतःच्या व आजूबाजूच्या कुटुंबांमध्ये वर्षानुवर्षे मासिक पाळीशी निगडित चालीरीती चालत आलेल्या दिसतात. त्यामुळे जणू काही त्या अनादी आहेत असे आपल्याला वाटत असते. परंतु हे पुस्तक वाचून आपल्या लक्षात येते की माणूस सुमारे दोन लाख वर्षांपूर्वी अस्तित्वात आला म्हणजे मासिक पाळी ही जैविक घटना गेली काही लाख वर्षे अस्तित्वात आहे आणि मासिक पाळीशी निगडित समजुतींचा इतिहास मात्र केवळ दोन ते पाच हजार वर्षांचाच आहे. लोकवाङ्मयगृह, मुंबई यांनी हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

**मुक्ता दाभोळकर**
(लेखिका अंधश्रद्धा निर्मूलन, पंचायत राज प्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत.)

# साहित्य दुर्गा प्रा. पद्मा प्रवीण हुशिंग



**चौथी माळ**

**र**सिकांनो,आज मी अशा व्यक्तीचा आपणास परिचय करून देणार आहे की, ती व्यक्ती साहित्य, शिक्षण आणि समाज कार्यात अग्रेसर आहेत. त्या व्यक्तीचे नाव पद्मा प्रवीण हुशिंग.पद्माताई पुण्याला राहतात. पद्माताईंनी एम.ए.एम.एड, साहित्य भूषण, निसर्गोपचार तज्ञ ,नाट्यशास्त्र पदविका संपादन केलेली आहे. त्या २७ वर्ष शिक्षण क्षेत्रामध्ये आवडत्या शिक्षका/ प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या.साहित्य क्षेत्रामध्ये कथा,कविता,ललित, नाट्य संहिता, संत साहित्य, नाट्य संहिता लेखन,संपादन, वृत्तपत्र सदर लेखन, दिवाळी अंकात लेखन त्या सतत करीत असतात.'व्याख्याता आणि परीक्षक' म्हणूनही त्या आमंत्रित असतात.

सामाजिक कार्याचा विचार केला तर त्यांनी कामगार महिलांना बचतीचे महत्त्व सांगून बँक व्यवहार शिकवले.गरीब विद्यार्थ्यांना अनेक प्रकारची मदत केली.दोन अनाथ मुलींचे पालन करून कन्यादान केले.दहावी आणि बारावीच्या गरीब विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन केले. 'झाले मोकळे आकाश' व 'अशी मी अशी मी' ह्या नाट्यप्रयोगाद्वारे स्त्री समस्येचा आणि सबलीकरणाचा प्रचार त्यांचा आजही सुरू आहे.माझी आणि त्यांची खरी ओळख 'आम्ही सिद्ध लेखिका' या संस्थेमध्ये मी रुजू झाल्यानंतर झाली. पद्माताई अध्यक्षा आहेत आणि मी अमरावती शाखेची पूर्वी कोषाध्यक्ष होते आणि आता कार्याध्यक्ष आहे त्यामुळे त्यांच्या कामाचा व्याप.'लिहा आणि लिहिते व्हा' हे ह्या संस्थेचे हे ब्रीद आणि म्हणून सतत स्त्रियांना प्रेरणा देऊन महाराष्ट्रातील, विदर्भ, मराठवाडा, कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र ,ठाणे, पुणे, मुंबई, गोवा, दिल्ली, गुजरात,मध्य प्रदेश इथेही संस्थेच्या शाखा आहेत. शिवाय परदेशातूनही काही लेखिका या संस्थेशी जोडलेल्या आहेत.ह्या संस्थेने आतापर्यंत चार साहित्य संमेलने राज्यस्तरीय घेतलेली आहेत.आता नऊ आणि दहा जानेवारीला २०२७ मध्ये पाचवे महिला साहित्य संमेलन होणार आहे. संस्थेच्या विविध कार्यामुळे पुणे येथे जानेवारीत होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने 'राज्यस्तरीय कथालेखिका नांदी संमेलन' करण्याचा मान ह्या संस्थेला मिळाला आहे. आणि एक नोव्हेंबर २०२६ ला पुणे येथे हे संमेलन होणार आहे ज्यात दोनशे 'कथालेखिका' सहभागी होणार आहेत .



जवळपास ३००० लेखिका कार्यरत असलेल्या ह्या संस्थेचे अध्यक्ष पद अतिशय जबाबदारीने आणि प्रेमाने ,वैयक्तिक संबंध ठेवून त्या सांभाळतात आणि त्यामुळेच संस्थेची प्रगती दिवसेंदिवस होते आहे.पद्माताई अतिशय प्रेमळ, कार्यतत्पर,हुशार आणि सामाजिक बांधिलकी अगदी मनापासून स्वीकारणाऱ्या,खऱ्या अर्थी समाजसेविका आहेत. आणि म्हणूनच ह्या समाजसेविकेचे हे कार्य असेच दिवसेंदिवस वृद्धिंगत होण्यासाठी आई जगदंबेला प्रार्थना करते.

**ॲड.सुलभा गोगरकर,**
अमरावती
मो.९४२३६००४६८



# लाखोंचे शौचालय झाडाझुडपांत गाडले

## आष्टी नगरपंचायतीच्या स्वच्छतेचा बोजवारा; शहीद स्मारक परिसरातच अस्वच्छतेचे दर्शन
## सामाजिक कार्यकर्ते प्रा.बी.टी. उरकुडे यांनी वेधले प्रशासनाचे लक्ष

**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**
शहरातील सार्वजनिक सुविधांची देखभाल करण्याची जबाबदारी असलेल्या आष्टी नगरपंचायतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे चित्र जुन्या बसस्थानक परिसरात दिसत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी लाखो रुपये खर्च करून उभारलेले सार्वजनिक शौचालय झाडाझुडपांच्या विळख्यात सापडले आहे. नियमित स्वच्छतेचा अभाव आणि परिसरातील वाढलेल्या झाडाझुडपांमुळे या सुविधेची दुरवस्था झाली असून, सार्वजनिक पैशातून उभारलेल्या मालमत्तेची देखभाल नेमकी कोण करणार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

जुन्या बसस्थानक परिसरात दररोज प्रवासी, व्यापारी आणि विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांची वर्दळ असते. या परिसरात सार्वजनिक शौचालयाची गरज असतानाही त्याच्या स्वच्छतेकडे आणि परिसराच्या निगेकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. लाखो रुपये खर्चून बांधकाम करायचे आणि नंतर त्याच्या देखभालीकडे पाठ फिरवायची, अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याची चर्चा नागरिकांत आहे.

**शहीद स्मारक परिसरातच अस्वच्छतेचा विळखा**

विशेष म्हणजे, याच परिसरात शहीद स्मारक असून येथे विविध सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिनानिमित्त शहरातील विविध शाळांचे विद्यार्थी शहीद स्मारकाला अभिवादन करण्यासाठी येतात. देशासाठी बलिदान देणाऱ्या शहीदांना नमन करण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परिसरातच सार्वजनिक सुविधेची अशी दुरवस्था असणे ही गंभीर बाब असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते प्रा. बी. टी. उरकुडे यांनी व्यक्त केले.



**बांधकाम झाले, देखभालीचे काय**

सार्वजनिक शौचालय बांधून विकासकामांची नोंद करणे पुरेसे नाही. त्याचा नागरिकांना प्रत्यक्ष लाभ मिळतो का, परिसर स्वच्छ राहतो का आणि आवश्यक दुरुस्ती वेळेवर होते का, याची जबाबदारीही प्रशासनाने पार पाडणे गरजेचे आहे. जुन्या बसस्थानकासारख्या वर्दळीच्या ठिकाणीच स्वच्छतेची ही अवस्था असेल, तर शहरातील सार्वजनिक सुविधांच्या देखभालीबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे.

**नगरपंचायत आता तरी जागी होणार का**

जुन्या बसस्थानक परिसरातील सार्वजनिक शौचालयाभोवती वाढलेली झाडाझुडपे तातडीने हटवावीत, संपूर्ण परिसराची स्वच्छता करावी आणि आवश्यक दुरुस्ती करून ही सुविधा नागरिकांच्या वापरासाठी सुस्थितीत ठेवावी, अशी मागणी होत आहे. शहीद स्मारक परिसराचे महत्त्व लक्षात घेऊन येथे कायमस्वरूपी स्वच्छता व्यवस्था राबविण्याचीही गरज आहे. आता नगरपंचायत प्रशासन प्रत्यक्ष कारवाई करून नागरिकांना दिलासा देणार की ही सुविधा दुर्लक्षितच राहणार, याकडे आष्टीकरांचे लक्ष लागले आहे.

> जुन्या बसस्थानक परिसरात शहीद स्मारक असून या ठिकाणी नेहमीच सार्वजनिक कार्यक्रम होतात. स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिनी शहरातील सर्व शाळांचे विद्यार्थी शहीद स्मारकाला अभिवादन करण्यासाठी येतात. त्यामुळे या परिसराची स्वच्छता आणि सार्वजनिक सुविधांची देखभाल करणे नगरपंचायतीने अत्यंत गांभीर्याने घेतले पाहिजे. या सर्व बाबींचा विचार करून प्रशासनाने तातडीने आवश्यक कार्यवाही करावी.
>
> **प्रा.बी.टी. उरकुडे,**
> सामाजिक कार्यकर्ते

# आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण काळाची गरज

## सहा.पोलीस निरीक्षक शिवराज जाधव यांचे प्रतिपादन

**देवळी/जनमाध्यम**
नैसर्गिक असो वा मानवनिर्मित, कोणतीही आपत्ती सांगून येत नाही. त्यामुळे संभाव्य संकटांचा सामना करण्यासाठी प्रत्येकाने सज्ज राहणे आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण शालेय आणि महाविद्यालयीन जीवनापासूनच दिले पाहिजे,असे प्रतिपादन देवळी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराज जाधव यांनी केले.



जागतिक आपत्ती व्यवस्थापन दिनानिमित्त स्थानिक एस. एस. एन. जे. महाविद्यालयातील एनसीसी भवनात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आणि आपत्ती व्यवस्थापन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मेरा युवा भारत, प्रहार समाज जागृती संस्था तसेच महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनीता सोनारे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सहायक पोलीस निरीक्षक शिवराज जाधव, मेरा युवा भारतचे युवा समन्वयक सतीश इंगोले आणि एनसीसी अधिकारी तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर उपस्थित होते.

आपत्ती व्यवस्थापनात एनसीसी छात्र सैनिकांची भूमिका' आणि 'आपत्ती व्यवस्थापनात सुजाण नागरिकांची भूमिका' या विषयांवर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. यात कॅडेट वंशिका एकोणकर हिने प्रथम, दीक्षा डेहनकर हिने द्वितीय, तर वैष्णवी भोयर हिने तृतीय क्रमांक पटकावला. कॅडेट आरती मरगडे, आकांक्षा थुल आणि अंजली गढवेकर यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कॅप्टन मोहन गुजरकर यांनी प्रास्ताविकातून आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्व स्पष्ट केले. सतीश इंगोले यांनी प्रत्येक तरुण-तरुणीने स्वयंस्फूर्तीने आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण घ्यावे, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. सुनीता सोनारे यांनी एनसीसीच्या या उपक्रमाचे कौतुक करत अन्य विद्यार्थ्यांनाही असे प्रशिक्षण मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले.सार्जंट साक्षी पारिसे हिने संचालन केले, तर यामिनी पारधी हिने आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अंडर ऑफिसर स्नेहा मडकाम, वैष्णवी कन्नाके, कुंदन कावडे, दुर्गेश पोटे, रितेश बुटे, सोमेश्वर पोराटे, विपुल पेंदाम, राम देशमुख आणि एनसीसी छात्र सैनिकांनी परिश्रम घेतले.

# कुष्ठरोगाचे आव्हान कायम, ११.२१ लाखांची तपासणी, ९० नवे रुग्ण

## १८ संसर्गजन्य, तर ७२ असंसर्गजन्य रुग्णांचा समावेश



**वर्धा/जनमाध्यम**
जिल्हा कुष्ठमुक्त करण्यासाठी आरोग्य यंत्रणेकडून विशेष कुष्ठरुग्ण शोधमोहीम राबविली जात असतानाच तपासणीत ९० नवीन रुग्ण आढळल्याने कुष्ठरोगाचे आव्हान अधोरेखित झाले आहे. १३ ऑक्टोबरपर्यंत जिल्ह्यातील ११ लाख २१ हजार नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यात १८ संसर्गजन्य, तर ७२ असंसर्गजन्य कुष्ठरुग्णांची नोंद झाली आहे. त्यामुळे केवळ सर्वेक्षण नव्हे, तर रुग्णांचे वेळेत निदान, उपचार आणि जनजागृती यांवरही भर देण्याची गरज निर्माण झाली आहे.

जिल्हा कुष्ठमुक्त करण्याच्या उद्देशाने आरोग्य विभागाच्या कुष्ठरोग विभागामार्फत ग्रामीण आणि शहरी भागात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन नागरिकांची तपासणी करीत असून संशयित रुग्णांचा शोध घेत आहेत. या मोहिमेत आढळलेल्या ९० रुग्णांपैकी ७३ रुग्ण ग्रामीण भागातील, तर १७ रुग्ण शहरी भागातील आहेत. ग्रामीण भागातील रुग्णांची संख्या अधिक असल्याने या भागात तपासणी आणि जनजागृती अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता स्पष्ट झाली आहे.

कुष्ठरोगाचे निदान उशिरा झाल्यास शारीरिक गुंतागुंत निर्माण होण्याचा धोका असतो. त्यामुळे शरीरावरील संशयास्पद डागांकडे दुर्लक्ष न करता वेळीच तपासणी करून घेणे महत्त्वाचे आहे. नव्याने आढळलेल्या रुग्णांचे वर्गीकरण करून त्यांच्यावर आवश्यक उपचार सुरू करण्यास आरोग्य विभागाने प्राधान्य दिले आहे.

तालुकानिहाय आकडेवारीत वर्धा तालुक्यात सर्वाधिक २१ नवीन कुष्ठरुग्ण आढळले आहेत. समुद्रपूरमध्ये ११, देवळी आणि कारंजा तालुक्यांत प्रत्येकी ९, सेलूमध्ये ८, तर हिंगणघाट, आर्वी आणि आष्टी तालुक्यांत प्रत्येकी ५ रुग्णांची नोंद झाली आहे.

नवीन रुग्णांची ओळख पटविणे, त्यांचे वर्गीकरण करणे आणि आवश्यक उपचार सुरू करणे यांना मोहिमेत प्राधान्य दिले जात आहे. कुष्ठरोगाचे निदान लवकर झाल्यास वेळेत उपचार सुरू करून संभाव्य गुंतागुंत टाळता येते. त्यामुळे नागरिकांनी शरीरावरील डाग लपवून न ठेवता सर्वेक्षणासाठी येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांना माहिती द्यावी, असे आवाहन सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ.रा.ज. पराडकर यांनी केले.

# अवैध पाणी उपसावर कारवाई,चारा व पाणी व्यवस्थेचे नियोजन करा-जिल्हाधिकारी

## हिंगणघाट येथे विधानसभास्तरीय पाणी टंचाई आढावा बैठक

**वर्धा/जनमाध्यम**
जिल्हाधिकारी वान्मथी सी यांच्या अध्यक्षतेखाली हिंगणघाट येथे विधानसभास्तरीय पाणी टंचाई आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीत हिंगणघाट, समुद्रपूर व सेलू तालुक्यातील पाणी टंचाईची सद्यस्थिती, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, अवैध उपसा कारवाई, चारा नियोजन तसेच आगामी काळातील संभाव्य परिस्थितीचा जिल्हाधिकाऱ्यांनी सविस्तर आढावा घेतला. अवैध पाणी उपसा, चारा व पाणी व्यवस्थेचे नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण तसेच विधानसभा मतदारसंघातील उपविभागीय अधिकारी, तिनही तालुक्यांचे तहसिलदार, मुख्याधिकारी,जलसंपदा व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा अधिकारी, ग्रामसेवक तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत विभागातील विविध गावांमधील पाणी स्त्रोतांची स्थिती, विहिरी व बोअरवेलची पातळी, तलावांमधील पाणीसाठा, टँकरची सद्याची संख्या व गरज तसेच पाणी टंचाईग्रस्त गावांचा आराखडा तयार करण्याबाबत चर्चा करण्यात आली. संबंधित अधिकाऱ्यांनी सद्यस्थितीची माहिती सादर केली.

**अवैध पाणी उपसावर कारवाई**

बैठकीत नद्या, कालवे, तलाव व इतर जलस्त्रोतांमधून होणाऱ्या अवैध उपसावर कठोर व तातडीने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. अवैध उपसा शोधून काढणे, त्वरित बंद करणे, वाहने, पंप व उपकरणे जप्त करणे, संबंधित व्यक्तींवर कायदेशीर कारवाई आणि पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे संरक्षणबाबत ठोस पावले उचलण्याचे आदेश देण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनीही ग्रामपंचायत व संबंधित यंत्रणांना अवैध उपसा विरोधात तत्काळ कारवाई करण्याचे व स्त्रोत संरक्षणासाठी समन्वय साधण्याचे निर्देश दिले.

**जनावरांसाठी चारा नियोजन**

पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धतेचा आढावा घेण्यात आला. पशुसंवर्धन विभागाने चारा छावण्यांची आवश्यकता, हिरवा व कोरडा चारा उपलब्धता, चारा वितरणाची सद्यस्थिती आणि ग्रामस्तरावर करावयाच्या उपाययोजना याबाबत माहिती सादर केली. जिल्हाधिकाऱ्यांनी चाऱ्याची टंचाई होऊ नये यासाठी आगाऊ नियोजन करून आवश्यक ती व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले.

**पाणी बचतीसाठी जनजागृतीवर भर**

जिल्हाधिकाऱ्यांनी पाणी टंचाईग्रस्त गावांची अद्ययावत यादी तयार करून तातडीने पाणी स्त्रोत मजबूत करणे, पाणी बचतीसाठी जनजागृती करणे आणि नागरिकांना पिण्याचे पाणी नियमित मिळेल याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पाणी स्त्रोतांचे बळकटीकरण आणि ग्रामपंचायतस्तरावर पाणी व्यवस्थापनासाठी तत्काळ कृती आराखडा तयार करून अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

# 'रंगताळी गरबा २०२६' उत्साहात

## सायली देवगिरीकर ठरली 'गरबा क्वीन'

**वर्धा/जनमाध्यम**
पारंपरिक वेशभूषेचा साज, गरब्याचा ताल आणि उत्साहाने भारलेले वातावरण अशा चैतन्यमय माहोलमध्ये वर्धेकरांनी गरब्याचा आनंद लुटला. व्ही-ग्रूव्ह डान्स स्टुडिओ आणि मनस्विनी महिला मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'रंगताळी गरबा २०२६' हा सोहळा पाहाडे सेलिब्रेशन हॉल येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धेत ३०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेत आपली नृत्यकला सादर केली. मुलींच्या गटात सायली संजय देवगिरीकर हिने उत्कृष्ट नृत्याविष्काराच्या जोरावर 'गरबा क्वीन'चा किताब पटकावला.



नवरात्रोत्सवातील गरब्याची परंपरा, संस्कृतीची ओढ आणि नृत्याचा आनंद यांचा सुंदर संगम या सोहळ्यात अनुभवायला मिळाला.स्पर्धेतील चुरशीच्या वातावरणात सायली संजय देवगिरीकर हिने आपल्या नृत्यकौशल्याने विशेष छाप पाडली. तिच्या उत्कृष्ट सादरीकरणाला दाद देत तिला मुलींच्या गटातील 'गरबा क्वीन' हा मानाचा किताब प्रदान करण्यात आला. तिच्या या यशामुळे सोहळ्याच्या आनंदात भर पडली.व्ही-ग्रूव्ह डान्स स्टुडिओ आणि मनस्विनी महिला मंच यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमाने वर्धेतील नृत्यप्रेमींना एकत्र आणत पारंपरिक गरबा संस्कृतीचा उत्सव साजरा केला. उत्स्फूर्त सहभागामुळे 'रंगताळी गरबा २०२६' हा सोहळा संस्मरणीय ठरला.

# शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या

**आष्टी (शहीद)**-खडका येथील ४५ वर्षीय शेतकरी प्रफुल रामदास नान्हे यांचा मृतदेह गुरुवारी, १५ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास बोधनापूर शिवारातील नदीकाठच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. बुधवारी घरातून बाहेर पडलेले नान्हे घरी परतले नसल्याने कुटुंबीय त्यांचा शोध घेत होते. या घटनेने खडका परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, प्रफुल नान्हे हे बुधवारी, १४ ऑक्टोबर रोजी बाहेर जाऊन येतो, असे सांगून घरातून निघाले होते. मात्र, रात्र होऊनही ते घरी परतले नाहीत. त्यामुळे कुटुंबीयांनी त्यांचा शोध सुरू केला. दरम्यान, गुरुवारी सकाळी बोधनापूर येथील शेतशिवारात नदीकाठच्या झाडाला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळला. शेतात जाणाऱ्या व्यक्तीच्या निदर्शनास हा प्रकार आल्यानंतर घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली.खडका येथील पोलीस पाटील आशिष इंगळे यांनी घटनेची माहिती तळेगाव पोलिसांना दिली.

# माँ राणी कला महोत्सवात सुरांची मैफल

## नागपूरच्या तनिष्क गजभियचा प्रथम क्रमांक; हिंगणघाटच्या महेश मुडे यांना द्वितीय पारितोषिक

**हिंगणघाट/जनमाध्यम**
आधार फाऊंडेशन, हिंगणघाटतर्फे आयोजित माँ राणी कला महोत्सव २०२६ अंतर्गत गीत गायन स्पर्धा उत्साहात पार पडली. विविध ठिकाणांहून आलेल्या स्पर्धकांनी आपल्या सुमधुर आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. या स्पर्धेला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.स्पर्धेचे परीक्षण सुनंदाताई इंदुरकर, आर. डी. खंदारे आणि स्नेहल संत यांनी केले. स्पर्धेत नागपूर येथील तनिष्क गजभिये याने प्रथम क्रमांक पटकावला. हिंगणघाट येथील महेश मुडे यांनी द्वितीय, तर सातारा येथील प्रसाद उलाडे यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

प्रोत्साहनपर पारितोषिकांसाठी नागपूर येथील रेश्मा सहाजी, यवतमाळ येथील पूजा शेंद्रे, हिंगणघाट येथील



राहुल गायकवाड, तसेच नागपूर येथील प्रकाश वाकेकर आणि सूरज झोटिंग यांची निवड करण्यात आली. यावेळी समाजसेवकांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यात सूरज ज्वेलर्स, दिलीप पोहकर, धर्मराज साठोणे, महेश अग्रवाल, अशोक मिहाणी, अपर्णा साठवणे, शोभा गायधने आणि राकेश झाडे यांचा समावेश होता.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी गीत गायन स्पर्धा समितीचे पराग मुडे, गौतम कोठारी, सुभाष शेंडे आणि चंदा कोठारी यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी आधार फाउंडेशनचे संस्थापक अतुल वांदिले, कार्यकारी अध्यक्षा माधुरी विहीरकर, ज्योती धार्मिक, वीरश्री मुडे, अनिता गुंडे, माया चाफले, राजश्री वीरूळकर, डॉ. प्रा. शरद विहीरकर, अभय दांडेकर, डॉ. गिरीधर काचोळे, डॉ. संजय हिवरकर, डॉ. शरद मददलवार, ॲड. इब्राहिम बक्ष, प्रा. डॉ. विठ्ठल घिनमीने, सुरेश गुंडे, जगदीश वांदिले, सुनील डांगरे, चंद्रशेखर निमंट, विनोद कुबडे, विजय हटवार, अशोक झाडे, सचिन येवले, प्रा. गजानन जुमडे, सुहास घिनमीने, गिरीधर कोठेकर, राजू मुडे, इशांत वांदिले, गौरव सुरकार आणि निखिल ठाकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# गाढवभुकी माता मंदिर श्रद्धेचे जागृत स्थान

## वर्धा नागपूर मार्गावरील देवीच्या दर्शनासाठी नवरात्रोत्सवात भाविकांची मांदियाळी

**वर्धा/जनमाध्यम**
विदर्भाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत देवीच्या उपासनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. गावोगावी असलेली देवीची मंदिरे ही केवळ धार्मिक स्थळे नसून भाविकांच्या श्रद्धेचे, भक्तीचे आणि सांस्कृतिक परंपरेचे केंद्र आहेत. वर्धा नागपूर मार्गावर असलेले गाढवभुकी माता मंदिर हे अशाच श्रद्धास्थानांपैकी एक मानले जाते. या मंदिराविषयी परिसरातील भाविकांमध्ये विशेष आस्था असून, नवरात्रोत्सवाच्या काळात देवीच्या दर्शनासाठी येथे भाविकांची मोठी गर्दी होत असल्याचे सांगितले जाते.

**नवरात्रोत्सवात भक्तीचा जागर**

शारदीय नवरात्र हा आदिशक्तीच्या उपासनेचा महत्त्वाचा उत्सव आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या उत्सवात देवीच्या विविध रूपांची पूजा केली जाते. घराघरांत घटस्थापना, मंदिरांमध्ये धार्मिक विधी, आरती, भजन आणि देवीच्या नामस्मरणातून भक्तिमय वातावरण निर्माण होते. गाढवभुकी माता मंदिरातही नवरात्रोत्सवाच्या काळात देवीच्या दर्शनाला विशेष महत्त्व प्राप्त होते. श्रद्धेने आणि भक्तिभावाने भाविक मंदिरात येऊन देवीचे दर्शन घेतात.

मनातील इच्छा व्यक्त करणे, कुटुंबाच्या सुखसमृद्धीसाठी प्रार्थना करणे आणि जीवनातील अडचणी दूर व्हाव्यात यासाठी देवीकडे साकडे घालणे, अशा विविध भावनांनी भाविक मातेच्या चरणी नतमस्तक होतात.



नवरात्र सहावा दिवस
आजचा रंग हिरवा

**जागृत देवस्थान म्हणून ओळख**

गाढवभुकी माता मंदिराविषयी भाविकांमध्ये जागृत देवस्थान अशी श्रद्धा असल्याचे सांगितले जाते. देवीच्या नावाभोवती तसेच तिच्या महात्म्याविषयी स्थानिक पातळीवर विविध आख्यायिका प्रचलित असल्याचे मानले जाते. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या अशा कथांमधून एखाद्या धार्मिक स्थळाविषयी लोकांच्या मनात श्रद्धा निर्माण होते आणि ती काळानुसार अधिक दृढ होत जाते.

भारतीय लोकपरंपरेत देवीला शक्ती, संरक्षण, धैर्य आणि कल्याणाचे प्रतीक मानले जाते. संकटाच्या काळात देवीचे स्मरण करणे, नवस बोलणे आणि मनोकामना पूर्ण झाल्यानंतर दर्शनासाठी येणे, या श्रद्धापरंपरा अनेक ठिकाणी पाहायला मिळतात.

**श्रद्धा आणि परंपरेचा संगम**

महाराष्ट्रातील देवीची मंदिरे ही धार्मिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. अशा मंदिरांमध्ये दर्शनासाठी येणारे भाविक केवळ धार्मिक विधी करत नाहीत, तर कुटुंबीय आणि परिचितांच्या भेटीगाठींतून सामाजिक संबंधही दृढ करतात. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण होते. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमुळे मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त होते.

**पर्यटनाच्या दृष्टीनेही महत्त्व**

धार्मिक स्थळांचे संवर्धन आणि त्यांची माहिती नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. मंदिराचा इतिहास, स्थानिक आख्यायिका, पारंपरिक पूजाविधी आणि नवरात्रोत्सवाची वैशिष्ट्ये यांचे संकलन केल्यास अशा देवस्थानांची सांस्कृतिक ओळख अधिक ठळक होऊ शकते.

गाढवभुकी माता मंदिराविषयी भाविकांच्या मनात असलेली श्रद्धा ही या देवस्थानाची खरी ओळख आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने देवीच्या दर्शनासाठी एकत्र येणारे भाविक, भक्तीमय वातावरण आणि पिढ्यानपिढ्या जपल्या जाणाऱ्या धार्मिक परंपरा यांमुळे या मंदिराचे स्थानिक धार्मिक जीवनातील महत्त्व अधोरेखित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३१९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# संक्षिप्त

## विविध ठिकाणी अब्दुल कलाम जयंती

### विभागीय आयुक्त कार्यालय

**अमरावती-**भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि 'मिसाईल मॅन' म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती आज अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली.या कार्यक्रमास विभागीय आयुक्त कार्यालयातील अपर आयुक्त (सामान्य प्रशासन), संजय जाधव तहसीलदार सुनीता झाडे,आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला.





### श्री.संत गाडगेबाबा विद्यापीठ

**अमरावती** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले.जयंती कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे,उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, सहा. कुलसचिव तथा प्रभारी जनसंपर्क अधिकारी डॉ. धनंजय पाटील तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.संचालन व भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्याबद्दल माहिती प्रभारी जनसंपर्क अधिकारी डॉ. धनंजय पाटील यांनी दिली.



### महानगरपालिका अमरावती

**अमरावती-**माजी राष्ट्रपती स्व. डॉ.ए.पि.जे. अब्दुल कलाम जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. माजी राष्ट्रपती स्व. डॉ.ए.पि.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्य महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते डॉ.ए.पि.जे. अब्दुल कलाम यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त भाग्यश्री बोरेकर, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, प्रमोद मोहोड, गणेश काकडे, भुषण खडेकार, सतिश ताथोड, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



### जि.प शाळेत 'आय ॲम कलाम' चित्रपटाचे प्रदर्शन

**अंजनगाव बारी -** जिल्हा परिषद मुलांची शाळा, अंजनगाव बारी येथे भारताचे माजी राष्ट्रपती व महान शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी 'आय ॲम कलाम' (I Am Kalam) या प्रेरणादायी चित्रपटाचे प्रदर्शन करण्यात आले.या चित्रपटातून विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्याची, शिक्षणाचे महत्त्व जाणून घेण्याची तसेच प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करण्याची प्रेरणा मिळाली. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि देशप्रेमाची भावना रुजविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.'स्वप्ने ती नसतात जी झोपेत पडतात, स्वप्ने ती असतात जी तुम्हाला झोपू देत नाहीत!' या डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी विचारांतून विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्य घडविण्याचा संदेश देण्यात आला.

### गौरी बारबुध्दे हिची एमबीबीएससाठी निवड

**अंजनगाव बारी-**गौरी सुरेशराव बारबुध्दे हिची जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएस (MBBS) वैद्यकीय शिक्षणासाठी निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे कुटुंबासह समाजाचा गौरव वाढला असून, तिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मिळविलेल्या या यशाबद्दल गौरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. भविष्यात कुशल डॉक्टर बनून समाजाला उत्तम वैद्यकीय सेवा द्यावी, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.



### महिला बॅडमिंटन संघ घोषित

**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूंमध्ये पारूल देशपांडे व स्नेहा शाह, आनंदी देशमुख, स्पुर्ती पेरसपुरे, सान्वी गुप्ता, रुद्राणी कुंटे व स्वरा तराळे हिचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथे दि. १७ ते २६ ऑक्टोबर, २०२६ दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

---

**इतिहासात पहिल्यांदाच!**

# रद्द परवाना परत मिळण्याची मलकापूर अर्बन बँकेची ऐतिहासिक वाटचाल

## केंद्र सरकारचे रिझर्व बँकेला पुनर्विचाराचे निर्देश

**अमरावती/का.प्र.**

भारतीय बँकिंग क्षेत्राच्या इतिहासात एक अत्यंत अभूतपूर्व आणि ऐतिहासिक घडामोडी समोर आली आहे. रिझर्व बँक ऑफ इंडिया (RBI) ने रद्द केलेला 'दि मलकापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक'चा परवाना पुनर्स्थापित (Restore) करण्याच्या दृष्टीने पुनर्विचार करण्याचे निर्देश केंद्र सरकारच्या अर्थ विभागाने रिझर्व बँकेला दिले आहेत. एखाद्या बँकेचा रद्द केलेला परवाना परत मिळवण्यासाठी केंद्र सरकारने अशा प्रकारे निर्देश देण्याची ही भारतातील पहिलीच घटना ठरली आहे.

रिझर्व बँकेने जुलै-ऑगस्ट २०२३ मध्ये मलकापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा परवाना रद्द केला होता. यामुळे बँकेच्या संपूर्ण व्यवहारांवर कडक निर्बंध आले होते. मात्र, गेल्या तीन वर्षांत बँक प्रशासनाने आर्थिक स्थितीत कमालीची सुधारणा घडवून आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.बँकेच्या सुधारलेल्या आर्थिक स्थितीच्या आधारे मलकापूर अर्बन बँकेच्या माजी अध्यक्ष आ.चैनसुख संचेती यांच्या वतीने केंद्र सरकारच्या 'डिपार्टमेंट ऑफ फायनान्शियल सर्व्हिसेस' (DFS) कडे परवाना पूर्ववत मिळवण्यासाठी वैधानिक अपील (Statutory Appeal) दाखल करण्यात आले होते. केंद्रीय अर्थ विभागाने या वैधानिक अपिलावर आणि बँकेच्या सध्याच्या सुधारीत आर्थिक स्थितीचा सखोल अभ्यास करून या अभ्यासाअंती मलकापूर अर्बन बँकेची विद्यमान परिस्थिती बँक सुरळीत चालविण्याइतपत भक्कम आणि समाधानकारक व तसेच गुंतवणूकदारांच्या हिताचे असल्याने असे निर्देश अर्थ मंत्रालयाने दिले आहे. त्यानंतर अर्थ विभागाने रिझर्व बँकेला मलकापूर बँकेच्या परवान्याबाबत सकारात्मक पुनर्विचार करण्याचे निर्देश दिले आहेत. मलकापूर अर्बन बँकेची भक्कम कायदेशीर बाजू ॲड. अनुप लोहिया, ॲड. संजीव देशपांडे आणि ॲड. विक्रांत गिरमकर यांनी मांडली. त्यांच्या यशस्वी कायदेशीर लढ्यामुळेच हा ऐतिहासिक टप्पा गाठणे शक्य झाले आहे. रद्द झालेला परवाना पुन्हा मिळण्याची प्रक्रिया सुरु होण्याची ही देशातील एकमेव आणि पहिलीच घटना असल्याने संपूर्ण बँकिंग क्षेत्रात आणि मलकापूर बँकेच्या सभासद व ठेवीदारांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

---

### पी. आर. पोटे पाटील कॉलेजमध्ये

# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती वाचन प्रेरणादिन म्हणून साजरी

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप द्वारा संचालित पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजीनीअरिंग अँड मॅनेजमेंट कॉलेज च्या ग्रंथालया मध्ये भारतरत्न डॉ ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची ९५ वी जयंती हि वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली.



त्या अनुषंगाने ग्रंथालय विभाग तसेच राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालया मध्ये वाचकाकडून त्यांच्या जीवनचरित्रा वरील बुक्स चे वाचन करण्यात आले.तसेच वाचन संस्कृती वाढविण्यासाठी बेस्ट रीडर चा पुरस्कार इलेक्ट्रिकल विभागाचा विद्यार्थी आयुष खेटे याला देण्यात आला.त्याने आपले मनोगत व्यक्त केले तसेच ग्रंथालयात पुस्तक प्रदर्शनि लावण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ पी.एम.जावंदीया होते त्यांनी भारतरत्न डॉ ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला त्यांनी आपल्या भाषणामध्ये ग्रंथालया मधील सोई सुविधा बद्दल आपले विचार मांडले तसेच त्यांनी भारतरत्न डॉ ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना भारतरत्न हि उपाधी कशी मिळाली या बद्दल माहिती दिली आणि सर्वाना त्यांचे पुस्तकाचे वाचन करून घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा शिरभाते यांनी केले.कार्यक्रमाला डॉ हेमंत कुलट, डॉ सचिन सराफ, डॉ उमेश होरे, प्रा मनीष देशमुख प्रा अक्षय पुंडकर, उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालयाचे ग्रंथपाल प्रा.रुपेश पोल्हाड तसेच एन,एस एस समन्वयक प्रा.एस.एस.मेंढे यांनी केले ग्रंथालयीन कर्मचारी राजेश टोंग,रामदास पाटील सुनील राउत तसेच कार्यक्रमाला विद्यार्थी तसेच सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

# शेतात वीजप्रवाहाचा धक्का लागून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**कुऱ्हा/वार्ताहर**

जंगली प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतात लावलेल्या विद्युत प्रवाहाच्या तारेला स्पर्श झाल्याने एका ३५ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना १५ ऑक्टोबर रोजी कुऱ्हा येथील जामठी शेतशिवारात घडली.या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्राप्त माहितीनुसार, निलेश सुजिया हे गुरुवारी सकाळी शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी गेले होते. आदल्या रात्री जंगली प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतात विद्युत प्रवाह सोडण्यात आला होता. मात्र, सकाळी शेतात गेल्यानंतर विद्युत प्रवाह बंद न करता त्यांनी पिकांना पाणी देण्यास सुरुवात केली. याच वेळी विद्युत प्रवाह असलेल्या तारेला त्यांचा स्पर्श झाला. त्यामुळे त्यांना विजेचा जोरदार धक्का बसला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.



या घटनेची माहिती मिळताच कुऱ्हा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी तिवसा येथे पाठविला. याप्रकरणी पुढील कार्यवाही सुरू आहे. निलेश सुजिया हे आपल्या आई-वडिलांचे एकुलते एक पुत्र होते. त्यांच्या पश्चात आई-वडील,पत्नी व एक मुलगी, एक मुलगा असा परिवार आहे.

---

# एम.एस.- सेट परीक्षा २५ ऑक्टोबरला

## परीक्षेसाठी ३२ केंद्र निश्चित, ९८१६ परीक्षार्थी देणार परीक्षा

**अमरावती/का.प्र.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्यावतीने घेण्यात येणारी व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभागांतर्गत एमएस - सेट २०२६ परीक्षा २५ आक्टोबर, २०२६ रोजी ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे. परीक्षेकरिता एकूण ३२ केंद्र निश्चित करण्यात आले असून ९ हजार ८१६ परीक्षार्थी ही परीक्षा देणार आहेत.

निश्चित केलेले परीक्षा केंद्र सदर परीक्षेकरिता अमरावती शहरातील विद्याभारती महाविद्यालय, विद्याभारती कॉलेज ऑफ मॅनेजमेंट स्टडिज, सी.के. नायडू मार्ग, कॅम्प, विद्याभारती कॉलेज ऑफ फार्मसी, गोल्डन किड्स इंग्लिश प्रायमरी स्कूल, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था (व्ही.एम.व्ही.), पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट (विंग ए, विंग बी, विंग सी, विंग डी), कनिष्ठ महाविद्यालय, न्यू हायस्कुल मेन, नुतन कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, महिला महाविद्यालय, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन (हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ), ब्राजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, नारायणदास लढ्ढा हायस्कुल, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी (ब्लॉक बी-१, ब्लॉक बी-२, ब्लॉक डी), प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट (एफवायबीई ॲन्ड सिव्हील बिल्डींग,

सी.एस.ई. बिल्डींग, कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग (आयओटी), एआय ॲन्ड डीएस प्रो. राम मेघे इन्स्टिट्टुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च (ब्लॉक ए, ब्लॉक बी., ब्लॉक सी, ब्लॉक डी, ब्लॉक ई, अंजनगांव बारी, बडनेरा, डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्टुट ऑफ फार्मसी, डॉ. राजेंद्र गोडे कॉलेज ऑफ फार्मसी (डी.बी.ए.टी.यू.), श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय (एम.सी.व्ही.सी. इमारत आणि मुख्य इमारत), हे परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहे.

अडचण असल्यास विद्यार्थ्यांनी साधावा संपर्क - दिव्यांग विद्यार्थी, विद्यार्थीनी यांनी परीक्षेच्या तीन दिवस आधी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्राध्यापक, विधी विभाग तथा एमएस - सेट परीक्षेच्या समन्वयक डॉ. कल्पना जावळे यांच्याशी ९४२००३४३८५ यावर संपर्क साधावा, तसेच परीक्षार्थींना काही अडचण असल्यास त्यांचेशी संपर्क साधता येईल, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

---

### पशुसंवर्धन विभागातर्फे चारा साक्षरता अभियान कार्यशाळा

# युरिया प्रक्रियेद्वारे निकृष्ट चारा सकस बनविण्याचे प्रात्यक्षिक

**लेहेगाव/वार्ताहर**

जिल्ह्यात सध्या दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, आगामी उन्हाळ्यात पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध व्हावा,या अभियानांतर्गत पशुवैद्यकीय चिकित्सालय,नेर पिंगळाई यांच्या कार्यक्षेत्रातील लेहेगाव येथील पवार कॉलनीमध्ये एकदिवसीय चारा साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यशाळेला मोर्शीचे उपविभागीय अधिकारी प्रदीप पवार,नायब तहसीलदार विनोद वानखडे, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रीती खटिंग,तालुका पशुसंवर्धन अधिकारी डॉ.प्रविण सारडे,पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.मिलिंद राऊत, पशुधन विकास अधिकारी रामराव ढोबळे यांच्यासह पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मिलिंद राऊत यांनी दुष्काळी परिस्थितीतही पशुधनाला सकस चारा उपलब्ध करून देण्यासाठी मुरघास निर्मिती, हायड्रोपोनिक पद्धतीने हिरवा चारा उत्पादन आणि निकृष्ट चाऱ्यावर युरिया प्रक्रिया करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.तुरीचे कुटार, गव्हाचा भुसा आणि कुट्टी यांसारख्या निकृष्ट चाऱ्यावर योग्य पद्धतीने प्रक्रिया केल्यास त्याची पौष्टिकता सुधारण्यास मदत होते.त्यामुळे पशुधनाच्या पोषणाची गरज भागविण्यास हातभार लागतो, असे डॉ. राऊत यांनी सांगितले.

युरिया प्रक्रियेसाठी १०० किलो चाऱ्याकरिता ४ किलो युरिया, ५ किलो गूळ, १ किलो खनिज मिश्रण आणि १ किलो मीठ यांचे ५० लिटर पाण्यात द्रावण तयार करून ते चाऱ्यावर समान रीतीने फवारण्याची पद्धत समजावून सांगण्यात आली.उन्हाळ्यात हिरव्या चाऱ्याची टंचाई भासू नये, यासाठी हिरव्या चाऱ्यापासून मुरघास तयार करून त्याची योग्य साठवणूक करावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच हायड्रोपोनिक पद्धतीने कमी पाण्यात, मातीशिवाय हिरवा चारा तयार करता येतो.

या पद्धतीचा अवलंब केल्यास चारा टंचाईच्या काळात पशुपालकांना पर्यायी चारा उपलब्ध होऊ शकतो, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेला परिसरातील शेतकरी व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन डॉ. मिलिंद राऊत यांनी केले.

# दुर्गा-शारदा व दसरा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा रूट मार्च



**आसेगाव पूर्णा-** दुर्गा-शारदा देवी उत्सव आणि दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आसेगाव पूर्णा पोलिसांच्या वतीने गुरुवारी १५ ऑक्टोबरला पूर्णानगर येथील मिश्र वस्ती व संवेदनशील भागातून रूट मार्च काढण्यात आला. परिवीक्षाधीन पोलीस उपअधीक्षक वैशाली भोये व आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक सतीश खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे संचलन करण्यात आले.यावेळी विसर्जन मार्गावरील धार्मिक स्थळे,संवेदनशील ठिकाणे आणि परिसराची माहिती अधिकारी व अंमलदारांना देण्यात आली.उत्सव व विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये,यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली.या रूट मार्चमध्ये गुप्तवार्ता विभागाचे सचिन सालफळे,आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याचे दोन अधिकारी व १६ अंमलदार,१३ सैनिक,खोलापूर पोलीस ठाण्याचे एक अधिकारी व १० अंमलदार, परतवाडा येथील एसआरपीएफ प्लाटून तसेच अचलपूर येथील आरसीपी प्लाटून सहभागी झाले होते.

---

# खत खरेदीसाठी आता शेतकऱ्यांना रांगेत उभे राहण्याची गरज नाही!

## 'एफएफएस'ॲपद्वारे घरबसल्या खतांची बुकिंग

**अमरावती/वार्ताहर**

कृषी विभागामार्फत विभागातील अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांमध्ये २२ ऑक्टोबर २०२६ पासून 'फ्रेमवर्क फॉर फर्टिलायझर सेल' (एफएफएस) या डिजिटल प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनी कळविले आहे. यामुळे शेतकऱ्यांना घरबसल्या मोबाईल ॲपद्वारे खतांची बुकिंग करता येणार असून, खत खरेदीसाठी दुकानांसमोर रांगेत उभे राहण्याची आवश्यकता राहणार नाही.

शेतकऱ्यांना खत खरेदीची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळेची बचत करणारी करण्यासाठी कृषी विभागामार्फत एफएफएस या डिजिटल प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येत आहे.शेतकऱ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून एफएफएस ॲप डाउनलोड करावे लागणार आहे. त्यानंतर फार्मर आयडी किंवा आधार क्रमांकाच्या आधारे ओटीपीद्वारे पडताळणी करून लॉगिन करता येईल. जिल्हा, तालुका, गाव आणि गट क्रमांकानुसार जमीन निवडत येणार आहे. त्यानंतर चालू हंगाम आणि लागवड केलेल्या पिकाची माहिती भरून आवश्यक खताची निवड करता येणार आहे.उपलब्ध साठा आणि अधिकृत खत विक्रेत्यांची माहिती तपासून विक्रेता निवडल्यानंतर बुकिंग पूर्ण करता येणार आहे. बुकिंग यशस्वी झाल्यावर मिळालेला क्युआर कोड किंवा टोकन सुरक्षित ठेवावे लागणार आहे. खत खरेदीच्या वेळी संबंधित विक्रेत्याकडे हा कोड दाखवून पिओएस मशीनद्वारे व्यवहार पूर्ण करता येणार आहे.

**'ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी' आवश्यक**

एफएफएस प्रणालीचा सुरळीत वापर करण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याकडे 'ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी' असणे आवश्यक आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप हा आयडी तयार केलेला नाही, त्यांनी तो त्वरित तयार करून घ्यावा. तसेच आपल्या सातबारा उताऱ्यावरील माहिती आणि पीकपेरा नोंदी अद्ययावत ठेवाव्यात. खत खरेदी करताना पीओएस पावतीवरील खताचा प्रकार आणि खरेदीची माहिती तपासून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील घाऊक व किरकोळ खत विक्रेत्यांनी आयएफएमएस आणि पीओएस प्रणालीवरील खतसाठ्याची माहिती अद्ययावत ठेवावी. प्रत्यक्ष साठा आणि ऑनलाइन प्रणालीवरील साठा यामध्ये तफावत आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल.एफएफएस प्रणालीद्वारे प्राप्त होणाऱ्या क्युआर कोडनुसारच खतविक्रीचे व्यवहार करावेत आणि शेतकऱ्यांना ॲप वापरण्यासाठी सहकार्य करावे, असे निर्देश कृषी विभागाने दिले आहेत. एफएफएस ॲप, फार्मर आयडी किंवा खत बुकिंग करताना काही अडचण आल्यास शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, पंचायत समितीतील कृषी अधिकारी किंवा गावातील कृषी सेवकांशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# आत्महत्या की सुनियोजित खून?

## यशचा मृतदेह संशयास्पद स्थितीत शौचालयात आढळला

### हात पाठीमागे होते बांधून, हत्येचा संशय, -फॉरेन्सिक तपासावर सगळयांच्या नजरा

**-अचलपूर-परतवाडा हादरले**

**परतवाडा/प्रतिनिधीः-** अचलपूर-परतवाडा येथील पेंशनपुरा परिसरात आज गुरुवार, १५ ऑक्टोबर रोजी पहाटे समोर आलेल्या एका अत्यंत धक्कादायक आणि रहस्यमय घटनेने संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे. येथे राहणारा १७ वर्षीय यश पूरण पुरोहित याचा मृतदेह त्याच्याच घरातील शौचालयात फासावर लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. ही आत्महत्या नसून घातपात असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सुरुवातीला ही आत्महत्या असल्याची चर्चा होती, परंतु जेव्हा मृताचे हात त्याच्या पाठीकडे तारेने बांधलेले दिसले, तेव्हा या प्रकरणाला एक भयानक आणि संशयास्पद वळण मिळाले. घटना घडली तेव्हा घरातील सर्व सदस्य आई- वडील आणि भाऊ-बहीण गाढ झोपेत होते. परिजनांकडून मिळालेल्या माहिती नुसार, यश काही काळापासून मानसिकदृष्ट्या खूप त्रस्त होता. कुटुंबाने हे देखील सांगितले की, सुमारे तीन वर्षांपूर्वीही तो अचानक घर सोडून कुठेतरी निघून गेला होता, त्यामुळे घरचे लोक आधी पासूनच त्याच्या मानसिक



स्थितीबाबत चिंतेत होते. मात्र, यावेळी ज्या भयानक आणि अनैसर्गिक परिस्थितीत त्याचा मृतदेह सापडला आहे, त्याने कुटुंबाला आतून पूर्णपणे खचवून टाकले आहे.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन परतवाडा पोलीस ठाण्याचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. ठाणेदार अजय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक या मर्डर मिस्ट्री किंवा संशयास्पद आत्महत्येचा गुंता सोडवण्यात गुंतले आहेत. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी अचलपूरच्या उपजिल्हा रुग्णालयात पाठवला आहे.आता सगळ्यात मोठा आणि गुंतागुंतीचा प्रश्न हा आहे की, जर ही आत्महत्या होती, तर कोणतीही व्यक्ती स्वतःचेच हात पाठीमागच्या बाजूला तारेने कसे बांधू शकते? ही खरोखरच आत्महत्या आहे की एखाद्या गुन्हेगाराने पूर्व नियोजित कट रचला आहे? (पान २ वर)

# २५.९४ ग्रॅम एमडी ड्रग्ससह दोन आरोपी गजाआड

### धरम काट्यावर राजापेठ पोलिसांची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाण्याच्या पथकाने अंमली पदार्थांविरोधात कठोर पाऊल उचलत मोठी कारवाई केली आहे. पोलिसांनी सुमारे २५.९४० ग्रॅम मेफेड्रोन ड्रग्ज सह दोन आरोपींना ताब्यात घेतले आहे.पराग उर्फ सन्नी अरविंद गवई (वय २९, उत्तम नगर, नेरपिंगळाई) व सोपान अंबादास खडसे (वय २६, गोपाल नगर) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

माहितीनुसार, बुधवार १४ ऑक्टोबर रोजी राजापेठ पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुन्ह्यातील फरार आरोपींचा शोध घेत असताना (पान २ वर)

# प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांच्या विरोधात उमेद संघटना आक्रमक

### -जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा -कर्मचाऱ्यांना त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान उमेद मधील कंत्राटी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांच्या विरोधात आज गुरुवार १५ ऑक्टोंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री आणि ग्रामविकास सचिव यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यात कार्यरत असलेले अधिकारी शीतल यशवंत गणोरवार, विजय पाटील आणि इतर कर्मचारी यांना जिल्हा अभियान सहसंचालक म्हणून कार्यरत असलेल्या प्रीती देशमुख सातत्याने हिनतेची वागणूक देतात आणि (पान २ वर)

# मायक्रो फायनान्स कंपन्यांची मनमानी खपवून घेणार नाही!

### युवा सेनेचा इशारा, दर्यापूर तहसिलदारांना निवेदन



**खल्लार/प्रतिनिधीः-** शेतकरी, महिला बचत गट आणि सर्वसामान्य नागरिकांना मायक्रो फायनान्स कंपन्या तसेच खासगी वित्तीय संस्थांकडून कर्जवसुलीच्या नावाखाली होणारा कथित मानसिक छळ, धमकावणे आणि अपमानास्पद वागणूक तात्काळ थांबवावी, अशी आक्रमक मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचे निवेदन युवासेना जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांच्या नेतृत्वाखाली दर्यापूरचे तहसिलदार यांना आज (दि.१५) देण्यात आले. तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दर्यापूर यांनाही निवेदनाची प्रत सादर करण्यात आली.

महागाई, शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि वाढत्या आर्थिक अडचणींमुळे शेतकरी, (पान २ वर)

# ग्रामिण भागातील नागरिकांना घरपट्टी व पाणीपट्टी करमाफी द्या

### राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील ग्रामिण भागात निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीचा विचार करून नागरिकांची घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्यात यावी, या मागणीचे निवेदन (दि.१५) दर्यापूरचे तहसिलदार यांच्याकडे सादर करण्यात आले आहे. दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसने निवेदनातून केली आहे.

दर्यापूर तालुक्यातील ग्रामिण भागात अनिश्चित पाऊस, शेतीतून मिळणारे अपुरे उत्पन्न आणि वाढती महागाई यामुळे शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. ग्रामिण भागातील (पान २ वर)

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्या!

### राज्यमंत्री जयस्वाल यांच्याकडे युवासेनेची मागणी



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर व चांदूर रेल्वे तालुक्यात ३० व ३१ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुंबई येथे कृषी व वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची भेट घेऊन निवेदन सादर केले.मंगरूळ चव्हाळा, (पान २ वर)

# चांदूर रेल्वेत काँग्रेस आणि इंडिया आघाडीतर्फे 'मत वाचवा - देश वाचवा' जनआंदोलन



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** संविधानाच्या आर्टिकल ३२६ नुसार नागरिकांना मिळालेल्या मतदानाच्या घटनात्मक अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी, तसेच मतदार याद्यांमधून मनमानी पद्धतीने नावे वगळण्याच्या प्रकाराविरोधात अखिल भारतीय काँग्रेस कमिटी व घटक पक्ष इंडिया आघाडीच्या वतीने परिक्षित जगताप यांच्या नेतृत्वात चांदूर रेल्वे येथे तीव्र जनआंदोलन करण्यात आले. या प्रसंगी चांदूर रेल्वेचे तहसीलदार यांच्यामार्फत पंतप्रधानांना निवेदन पाठवण्यात आले.

देशभरात SIR च्या नावाखाली मतदार याद्यांमधून मनमानी पद्धतीने नावे वगळून मतदारांचा वैधानिक हक्क हिरावून घेण्यात आला आहे, याची (पान २ वर)

# काटसुर, वणी सुलतानपूर येथील धोकादायक पुलांसाठी वंचित आक्रमक



**तिवसा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील काटसुर तथा वणी सुलतानपूर येथील रस्त्यावरील मुख्य पूल धोकादायक स्थितीत असून कुठल्याही क्षणी जीवितहानी होण्याची शक्यता आहे, त्यामुळे सदर पुलांचे तात्काळ बांधकाम करण्यात यावे, अन्यथा जीवितहानी झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर ३०२ चे गुन्हे दाखल करण्यात येतील असा इशारा वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हा महासचिव सागर भवते (पान २ वर)

# PNG गॅस पाईपलाईनला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा तीव्र विरोध

### जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन, आंदोलनाचा इशारा



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** नांदगाव खंडेश्वर शहरात अदानी समूहाकडून सुरू करण्यात येत असलेल्या PNG (पाईप नॅचरल गॅस) प्रकल्पाला भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) तालुका समितीने तीव्र विरोध दर्शवला आहे. या गॅसच्या वापरामुळे मानवी आरोग्यावर आणि सामाजिक-आर्थिक स्थितीवर गंभीर दुष्परिणाम होणार असल्याचा दावा करत, शहरात PNG गॅस नकारण्याबाबतचे एक अधिकृत आक्षेप निवेदन आज जिल्हा दंडाधिकारी (जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती) यांना सादर करण्यात आले.सोशल मीडियावरील माहितीनुसार, अदानी समूहाच्या वतीने , दिनांक १५ ऑक्टोबर (पान २ वर)

# नांदगाव तालुक्यात ३५००० मतदारांची नावे बाद

### इंडिया आघाडीचा तहसील कार्यालयावर मोर्चा



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, फॉर्म सहामध्ये करण्यात आलेले बदल रद्द करावेत तसेच एसआयआर (विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण) प्रक्रिया रद्द करावी, या मागण्यांसाठी आज नांदगाव खंडेश्वर येथे इंडिया आघाडीच्या वतीने आंदोलन करण्यात आले. गेल्या काही दिवसापासून देशाची राजधानी दिल्ली व देशभर सुरू असलेल्या ज्ञानेशकुमार विरोधी आंदोलनाला समर्थन देण्यासाठी इंडिया आघाडीतील घटक पक्ष राष्ट्रीय काँग्रेस , भारतीय कम्युनिस्ट (पान २ वर)






# अचलपूरात बंदूकीचा धाक दाखवून लुटण्याचा प्रयत्न

### लग्नाची पत्रिका देण्याच्या बहाण्याने घरात प्रवेश

**-दोन आरोपींचा युद्ध स्तरावर शोध**

**अचलपूर/प्रतिनिधीः-** लग्नाची पत्रिका देण्याच्या बहाण्याने घरात प्रवेश करून एका ६० वर्षीय महिलेला चाकू व बंदुकीचा धाक दाखवून लुटण्याचा प्रयत्न केल्याची खळबळ जनक घटना शहरातील अलकरीम कॉलनी परिसरात



बुधवारी संध्याकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली. मात्र, घरातील महिलांच्या प्रसंगावधानामुळे आणि शेजाऱ्यांच्या सतर्कतेमुळे नागरिकांची गर्दी जमल्याने दोन्ही संशयित घटना स्थळावरून पसार झाले. माहितीनुसार, बेग आफक अस्लम बेग (वय २६) यांच्या निवासस्थानी दोन अनोळखी व्यक्ती आले. त्यातील एकाचे वय सुमारे ४० वर्षे तर दुसऱ्याचे वय २२ वर्षे होते. त्यांनी आफकचे मित्र असल्याचे सांगून लग्नाची पत्रिका देण्याचा बहाणा केला आणि पिण्यासाठी पाणी मागितले. तसेच पत्रिकेवर नाव लिहिण्या (पान २ वर)

# खोडगाव येथील गरीब कुटुंबाला अखेर घराचा ताबा

### -खासदार वानखडेंच्या आक्रमक भूमिकेमुळे फायनान्स कंपनी झुकली

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक अडचणींमुळे कर्जाचे हप्ते थकल्याने मोतीलाल ओसवाल होम फायनान्स कंपनीने घरावर ताबा मिळवून गरीब कुटुंबाला बेघर केले होते. मात्र, अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे यांनी या प्रकरणात थेट घटनास्थळी धाव घेत आक्रमक भूमिका घेतली. '२४ तासांत घराचा ताबा पूर्ववत



न दिल्यास मी स्वतः घराचे कुलूप तोडेन,' असा सज्जड दम खासदारांनी कंपनी प्रशासन व वकिलांना भरला. खासदारांच्या या दणक्यानंतर संबंधित फायनान्स कंपनी अखेर झुकली आणि अवघ्या २४ तासांत विवेक रामेकर यांच्या घराच्या चाव्या त्यांच्या स्वाधीन करण्यात आल्या, ज्यामुळे एक गरीब कुटुंब बेघर होण्यापासून वाचले आहे. (पान २ वर)